# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १०/२००९** **दिनांक ०७.११.२००९**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ-सकाळी ११.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दिनांक ७ नोव्हेंबर, २००९ रोजी सकाळी ११.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१३१४२-२००९, दि.२६.१०.२००९ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा दिनांक ७.११.२००९ रोजी सकाळी ११.३० संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा.उपाध्यक्ष श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१.मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष
०२. मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग
०३. मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०४ मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव
०५. मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
०६. मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक
०७. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०८. मा.डॉ.पी.एल.तिवारी
०९. मा.सौ.जयश्री विष्णू थोरात

मा.किशोर रा. मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.उपाध्यक्ष श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे, मा.श्रीमती रिम्पल लोहिया व मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय दूरध्वनीवरुन तसेच मा.श्री.समि खतीब व मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा यांनी फॅक्स पत्राद्वारे कळविले आहे. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१** **साईटेक प्रकल्पासाठी उघडलेल्या निविदांवर चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत श्री के. व्ही. रमणी यांचे मार्गदर्शनाखाली साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. सदर कार्यवाहीसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी चार निविदाधारक पात्र ठरविण्यात आलेले असून, त्यांना फेर Commercial निविदा दिनांक ०६/०७/२००९ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत संस्थानचे शिर्डी कार्यालयाकडे सादर करणेस सांगण्यात आलेले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

| Sr.No. | Name of Party |
|---|---|
| 1. | United Telecoms Ltd. Bangalore |
| 2. | Reliance Communications Ltd, Pune |
| 3. | Cognizant Technology Solutions, Pune |
| 4. | Persistent System Ltd. Pune |

उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदा मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०७/२००९ रोजीचे सभेत उघडण्यात आलेल्या आहेत. सदर निविदांचा मा. श्री. के.व्ही. रमणी यांनी अभ्यास करणेसाठी त्यांचेकडेस ठेवल्या आहेत. तद्नंतर प्रत्येक निविदाधारकांशी स्वतंत्ररित्या चर्चा केली. प्रकल्पासंदर्भातील तांत्रिक निविदेत त्यांना शंका असल्याने व उघडण्यात आलेल्या Commercial निविदा यांचा एकत्रित अभ्यास करुन दोन दिवसांत अंतीम तांत्रिक दोष दुरुस्ती अहवाल इकडील कार्यालयास पाठवून निविदाधारकांस ई-मेलव्दारे पाठवून २९/०७/२००९ अखेर फेर Commercial निविदा स्पष्टीकरणासह जमा करण्यात याव्यात, असे त्यांनी मा. अध्यक्ष सो. यांना सांगितले व त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली असून, दिलेल्या मुदतीत उपरोक्त चार निविदाधारकांनी commercial निविदा स्पष्टीकरणासह सादर केलेल्या होत्या.

**(ब)** उपरोक्त प्राप्त झालेल्या चार निविदा मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ९/०८/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६१ नुसार उघडण्यात आलेल्या असून, त्या पुन्हा सिलबंद करुन अभ्यासासाठी मा. श्री. के.व्ही. रमणी यांचेकडे पाठविण्यात आलेल्या आहे. सदर निविदांचे अध्ययन करुन ते अंतीम रिपोर्ट तयार करणार असून, त्यात प्रामुख्याने तांत्रिक दृष्ट्या सक्षम निविदांची वर्गवारी व commercial दृष्ट्या न्यूनतमची वर्गवारी करण्यात येणार आहे. त्याबाबतचा सविस्तर रिपोर्ट श्री रमणी साो. मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करणार आहे. तथापि, दोन निविदाधारकांऐवजी अंतीम चारही निविदाधारकांना मा. व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये चर्चा-तथा-वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे, असे श्री के.व्ही.रमणी यांनी सांगितले आहे. त्यानुसार सदर चारही निविदाधारकांना आमंत्रित करण्यात आलेले आहे.

उपरोक्त विवेचनानुसार, बोलविण्यात आलेल्या अंतीम चारही निविदाधारकांशी चर्चा-तथा-वाटाघाटीअंती निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.७९९** आजचे सभेत साईटेक प्रकल्पाची पार्श्वभूमी व आतापर्यंत झालेल्या कामकाजाची माहिती श्री के.व्ही. रमणी-अध्यक्ष तांत्रिक सल्लागार समिती यांनी प्रेझेंटेशनव्दारे मा. व्यवस्थापन समितीस दिली. तद्नंतर तांत्रिकदृष्ट्या सबळ निविदांची रँकींग सांगण्यात आली. त्यानुसार १) Cognizant Technology Solutions, Pune, २)

Persistent System Ltd. Pune, ३) United Telecoms Ltd. Bangalore व ४) Reliance Communications Ltd, Pune (टेलिकॉमसाठी) असे रँकींग श्री रमणी सो. यांनी सांगून Commercial निविदेचा तक्ता श्री के.व्ही. रमणी यांनी सादर केला. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

| Sr. No. | Quote for one time & 5 years | Cognizant | Persistent+ Reliance Communications | United Telecomm. |
|---|---|---|---|---|
| | | All Amounts in Corers | | |
| 01. | I.T. | 23.34 | 20.46 | 12.00 |
| 02. | Telecom m. | 1.30 | 1.77 | 15.00 |
| 03. | Other Costs | 0.17 | 4.12 | 1.11 |
| Total | | 24.81 | 26.35 | 28.11 |
| Discount | | 2.94 | 1.00 | 2.11 |
| Negotiation Amount | | 21.87 | 25.35 | 26.00 |

उपरोक्त तक्त्यानुसार वाटाघाटी अंती Cognizant Technology Solutions, Pune, यांची निविदा तांत्रिक दृष्ट्या अधिक सक्षम असल्याने, ती स्विकारण्यात आली. त्यासाठी **२१.८७** कोटीचे खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु, उपरोक्त तक्त्यात नमुद केलेली सतरा लाख ही टॅक्सची रक्कम सध्याच्या टॅक्सेस नुसार असल्याने, भविष्यात टॅक्समध्ये बदल झाल्यास त्याप्रमाणे होणारी टॅक्सची रक्कम अदा करावी, असे ठरले. तसेच श्री के.व्ही रमणी, अध्यक्ष तांत्रिक सल्लागार समिती यांचे मार्गदर्शनाखाली प्रकल्पाची कार्यवाही करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

---

**विषय नं.०२** **दिनांक १९.०९.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.८००** दिनांक १९.०९.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरस्त्या करण्यात आली.

**०१) निर्णय क्र. ७३२ -**

"आजचे सभेत उपरोक्त कोटेशन्ससादरकर्त्यांनी देऊ केलेल्या टॉवलचे नमुन्यांची पहाणी केली त्यामध्ये सारडा इंटेरिअर यांचे टॉवलचा नमूना पसंत पडल्याने मा.विश्वस्त श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी सारडा इंटेरिअर, अहमदनगर यांचेशी दुरध्वनीव्दारे संपर्क साधला असता त्यांनी देऊ केलेला कलर टॉवेल दर प्रती नग रु १३५/-असून त्याचे वजन ५०० ग्रॅम ऐवजी ६०० ग्रॅम असल्याचे सांगितले.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सारडा इंटेरिअर, अहमदनगर यांचे कलर टॉवेलचे दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. "**

**<u>याऐवजी</u>**

"आजचे सभेत उपरोक्त कोटेशन्ससादरकर्त्यांनी देऊ केलेल्या टॉवलचे नमुन्यांची पहाणी केली त्यामध्ये सारडा इंटेरिअर यांचे टॉवलचा नमूना पसंत पडल्याने मा.विश्वस्त श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी सारडा इंटेरिअर, अहमदनगर यांचेशी दुरध्वनीव्दारे संपर्क साधला असता त्यांनी देऊ केलेला कलर व पांढरा टॉवेल दर प्रती नग रु १३५/-असून त्याचे वजन ५०० ग्रॅम ऐवजी ६०० ग्रॅम असल्याचे सांगितले.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सारडा इंटेरिअर, अहमदनगर यांचे पांढऱ्या टॉवेलचे दर स्विकारुन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. "**

(कार्यवाही-अधिक्षक,व्दारावती निवासस्थान)

**०२) निर्णय क्र.७७८-**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, यापुर्वी, अलोक इंडस्ट्रिज, मुंबई यांना ज्या धर्तीवर श्री साईभक्तांसाठी निवासस्थाने बांधकामाबाबत परवानगी देण्यात आलेली आहे त्याच धर्तीवर साईग्रेस फौंडेशन, अधेरी (प) मुंबई यांना निवासस्थाने बांधकामाबाबत परवानगी देण्यात यावी असे ठरले."

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**"यावर सविस्तर चर्चा होऊन, यापुर्वी, साईआश्रम इमारतीचे काम शिर्डी साई ट्रस्ट,चेन्नई (तामीळनाडू) यांना ज्या धर्तीवर श्री साईभक्तांसाठी निवासस्थाने बांधकामाबाबत परवानगी देण्यात आलेली आहे त्याच धर्तीवर साईग्रेस फौंडेशन, अधेरी (प) मुंबई यांना निवासस्थाने बांधकामाबाबत परवानगी देण्यात यावी असे ठरले."** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**(०३) निर्णय क्र.७७९-**

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.न. | पार्टीचे नाव | बॉटल पाम | कन्हेर | पावडर पफ/ कॅलेंड्रा |
|---|---|---|---|---|
| ०१ | पटेल नर्सरी, नाशिक | २५०.०० | १५.०० | २०.०० |
| ०२ | विश्वकर्मा रोझ नर्सरी, साकुरी | १५०.०० | २०.०० | ३०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | राम  नर्सरी, | २००.०० | १२.०० | १२.०० |
| ०४ | आर.के जी गार्डनर सिन्नर | १५०.०० | २०.०० | २५.०० |
| ०५ | रोझेस  नर्सरी, वडोदरा | १७५.०० | १८.०० | १८.०० |
| ०६ | क्रियटीव्ह एन्टरप्राईज, पुणे | १६०.०० | १७.०० | २०.०० |
| ०७ | सुख शांती नर्सरी, मुंबई | ६३.७० | ०९.१० | ०९.८० |
| ०८ | बाबुलाल नर्सरी, नाशिक | १५०.०० | १९.०० | २२.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. पुजा पब्लिसीटी प्लॅस, पुणे यांचा प्रस्ताव मान्य करणेत येऊन त्यांचेकडून कार्यवाही होईपर्यंतचे काळात बगीचा विभागामार्फत काही तात्पुरते स्वरुपात झाडे लावण्यात यावीत, असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.न. | पार्टीचे नाव | बॉटल पाम | कन्हेर | पावडर पफ/ कॅलेंड्रा |
|---|---|---|---|---|
| ०१ | पटेल नर्सरी, नाशिक | २५०.०० | १५.०० | २०.०० |
| ०२ | विश्वकर्मा रोझ नर्सरी, साकुरी | १५०.०० | २०.०० | ३०.०० |
| ०३ | राम  नर्सरी, | २००.०० | १२.०० | १२.०० |
| ०४ | आर.के जी गार्डनर सिन्नर | १५०.०० | २०.०० | २५.०० |
| ०५ | रोझेस  नर्सरी, वडोदरा | १७५.०० | १८.०० | १८.०० |
| ०६ | क्रियटीव्ह एन्टरप्राईज, पुणे | १६०.०० | १७.०० | २०.०० |
| ०७ | सुख शांती नर्सरी, मुंबई | ६३.७० | ०९.१० | ०९.८० |
| ०८ | बाबुलाल नर्सरी, नाशिक | १५०.०० | १९.०० | २२.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. सुख शांती नर्सरी, मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना रोपे पुरविणेकामी कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०३ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमा खर्च तक्ता सप्टेंबर- २००९**

**(ब) माहे सप्टेंबर, २००९ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे सप्टेंबर २००९ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे सप्टेंबर, २००९ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(A) माहे सप्टेंबर,२००९ मधील जमा रु. १५,०९,३०,९६५/- आणि खर्च रुपये १२,१८,५५,४८२/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील सप्टेंबर, २००९ रुपये २,९६,२४७/- चा तक्ता, दिनांक २८.१०.२००९ अखेर संस्थानची गुंतवणूक रुपये ३८९,००,७४,२९१/- चा तक्ता, माहे सप्टेंबर-ऑक्टेबर,२००९ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या एकूण अनुक्रमे रुपये ५८,८९५,५७०/- व रुपये ६७,४२४,१८३ देणगीचा तक्ता, माहे सप्टेंबर, २००९ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा रुपये २,५१,०५१/- चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८०१ नोंद घेण्यात आली.**

---

**०२. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ऑगस्ट,सप्टेंबर,२००९ या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे बाबत**

B) श्री साईबाबा रुग्णालयात माहे ऑगस्ट,सप्टेंबर,२००९ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये अनुक्रमे रुपये २०,२६,९२१/- व रुपये १६,५९,८०८/- देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८०१ नोंद घेण्यात आली.**

---

**०३.साईनाथ रुग्णालयात माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २००९ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

(C) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे सप्टेंबर-ऑक्टोंबर,२००९ मध्ये अनुक्रमे रुपये ३४,९८,९००/- व रुपये ३१,८०,३५०/- देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८०१ नोंद घेण्यात आली.**

---

**०४.श्रीसाईनाथ रुग्णालयात माहे सप्टेंबर- २००९ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(D) साईनाथ रुग्णालयात माहे सप्टेंबर,२००९ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना अंतररुग्ण रुपये ८९,४४४/- बाह्य रुग्ण रुपये ८३,३७१/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ५६,५००/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८०१ नोंद घेण्यात आली.**

---

**०५.माहे सप्टेबर, २००९ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(E) सप्टेंबर,२००९ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४२,६३१ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८०१ नोंद घेण्यात आली.**

---

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ८०१** (F) **नोंद घेण्यात येऊन,तक्ता ब मधिल खालीलप्रमाणे अंतिम बिले आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(०१) श्रीसाई प्रसादालयाकरिता गॅस सिलेंडर्स मॅफिोल्ड शेड उभारणेकामी,मे.रविंद्र रबर प्रॉडक्टस् ॲण्ड फॅब्रिकेशन,श्रीरामपूर यांचे रुपये ६,६३,७१५/- मात्रचे अंतिम बील आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(०२) श्रीसाई प्रसादालयाकरिता थर्मिक फ्ल्यूड हिटर रुमचे बांधकाम करणेकामी, मे.एस.पी.बोरा,कोपरगाव यांचे रुपये ७,०८,४२५/-मात्रचे अंतिम बील आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(०३) सिन्नर औद्योगिक वसाहत येथील संस्थानचे पालखी विसावा थांब्याचे उर्वरित बांधकाम करणेकामी, मे.श्रुती कंस्ट्रक्शन,नाशिक यांचे स्टील भावफरक रक्कम रुपये ७१,९०८/- मात्र सह एकूण रुपये ३२,६०,९९४/-मात्रचे अंतिम बील आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(०४) श्रीसाईबाबा हॉस्पिटल करिता २०० m३/day क्षमतेचे सांडपाणी प्रकिया सयंत्र उभारणेकामी मे.डेक्कन एन्व्हायरोमेंटल कंन्सल्टंटस् प्रा.लि.,पुणे यांचे रक्कम रुपये १,०८,२९०/- मात्रचे झालेल्या जादा खर्चासह एकूण रुपये १९,०३,७९०/-मात्रचे अंतिम बील आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(०५) श्री साईनाथ रुग्णालयाकरीता १५०m३ / day क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया संयत्र उभारणेकामाचे मे.डेक्कन एन्व्हायरमेंटल कन्सल्टंटस प्रा.लि.पुणे यांचे रक्कम रुपये २,१७,८४५/- मात्रचे झालेल्या जादा खर्चाससह एकूण रुपये १८,१६,६९५/- मात्र रकमेचे अंतिम बिल आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(०६) नवीन साईप्रसादालय येथील गॅस प्लॅन्ट करीता संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे कामाचे श्री मिलींद एस.पाचोरकर,नाशिक यांचे रक्कम रुपये ९३४/- मात्रचे झालेल्या जादा खर्चासह एकूण रुपये ३,६६,१५९/- मात्रचे अंतिम बील आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(०७) श्री साईनाथ रुग्णालय नुतनीकरण करणेकामी केस पेपर विभागाबाहेर शेड उभारणे कामाचे श्री एस.एन.गुंजेगांवकर, निघोज यांचे रक्कम रुपये १,१८,३५०/- मात्र रकमेचे अंतिम बिल आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(०८) श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरकरीता ऑक्सीजन रुमचे बांधकाम करणे कामाचे रक्कम रुपये ९३,८४०/- मात्र रकमेचे अंतिम बिल आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**०७.पाणी तपासणी अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(G) माहे सप्टेबर,२००९ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी

पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८०१ नोंद घेण्यात आली.**

---

**विषय नं.०४ सिक्युरिटी साहित्य खरेदीकामीचे दर (कमर्शिअल)निविदा उघडणे.**

**निर्णय क्र. ८०२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

(कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५ कॅथलॅब विभागाऐवजी आर्थोपेडीक ओ.टी.मध्ये इपॉक्सी फ्लोअरिंगचे काम करुन घेणेकामी प्राप्त कोटेशनधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब ओ.टी. पॅसेज, सि.व्ही.टी.एस., २ डी - इको रुम याठिकाणी असलेले कारपेट खराब झालेले असुन त्या ठिकाणी रुग्णांना जंतूसंसर्ग होऊ नये याकरीता Antimicrobial Properties असलेले कारपेट बसविणेकरीता अंदाजे रु.१,१०,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव तसेच अशा स्वरुपाची कामे करणाऱ्या विशेषीकृत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून काम करणेकरीता प्रस्ताव बांधकाम विभागामार्फत दि.०३/०१/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३/०१/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५(१०) अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात इपॉक्सी फ्लोअरींगचे काम करण्यास तसेच उर्वरीत भागात P.V.C. कारपेट बसविणेकामी रु.१,१०,०००/- चे खर्चास तसेच सदरचे काम कोटेशन मागवून करण्यास मान्यता मिळालेली आहे.

बांधकाम विभागाने दि.०५/०५/२००९ चे पत्रान्वये यापूर्वी ऑपरेशन थिएटरमधील इपॉक्सी फ्लोअरींगचे काम हॉस्पिटल विभागामार्फत करण्यात आलेले आहे त्याच धर्तीवर कॅथलॅब करीता इपॉक्सी फ्लोअरींगचे काम आपले विभागामार्फत करण्यात यावे तर उर्वरीत भागात P.V.C. कारपेट बसविण्याचे काम बांधकाम विभागामार्फत करण्यात येईल असे कळविले आहे.

कॅथलॅबमधील फ्लोअरींगचे कामाची संख्या अंदाजे ४२ चौ.मीटर इतकी आहे. सदरचे कामाकरीता दि. १४/०५/२००९ रोजीचे मंजुर टिपणीन्वये इकडील पत्र क्र. ६६९९ दि.०२/०६/२००९ अन्वये एकुण १३ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारकांकडून दि. २०/०६/२००९ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. परंतु त्यास अनुसरुन एकही कोटेशन प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा सदर अधिकृत विक्रेते / पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. ८४०४ दि.०७/०७/२००९ अन्वये स्मरणपत्र पाठवून कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे चार कोटेशन प्राप्त झालेले होते.

१. मे. ॲपल एअरकॉन, मुंबई (बंद कोटेशन)

२. मे. एअर बॉर्न क्लिन्लीनेस इंजिनीअर्स, मुंबई (प्रशासन शाखेकडून टपालामार्फत उघडून मिळाले)

३. मे. टेक्नो इंजिनिअरींग सर्व्हिसेस, मुंबई (ई-मेल व्दारे प्राप्त कोटेशन)

वरीलप्रमाणे प्राप्त कोटेशनमधील क्रमांक २ यांचे कोटेशन प्रशासन शाखेकडून टपालामार्फत उघडून मिळालेले आहे, अ.नं. ३ यांचे कोटेशन ई-मेल व्दारे प्राप्त झालेले आहे, तर मे.स्ट्राँगहोल्ड प्लँन्ट्स ॲन्ड कोटींग्स प्रा.लि. ठाणे यांनी मागणी पत्रक नसतांनी देखील फॅक्सव्दारे कोटेशन पाठविलेले आहे, ते देखील विचारात घेतलेले आहे.

वरीलप्रमाणे एक बंद कोटेशन दि.२४/०९/२००९ रोजी मा. उपकार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले असून त्यांचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेत सादर केला आहे. त्यामध्ये मे.स्ट्राँगहोल्ड प्लँन्ट्स ॲन्ड कोटींग्स प्रा.लि. ठाणे यांचे दर प्रती स्क्वेअर मिटर रु.९६८.४०असे निम्नतम येतात. त्यांचे दरानुसार एकूण ४२ स्क्वेअर मिटर इपॉक्सी फ्लोअरींगचे कामाकरीता रु.४०६,७२.८० इतका खर्च येईल.

परंतू कॅथलॅब ओ.टी. मध्ये Underground केबलींग असल्यामुळे ती वारंवार काढावी लागते. त्यामुळे सदर ईपॉक्सी फ्लोअरींग हे वारंवार काढावे लागेल व ते लवकर खराब होईल. त्यामुळे कॅथलॅब ओ.टी. मध्ये ईपॉक्सी फ्लोअरींग करणे ऐवजी PVC कारपेट करुन घेण्याची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत चालू आहे.

सबब उपरोक्त ईपॉक्सी फ्लोअरींगचे काम कॅथलॅब ऐवजी आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागात करुन घेता येईल. कारण आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागातील ईपॉक्सी फ्लोअरींग हे खराब झालेले आहे.

त्यानुसार सदरचे कामाकरीता उपरोक्त कोटेशन धारकांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले होते त्यापैकी मे. ॲपल एअरकॉन, मुंबई व मे.स्ट्राँगहोल्ड प्लँन्ट्स ॲन्ड कोटींग्स प्रा.लि. ठाणे हे सभेसाठी उपस्थित होते पैकी मे.स्ट्राँगहोल्ड प्लँन्ट्स ॲन्ड कोटींग्स प्रा.लि.

ठाणे हे त्यांचे काही कारणास्तव चर्चा / वाटाघाटीपूर्वीच निघून गेले मे. ॲपल एअरकॉन, मुंबई यांचेशी झालेल्या चर्चा / वाटाघाटीचा तपशील खालीलप्रमाणे झ

| S.N. | Description | Qty. | Airborne Cleanliness Engineers, Mumbai | | | Apple Aircon, Mumbai. | | | Techknow Engineering Services, Mumbai | | | Stronghold Paints & Coatings, Thane | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Description | Rate Per Sq.m. | Total Amt. in Rs. | Description | Rate Per Sq.m. | Total Amt. in Rs. | Description | Rate Per Sq.m. | Total Amt. in Rs. | Description | Rate Per Sq.m. | Total Amt. in Rs. |
| 1 | Epoxy Flooring for Cath Lab Department | 42 Sq.m. | Self leveling joint less type epoxy flooring to be carried out on existing floors before lying the epoxy coat floor surface will be properly cleaned, leveled & prepared. The thickness of the epoxy coating shall be between 2-3 mm with minimum thickness of not less than 2mm anywhere. | 1150.00 | 48300.00 | **Make & Brand Name: CIPY Polyurethane -** | 1615.286 | 67842.01 | **Epoxy of CIBA brand.** | 1392.61 | 58489.62 | 2mm thk Epoxy Flooring | 968.40 | 40672.80 |
| | | | | | | 2mm thk Epoxy Flooring | | | 1. The surface preparation for epoxy application by means of mechanical grinder. | | | Scope of work. | | |
| | | | | | | Scope of work. | | | | | | 1) Cleaning of the surface | | |
| | | | | | | 1. We have considered floor surface is properly leveled. | | | 2. Application of water base primer of Epoxy supreme polimar brand | | | 2) Application of one coat of Epoxy Primer, | | |
| | | | | | | 2. Surface preparation on floor. | | | | | | 3) Application of epoxy Floor Coating | | |
| | | | | | | 3. Application of Epoxy Primer | | | 3. After drying for eight to twelve hrs apply 2mm thick self leveling epoxy of your colour choice trowelled to smooth surface. | | | | | |
| | | | | | | 4. Application of 1mm Skirt by using pure epoxy and quartz sand. | | | | | | | | |
| | | | | | | 5. Application of 2mm Thk Epoxy Leveling. | | | | | | | | |
| | | | | | | 6. Material Composition | | | | | | | | |
| | | | | | | a) Base Resin | | | | | | | | |
| | | | | | | b) Activator | | | | | | | | |
| | | | | | | c) Pigments (Color) | | | | | | | | |
| | | | | | | d) Filler (Quartz) | | | | | | | | |
| Rate after Negotiation | | | | | | | | | | | | | | |
| | | | Absent | | | | 1450.00 | 60900.00 | Absent | | | Absent | | |

**निर्णय क्र.८०३ यावर चर्चा होऊन मे. ॲपल एअरकॉन, मुंबई यांनी इतर कोटेशनधारकांच्या तुलनेत इपॉक्सीसाठी विशिष्ट प्रकारचे मटेरीयलचा अतिरिक्त थर दिलेला आहे (Application of १mm Skirt by using pure epoxy and quartz sand.) त्यामुळे सदरचे काम अगदी मजबूत होऊन जास्त दिवस टिकेल. त्यामुळे निम्नतम दरांचा विचार न करता त्यांचे चर्चा / वाटाघाटीनंतरचे दर प्रती Sqm १४५०.०० स्विकारण्यात येऊन ईपॉक्सी फ्लोअरींगचे काम आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर**

**विभागामध्ये करण्यात येऊन याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष रु.६०,९००/- मात्रचे खर्चास व कामास मंजूरी देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०६** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ई.एन.टी विभागासाठी इन्डोस्कोप व कॅमेरा खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटरमध्ये दि. ०६.१२.२००८ व दि. १२.१२.२००८ अन्वये ई.एन.टी. व जनरल सर्जरीच्या शस्त्रक्रियासाठी विविध प्रकारचे एन्डोस्कोप तसेच एक टेलेकॉम कॅमेऱ्याची मागणी केलेली होती.

| Sr.No. | Description | Make | Qty. |
|---|---|---|---|
| 1 | Nasal Endoscope 30$^0$ | Karl Storz | 01 |
| 2 | Nasal Endoscope 120$^0$ | Karl Storz | 01 |
| 3 | Telecam 20212030 PAL | Karl Storz | 01 |

उपरोक्त इन्डोस्कोप व कॅमेरासाठी रु.७,११,७९५/- इतका खर्च अपेक्षित होता, त्यानुसार सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०८/०३/२००९ निर्णय क्र.२७९ अन्वये अंदाजे रु.७,११,७९५/- चे खर्चास व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी दि. ०८/०३/२००९ चे मा. व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरीन्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत विहीत पध्दतीने टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई व पुणे आवृत्ती या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०६/०४/२००९ ते २५/०४/२००९ अखेर शिर्डी कार्यालयात ३ तर मुंबई कार्यालयात निविदा ७ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व दि. २७/०४/२००९ अखेर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत १० पुरवठा धारक / अधिकृत विक्रेत्यांना इकडील पत्र क्र.३८९८ दि. ०४/०४/२००९ अन्वये अवगत करण्यात आले होते. त्यास अनुसरुन तीन निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्या खालीलप्रमाणे -

१. M/s. Chimco Bio-Medical Engi. Co., Mumbai
२. M/s. Endosys International, Mumbai
३. M/s. Eagle Medical System Pvt. Ltd., New Delhi

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या सिलबंद तांत्रिक निविदा दि.१७.०५.२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे. तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. १ व २ हे ई.एन.टी. विभागाची मागणी असल्याने त्यावर डॉ.कुलकर्णी - ई.एन.टी. सर्जन -श्री साईनाथ रुग्णालय यांचा अभिप्राय तर अ.नं.३ हा जनरल सर्जरीसाठी लागणार असल्याने डॉ.राम नाईक - जनरल सर्जन - श्री साईनाथ रुग्णालय यांचा अभिप्राय घेण्यात आला आहे. दोन्ही डॉक्टरांनी Karl Storz कंपनीचे इन्डोस्कोपीक इन्स्ट्रुमेंट व कॅमेरा घेण्याची शिफारस केलेली आहे. कारण आपणाकडे पुर्वीचे इन्स्ट्रुमेंट ही देखील Karl Storz कंपनीचे आहे.

तर Commercial निविदा ह्या दि.१९/०७/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या आहेत. तीनही निविदाधारकांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे. सदर तक्त्यामध्ये अनुक्रमे M/s. Chimco Bio-Medical Engi.Co., Mumbai यांनी Karl Storz या कंपनीचे, M/s. Eagle Medical System Pvt. Ltd., New Delhi यांनी Richard Wolf Gmbh, Germany या कंपनीचे तर M/s. Endosys International, Mumbai यांनी Schoelly या कंपनीचे दर दिलेले आहेत. आपणाकडे Karl Storz या कंपनीचे इन्स्ट्रुमेंट असल्यामुळे त्याच कंपनीचे (Karl Storz या कंपनीचे) इन्डोस्कोपीक इन्स्ट्रुमेंट व कॅमेरा घ्यावा लागणारा आहे.

सदरहू प्राप्त तिनही निविदाधारकांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले आहेत, त्यास अनूसरुन M/s. Chimco Bio-Medical Engi. Co., Mumbai व M/s. Eagle Medical System Pvt. Ltd., New Delhi हे सभेपुढे उपस्थित होते त्यांनी देऊ केलेली सूटीचा तपशील खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.

| S. N. | Description | Qty. | Chimco Bio-Medical Engi. Co., Mumbai. | | Eagle Medical Systems Pvt.Ltd., New Delhi. | | Endosys International, Mumbai | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. |
| | | | Make - Karl Storz | | Make - Richard Wolf Gmbh,Germany | | Make - Schoelly | |
| 1 | Wide angle forward oblique Telescope 30$^0$, enlarged view, diameter 4mm, length 18cm, Auto clavable, fiber optic light transmission incorporated. | 1 | HOPKINS II Forward Oblique- Telescope 30$^0$, enlarged view, Ø 4 mm. autoclavable, fiber optic light transmission incorporated, Color code: red | 288765.00 | Panoview Plus Telescope, 4mm 0 Degree Angle of View | 150662.72 | Wide forward oblique Telescope 30 Degree, enlarg view, diameter 4mm, length 175mm, autoclavable, fiber optic light transmission incorporated. | 81000.00 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | Retrospective Telescope 1200, enlarged view, diameter 4mm, length 18cm, autoclavable, fiber optic light transmission incorporated. | 1 | HOPKINS II Retrospective Telescope 1200, enlarged view. Ø4 mm, autoclavable, fiber optic light transmission incorporated. Color code: white | 288765.00 | Panoview Plus Telescope 4mm 90 Degree Angle of View, Working Length 175mm. | 170324.96 | N.A. | |
| 3 | Single Chip camera head with 2 freely programmable camera head buttons, Color system PAL, with integrated parfocalzoom focal length f = 25-50mm (2x) | 1 | TELECAM SL II Camera Control Unit, (CCU), color system PAL/NTSC, power supply: 100-240VAC, 50/60 Hz With integrated Karl Storz Image Processing Module 20213020 Telecam SL II Camera Control Unit (CCU) 400A Mains Cord 536 MK BNC Connecting Cable. length 180 cm 547 S S-VHS (Y/C) Connecting Cable, length 180cm 202210702 Connecting Cables, for connecting video- printers 20200130U Keyboard w, us-english character set 20040082 DVCable, 500 cm. 6 pin to 4 pin | 509929.00 | CCD Endocam 5512, PAL Colour System 100-240VAC.50/60Hz. Comprising Camera Controller & Camera Head Video Cable Shielded S-VHS Cable, Power Cable +*85261.272 Riwo Lens With C-Mount Connector Immersible Focal Distance F=27MM | 338000.00 | Single chip CCD Camera, 1/2" CCD Chip, Light weight and soakable Camera Head, Horizontal resolution>460 lines, Minimum sensitivity 2 Lux =fl.4, Camera control unit should have white balance, windows, Brightness and contrast adjustment controls, BNS and S- Video outputs. Cl 301 with Zoom Endocoupler 18 to 50mm | 331875.00 |
| | | | TELECAM Camera Head, color system PAL.with integrated Parfocal Zoom Lens, f = 25 mm - 50mm | 287201.00 | | | | |
| _ | **Total Amt. in Rs.** | _ | _ | **1374660.00** | _ | **658987.68** | _ | **412875.00** |
| _ | | | | **OR** | | | | |
| | **Optional Item** | | | | Riwo Zoom Lens with C-Mount Connector and Lock Mechanism, Immersible and auto cleavable, F=21-36MM | 143660.00 | Single chip CCD Camera, 1/2" CCD Chip, Light weight and soakable Camera Head, Horizontal resolution>460 lines, Minimum sensitivity 2 Lux = fl.4, Camera control unit should have white balance, windows, Brightness and contrast adjustment controls, BNS and S- Video outputs. Cl 301 | 264375.00 |
| _ | **Optional Item Amt. in Rs.** | _ | _ | _ | _ | **143660.00** | _ | **264375.00** |
| | **Warranty period** | | One Year | | One Year | | Not Mentioned | |
| | **(AMC)** | | Rs. 5% + Service Tax as applicable on the total value in that year | | 2% of the cost of the Equipment | | | |
| | | | Rs 6% + Service Tax as applicable on the total value in that year | | 2.2% of the cost of the Equipment | | | |
| | | | Rs. 7% + Service Tax as applicable on the total value in that year | | 2.42% of the cost of the Equipment | | | |
| | | | Rs. 8% + Service Tax as applicable on the total value in that year | | 2.66% of the cost of the Equipment | | | |
| | | | Rs. 9% + Service Tax as applicable on the total value in that year | | 2.92% of the cost of the Equipment | | | |
| | | | (Current Service Tax is @12.36%) Extra | | | | | |
| | | | i) The A.M.C. will cover preventive maintenance service. The necessary spare parts cost will be charged extra. ii) Four visits during the year and two additional visits as per your call. Any additional breakdown service complaint will be charged @ Rs.1500/- per call. iii) A.M.C. Charges will be payable at the beginning of the year. | | | | | |
| | **(CMC)** | | Rs. 10% + Service Tax as applicable on the total value in that year | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rs. 11% + Service Tax as applicable on the total value in that year | | | | | |
| | | | Rs. 12% + Service Tax as applicable on the total value in that year | | | | | |
| | | | Rs. 13% + Service Tax as applicable on the total value in that year | | | | | |
| | | | Rs. 14% + Service Tax as applicable on the total value in that year | | | | | |
| | | | Four visits during the year and two additional visits as per your call. Any additional breakdown service complaint will be charged @ Rs.2500/- per call. | | | | | |
| | **Rate After Negotiation --** | | | | | | | |
| | **Total Value of Rs.--** | | | **975000.00** | | **593089.00** | **Absent** | |
| | **AMC & CMC** | | AMC & CMC Charges as mentioned above. | | AMC & CMC Charges as mentioned above. | | | |
| | | | | | | | | |

**निर्णय क्र.८०४ यावर चर्चा होऊन आपणाकडे पुर्वीचे इन्स्ट्रुमेंट देखील Karl Storz कंपनीचे असल्यामुळे त्याचेशी संलग्न असणारे उपरोक्त इन्स्ट्रुमेंट असून ती आपणास Karl Storz कंपनीचीच घ्यावी लागणार आहे. त्यामुळे M/s. Chimco Bio-Medical Engi. Co., Mumbai यांचे दर रु.९,७५,०००/- मात्र स्विकारण्यात येऊन त्यांचेकडून सदर खरेदी करावी, तसेच वॉरंटी कालावधी संपल्यानंतर उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे त्यांचेकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०७ श्री साईबाबा भक्तनिवासस्थान १०० खोल्यांचे नुतनीकरण करणेकामी प्राप्त झालेल्या (Financial Bid) निविदा उघडून निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान मधील पहिल्या टप्प्यातील १०० खोल्यांचे नुतनिकरण करणेकामी येणारे अंदाजे रु.१,८०,२१,६३५.०० मात्रचे अपेक्षीत खर्चासह किरकोळ विद्युतीकरण इत्यादी अनुषंगिक कामांसाठी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास दि.२१/०६/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रमांक ५३१ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

याकामी आर्कीटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर यांनी या कामाचे सविस्तर एस्टीमेट सादर केले आहे. त्यामध्ये टॉयलेटचे डक्टसाठी टर्बो व्हेंटीलेशन सिस्टीम व प्लंबिंगसाठी उच्च दर्जाचे मटेरियल गृहीत धरून रु. १,८७,४६,७९६.४० मात्र रकमेचे सुधारीत अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यामुळे रु. १०,७८,४६०.४० इतका जादा खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr.No | Description | No. of Rooms | Estimated cost of one room | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | A- type Room | 87 | 1,76,232.98 | 1,53,32,269.26 |
| 02 | B- type Room | 13 | 1,72,041.69 | 22,36,541.97 |
| 03 | Staircase | 01 | 6,81,735.17 | 6,81,735.17 |
| 04 | Turbo ventilators for Air duct | 25 | 19,850.00 | 4,96,250.00 |
| | | **Total Estimated Cost Rs.:** | | **1,87,46,796.40** |

उपरोक्त प्रमाणे सुधारीत अंदाजपत्रकानुसार तयार केलेल्या निविदेनुसार वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन दि. ०२.०९.२००९ ते १६.०९.२००९ अखेर कोरे निवीदा फॉर्म घेऊन जाणे व सदरच्या विक्री होणाऱ्या सिलबंद निवीदा दि. ३०.०९.२००९ रोजी सादर करणेबाबत प्रसिध्दी देण्यात आली होती. त्यानूसार खालील निवीदाधारकांनी विहीत मुदतीत कोऱ्या निवीदा फॉर्म विकत घेतले होते.

| Sr. No. | Name of Tenders | Sr. No. | Name of Tenders |
|---|---|---|---|
| 01 | Shapoorji Pallonji & Co. Ltd., Nashik | 04 | M/s. R.M. katore, Sangamner |
| 02 | M/s. Golani Builders,Mumbai | 05 | SYMBEE Construction Co., Pune |
| 03 | Oriental Construction Company, Nashik. | 06 | Swastik Associates, Aurangabad |

**ब)** उपरोक्त निवीदाधारकांनी विहीत मुदतीत कोरे निवीदा फॉर्म घेतल्या असून विहीत मुदतीत खालील निवीदा सादरकर्त्यांनी सिलबंद निवीदा सादर केल्या आहेत.

| Sr.No. | Name of Tenders |
|---|---|
| 01 | M/s. Golani Builders,Mumbai |
| 02 | Oriental Construction Company, Nashik. |
| 03 | M/s. R.M. katore, Sangamner |
| 04 | SYMBEE Construction Co., Pune |

वरिल प्रमाणे ०४ निवीदाधारकांनी विहीत मुदतीत सादर केलेल्या निवीदांचे Technical Bid (लिफाफा क्र. ०१) मा. कार्यकारी अधिकारी, आर्किटेक्ट व ठेकेदार यांचे समक्ष दिनांक १५.१०.२००९ रोजी उघडण्यात आले असून उघडलेल्या Technical Bid (लिफाफा क्र. ०१) ची सविस्तर तपासणी करुन पात्र निवीदा सादरकर्त्यांचा अहवाल सदरहू प्रकल्पाचे आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर यांनी त्यांचेकडील दिनांक २६.१०.२००९ रोजीचे पत्रान्वये सादर केला असून सदरहू अहवालामध्ये वरिल प्रमाणे चारही निवीदा सादरकर्ते पात्र असलेबाबत कळविले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे चारही निवीदा सादरकर्त्यांचे देकार (Financial Bid) (लिफाफा क्र. ०२) आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.नं.** | **निविदासादकर्त्याचे नाव** | **निविदेतील दर (एस्टिमेट दरापेक्षा)** | **चर्चेअंती देऊ केलेले दर (एस्टिमेट दरापेक्षा)** |
|---|---|---|---|
| 01 | M/s. Golani Builders, Mumbai | 35.35 % अधिक | 33.35% अधिक |
| 02 | Oriental Construction Company, Nashik. | 13.91 % अधिक | 12 % अधिक |
| 03 | M/s. R.M. katore, Sangamner | 31.50 % अधिक | 21.21 % अधिक |
| 04 | SYMBEE Construction Co., Pune | 18 % अधिक | 17 % अधिक |

**निर्णय क्र. ८०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, Oriental Construction Company, Nashik. यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०८ श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टर्स व इतर कर्मचाऱ्यांचे वाहनांसाठी पार्किंग शेड करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय धर्मशाळा क्र.०१ व ०२ च्या इमारतीत कार्यरत आहे. श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता वाहन पार्किंग करणेसाठी शेड बनविणेसाठी वैद्यकिय अधिक्षिका यांनी कळविले होते. त्यानुसार श्री साईनाथ रुग्णालयाचे परिसरात ३५m x ७m साईजचे शेड करणेस व त्यासाठी येणारे रक्कम रुपये ४,५०,०००.०० मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०८/२००९ रोजीचे सभेत मान्यता मिळाली आहे.

इकडील विभागाचे जा.क्र. एसएसएसटी/ बांध/ ११६५५/ ०९, दि. १७/०९/२००९ रोजीचे कोटेशन मागणी पत्राने स्थानिक १२ ठेकेदारांकडून सिलबंद कोटेशन मागविण्यात आले होते. त्यापैकी खालील तिन ठेकेदारांनी कोऱ्या निविदा विकत घेतल्या व दि. २६/०९/२००९ पर्यंतच्या अंतिम मूदतीत सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१ | श्री.मिलींद एस.पाचोरकर, नाशिक |
| ०२ | महेंद्र आर.टाटीया, श्रीरामपूर |
| ०३ | श्री.ईश्वर पंढरीनाथ जंजिरे, श्रीगोंदा |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.नं.** | **निविदासादकर्त्याचे नाव** | **निविदेतील दर (एस्टिमेट दरापेक्षा)** | **चर्चेअंती देऊ केलेले दर (एस्टिमेट दरापेक्षा)** |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.मिलींद एस.पाचोरकर,नाशिक | ०५ टक्के अधिक | ०४ टक्के अधिक |
| ०२ | महेंद्र आर.टाटीया,श्रीरामपूर | ६.३० टक्के अधिक | ४.३० टक्के अधिक |
| ०३ | श्री.ईश्वर पंढरीनाथ जंजिरे, श्रीगोंदा | ४.९९ टक्के अधिक | ४.९९ टक्के अधिक |

**निर्णय क्र.८०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.मिलींद एस.पाचोरकर,नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०९ संस्थानतर्फे शिर्डी येथील बसस्थानकाचे बांधकाम प्रकल्पासाठी नेमणूकीकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** दि. ०७/०७/२००८ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ५७६ अन्वये शिर्डी येथील नियोजीत बसस्थानक इमारतीचे सुधारीत आराखड्यास व त्यानुसार बांधकामासाठी येणारे अंदाजित रक्कम रुपये ७.६६ कोटी मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेत आली आहे. तसेच सदरहू प्रकल्पासाठी आर्किटेक्ट म्हणून काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक हे मा. अध्यक्ष महोदय यांचे सूचनेनुसार सुरुवातीपासून काम पहात आहेत. त्यांची पुर्वीचेच अटी व शर्तीवर कामाच्या किंमतीचे २% इतक्या आर्किटेक्ट फी वर नियुक्ती करणेस मान्यता देणेत आली. तसेच प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सदरहू प्रकल्प हा मोठ्या स्वरुपाचा असल्याने याचे प्रकल्प व्यवस्थापन (Project Management Consultancy) हे प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे. काबरे चौधरी आर्किटेक्टस, नाशिक यांनी उपरोक्त निर्धारीत फी मध्येच

स्विकारणेबाबत त्यांना विनंती करणेत यावी. त्यांनी सदरहू विनंती मान्य न केल्यास याकामी स्वतंत्र व्यवस्थापन सल्लागार नेमणेकामी मा. व्यवस्थापन समितीपुढे प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांना जा.नं. १४५६३/२००८ दि. ०३/१०/२००८ रोजीचे पत्रान्वये शिर्डी बसस्थानक विकसीत करणेकामी आर्किटेक्ट म्हणून नेमणूक केल्याचे कळविले आहे. तसेच निर्धारीत फी मध्येच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून सेवा पुरविणेबाबत विनंती करण्यता आली आहे. आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांनी याबाबत दि. २१/१०/२००८ रोजीचे पत्रान्वये कळविले की, २% इतक्या फी मध्ये ते फक्त आर्किटेक्चरल सेवा पुरवतील व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवेकरीता संस्थानने दुसऱ्या संस्थेची नेमणूक करावी असे त्यांनी कळविले आहे.

दि. १५/११/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ८४६ अन्वये शिर्डी बसस्थानक प्रकल्पासाठी स्वतंत्र सल्लागाराची नेमणूक करावयाचे प्रस्तावित असल्याने आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांचेशी चर्चा करुन त्यांना योग्य ती फी देणे तसेच विषयांकीत प्रकल्पाचे मोठे स्वरुप लक्षात घेता दैनंदिन देखरेख, ठेकेदार यांची बिले तपासून प्रमाणीत करणे, प्रकल्पाची प्रगती व दर्जावर नियंत्रण ठेवणे याकरीता स्वतंत्र प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नेमणूक करणेसाठी अर्ज तथा प्रस्ताव मागविणे करीता मान्यता देणेत आली आहे.

सदरहू निर्णयानुसार विषयांकित सल्लागार नेमणुकीसाठी खालील सल्लागारांकडून दि. २६/१०/२००९ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले होते.

| | |
|---|---|
| ०१. टी सी ई कन्सल्टींग इंजिनियर्स लि., पुणे | ०२.किर्लोस्कर कन्सल्टंटस् लि., पुणे |
| ०३. डॉर्श कन्सल्ट इंडिया प्रा. लि., मुंबई | ०४. कुशमन ॲण्ड वेकफिल्ड इंडिया प्रा.लि., पुणे |
| ०५. एडीफीस कन्सल्टंट प्रा.लि., पुणे | ०६. अरहम कन्स्ट्रोटेक प्रा.लि., नाशिक |
| ०७. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेन्ट प्रा.लि., पुणे | |

उपरोक्तपैकी खालील तिन सल्लागारांनी विहित मूदतीत सिलबंद प्रस्ताव सादर केलेले आहेत.

| अ.नं. | सल्लागारांचे नांव |
|---|---|
| ०१ | अरहम कन्स्ट्रोटेक प्रा.लि., नाशिक |
| ०२ | युनीसन प्रोजेक्ट मॅनेजमेन्ट प्रा.लि,पुणे |
| ०३ | किर्लोस्कर कन्सल्टंटस लि., पुणे |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

(निविदा मंजूर रक्कम रु.७.६६ कोटी)

| अ.नं. | निविदासादकर्त्याचे नाव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | अरहम कन्स्ट्रोटेक प्रा.लि., नाशिक | ४.६ %अधिक सर्व्हिस टॅक्स एक्स्ट्रा | ३.२५% अधिक सर्व्हीस टॅक्स एक्स्ट्रा |
| ०२ | युनीसन प्रोजेक्ट मॅनेजमेन्ट प्रा.लि,पुणे | ४.० %अधिक सर्व्हिस टॅक्स एक्स्ट्रा | ४.० % अधिक सर्व्हिस टॅक्स एक्स्ट्रा |
| ०३ | किर्लोस्कर कन्सल्टंटस लि., पुणे | २३,२५,०००/- सर्व्हिस टॅक्स एक्स्ट्रा | २२,०८,७५०/-अधिक सर्व्हीस टॅक्स एक्स्ट्रा |

सदहू विषयावरील चर्चेचेवेळी मे.काबरे चौधरी आर्कीटेक्टस यांचे आर्किटेक्ट चौधरी सभेपूढे उपस्थित होते. त्यांचेशी सविस्तर चर्चा करण्यात आली. सदरचे प्रकल्प व्यवस्थापन आर्किटेक्ट यांनीच करावे त्यासाठी त्यांना एकूण २.७५% फी अधिक सर्व्हीस टॅक्स एक्स्ट्रा आदा करण्यात येईल असे आर्किटेक्ट चौधरी यांना सांगणेत आले असता त्यांनी त्यासाठी सहमती दर्शविली.

**निर्णय क्र.८०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रकल्पासाठी आर्किटेक्चरल तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्ला सेवा पुरविणेसाठी काबरे चौधरी आर्किटेक्ट यांना प्रकल्पाच्या किंमतीचे २.७५% इतकी फी अधिक सर्व्हीस टॅक्स एक्स्ट्रा आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१० मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मधील वर्ग ४ कर्मचारी निवासस्थान इमारतीचे बाहेरील बाजूस कंम्पाऊंड भिंतीचे बांधकामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** संस्थान कर्मचाऱ्यांकरीता मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नंबर १६९ मधिल ६० आर क्षेत्रात आठ निवासस्थान इमारतीचे बांधकाम सन २००७ मध्ये पुर्ण करण्यात आलेले असुन सदर इमारती कर्मचाऱ्यांचे निवासाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीचे पुर्व व दक्षिण बाजुस शेतीमहामंडळाचे शेती असून पश्चिम बाजुस खाजगी शेती आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९/०७/२००९ रोजीचे सभेत निर्णय क्र.६१२ अन्वये गट नं. १६९ मधील कर्मचारी निवासस्थान इमारतीचे बाहेरील बाजूस कंपाउंड भिंतीचे बांधकामासाठी येणारे रुपये १६,४१,५६१.०० मात्रचे खर्चास व याकामी निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. कोऱ्या निविदा फॉर्मची विक्री दि. ०८/१०/२००९ ते दि. १५/१०/२००९ अखेर व सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि. २३/१०/२००९ अखेर दुपारी ४.०० पर्यंत ठेवणेत आली होती. कोऱ्या निविदांची विक्री व विहीत मूदतीत प्राप्त झालेल्या सिलबंद निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

खालील निविदाधारकांनी विहीत मूदतीत कोरे निविदा फॉर्म विकत घेऊन विहीत मूदतीत सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव |
|---|---|
| ०१ | संतोष गुंजेगावकर, निमगांव |
| ०२ | मे.आर.एल.भुतडा, कोपरगांव |
| ०३ | मिलींद एस पाचोरकर, काकासाहेब नगर ता. निफाड |
| ०४ | इंजि. वाय.एस. पाटील, कोपरगांव |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादकर्त्याचे नाव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | संतोष गुंजेगावकर, निमगांव | १.५ % अधिक | निविदा दरात |
| ०२ | मे.आर.एल.भुतडा, कोपरगांव | निविदा दरात | ४.२० % कमी |
| ०३ | मिलींद एस पाचोरकर, काकासाहेब नगर ता. निफाड | १० % अधिक | ९ % अधिक |
| ०४ | इंजि. वाय.एस. पाटील, कोपरगांव | १५ % अधिक | अनुपस्थित |

**निर्णय क्र.८०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.आर.एल.भुतडा,कोपरगाव यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.११ नवीन भक्तनिवास परिसर येथील कंम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करणेकामी प्राप्त झालेल्या निविदांवर निर्णय घेणे .**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा भक्तनिवास्थान (५०० रुम) येथे नगर - मनमाड रोडचे बाजुने लोखंडी एम.एस. ग्रीलचे रेलींग/ कंपाउंड करण्यात आले आहे. सदरची रेलींग काही भागात गंजून तुटलेले आहे. संरक्षण विभागाने दि. ०८.०४.२००९ रोजीचे पत्रान्वये सदरहू रेलींगचे ठिकाणी कायमस्वरुपी कंपाउंड भिंतीचे बांधकाम करुन मिळण्याचे कळविले आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.२१.०६.२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करण्यात आला. सदरचे नि.क्र. ५६१ अन्वये सदरचे काम करणेस इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन स्थानिक ठेकेदार यांना पत्र देऊन निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीचा कालावधी हा दि. १८.०९.२००९ ते दि. ३०.०९.२००९ असा ठेवण्यात आला होता. विहीत मुदतीत खालील ०५ ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

| ठेकेदाराचे नांव | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१.इंजि. योगेश सुरेश पाटील, कोपरगांव | ०२.संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज |
| ०३.मिलींद एस. पाचोरकर, निघोज | ०४.महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपूर |
| ०५.श्री. आय. पी. जंजीरे, श्रीगोंदा | |

सिलबंद निविदा सादर करणेसाठी ठेकेदार यांना दि. ०३.१०.२००९ कार्यालयीन वेळेपर्यंत मूदत देण्यात आली होती. विहीत मूदतीत खालील ०४ ठेकेदार यांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदारांचे नाव | आवक नंबर | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मिलींद एस. पाचोरकर, नाशिक | ३०७२५ | ०२.१०.२००९ |
| २ | संतोष नागनाथ गुंजेगावकर, निघोज | ३०८५६ | ०३.१०.२००९ |
| ३ | श्री.आय.पी. जंजीरे, श्रीगोंदा | ३०८५७ | ०३.१०.२००९ |
| ४ | महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपूर | ३०८५८ | ०३.१०.२००९ |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादकर्त्याचे नाव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | मिलींद एस. पाचोरकर, नाशिक | १० % अधिक | ७ % अधिक |
| ०२ | संतोष नागनाथ गुंजेगावकर, निघोज | ३ % अधिक | निविदा दरात |
| ०३ | श्री.आय.पी. जंजीरे, श्रीगोंदा | २.९९ % अधिक | २.९९ % अधिक |
| ०४ | महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपूर | ४.५ % अधिक | २ % अधिक |

**निर्णय क्र.८०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.संतोष नागनाथ गुंजेगावकर,निघोज यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१२** **मौजे नांदुर्खी ता.राहाता येथील नियोजित रुग्णालयाचे बांधकामासाठी सल्लागार नियुक्ती करीता प्राप्त झालेल्या निविदावर निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८/१०/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७४८ (अ) अन्वये मौजे नांदुर्खी, ता. राहाता येथे गट नं. ३३१ व ४४६ मध्ये संस्थानला मिळणाऱ्या जमिनीत उभारावयाचे नियोजीत रुग्णालयासाठी (Super Speciality & General Hospital) Detailed Project Report तयार करणे व इतर अनुषंगिक कामांसाठी सल्लागार नियुक्तीकरीता मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमान पत्रात विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन सल्लागार कंपन्यांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. यावेळी २१ सल्लागार कंपन्यांनी प्रस्ताव सादर केले होते. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २१/०६/२००९ रोजीचे सभेपुढे सदर सल्लागारांचे तांत्रीक माहितीचे लिफाफे उघडण्यात आले. सदरहू सभेतील निर्णय क्र. ५२७ अन्वये त्यातील माहितीचे छाननीअंती पूर्वपात्रताधारक सल्लागारांची संक्षिप्त निवड यादी तयार करण्यात यावी, असे ठरले.

उपरोक्त व्यवस्थापन समिती निर्णयानुसार सल्लागारांनी सादर केलेली तांत्रिक माहिती व कागदपत्रांची तपासणी केली असता जे सल्लागार पूर्वपात्रता अटी बहूतांश स्वरुपात पूर्ण करतात अशा दहा सल्लागारांकडून त्यांनी पूर्ण केलेले कामे व Turn Over बाबत आवश्यक जादा माहिती व कागदपत्रे मागविणेत आली. त्याचे अनुषंगाने प्राप्त झालेली माहिती व कागदपत्रांची छाननी करण्यात आली व त्यानुसार प्रस्ताव सादर केलेल्या एकविस सल्लागारांपैकी खालिल दहा सल्लागारांचे Financial Bid दि. ०५/०९/२००९ रोजी झालेल्या मा. उपसमिती सभेपुढे उघडण्यात आले.

| S.No | Name of the Consultant |
|---|---|
| 01 | Coteba India Pvt; Ltd. Mumbai |
| 02 | HSCC (I) Ltd; Noida (A Govt. of India enterprise) |
| 03 | Rice Daubney, Mumbai |
| 04 | TCE Consulting Engineers Ltd; New Delhi, In Association with-Hosmac India Pvt. Ltd; Mumbai |
| 05 | Edifice Consultants Pvt Ltd; Pune |
| 06 | Synergy PDS Pvt. New Delhi |
| 07 | Kirloskar Consultants Ltd; Pune |
| 08 | Cannon Design International Pvt. Ltd; Mumbai |
| 09 | Cushman & Wakefield Pvt. Ltd; Pune |
| 10 | Feedback Ventures Pvt. Ltd; Gurgaon & TRC + BSA |

सदरहू उपसमिती सभेत खालीलप्रमाणे शिफारस करण्यात आली आहे.

उपरोक्त सल्लागारांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो मा. डॉ. पी.एल. तिवारी, मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर, मा. श्री. पांडूरंग गमाजी अभांग, मा. श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा. श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर व मा. वैद्यकिय संचालक यांच्या स्थानिक समितीपुढे सादर करुन त्यांची छाननी करुन त्यातील ०३ सल्लागारांना व्यवस्थापन समितीचे सभेपुढे समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे. वरीलप्रमाणे उपसमितीची शिफारस दि. १९/०९/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ५३२ (१५) अन्वये मान्य करण्यात आली आहे.

मा. कार्यकारी अधिकारी सो., मा. वैद्यकिय संचालक, मा. उप वैद्यकिय संचालक व मा. वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी उपरोक्त दहा सल्लागारांचे Technical Bid ची तपासणी केली असता असे आढळून आले की, उपरोक्त दहा पैकी M/s. Coteba India Pvt, Ltd, Mumbai, M/s, Feedback Ventures Pvt. Ltd; Gurgaon व M/s. Rice Daubney, Mumbai यांनी भारतात कुठलेही हॉस्पिटलचे काम केलेले नाही. Kirloskar Consultants Ltd; Pune, M/s. Cannon Design Internation Pvt. Ltd; Mumbai व M/s, Edifice Consultants, Pvt. Ltd; Pune यांनी जे प्रकल्प केलेले आहेत त्यासाठी पूर्वपात्रता अटींनुसार आवश्यक त्या सर्व सेवा पुरविलेल्या नाहीत. M/s. Cushman & Wakefield India Pvt.Ltd; Pune व M/s. Syenergy PDS pvt. Ltd; New Delhi यांनी यापुर्वी केलेल्या कामांचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही. त्यामुळे उपरोक्तपैकी खालिल दोनच सल्लागार कंपन्या हया विहीत पूर्वपात्रता अटी व्यवस्थितरित्या पूर्ण करतात असे दिसून आले आहे.

01. TCE Consulting Engineers Ltd; New Delhi, In Association with-Hosmac India Pvt. Ltd; Mumbai
02. HSCC (i) Ltd; Noida (A Govt. of India enterprise)

तरी उपरोक्त दोन सल्लागार कंपन्यांचे प्रतीनिधींना चर्चा तथा वाटाघाटीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावून निम्नतम दर देणाऱ्या सल्लागाराची नांदुर्खी येथील जमिनीत नियोजीत रुग्णालयासाठी (Super Speciality & General Hospital) Detailed Project Report तयार करणे व इतर अनुषंगिक कामांसाठी सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस मंजुरी मिळणेस विनंती.

वरील दोन सल्लागार कंपन्यापैकी TCE Consulting Engineers Ltd; New Delhi, यांचे प्रतिनिधी सभेपूढे उपस्थित होते, त्यांचेशी चर्चा /वाटाघाटी केल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| Sr.No | Name of Consulting firm | Quotated | Negotiated |
|---|---|---|---|

| | | Percentage | Percentage |
|---|---|---|---|
| 01 | TCE Consulting Engineers Ltd; New Delhi In Association with-Hosmac India Pvt. Ltd; Mumbai | 3.29% of the cost of Project (Plus service Tax as applicable ) | 3.0% of the cost of Project (Plus service Tax as applicable ) |
| 02 | HSCC (i) Ltd; Noida (A Govt. of India enterprise) | 10% | Absent |

**निर्णय क्र.८१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, TCE Consulting Engineers Ltd; New Delhi व Hosmac India Pvt. Ltd. हे उपरोक्त प्रकल्पासाठी संयुक्तरित्या सल्लासेवा देणार आहेत. त्यांचेपैकी TCE Consulting Engineers Ltd; हे Consortium चे Lead Member आहेत. तरी त्यांचे निम्नतम दराचे फिचा प्रस्ताव स्विकारणेत येऊन त्यांना नियुक्तिपत्र देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१३** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता एक्स-रे फिल्म ऑटो प्रोसेसर खरेदीकामी प्राप्त कमर्शिअल बीड उघडून निर्णय घेणे .**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाने दि. ०९/०२/२००९ चे मागणीपत्रकान्वये सध्याचे जुने X-Ray Film Auto Processor मशिन बदली (Buyback) करुन नविन मशिन घेण्याबाबत मागणी केलेली आहे. सदरचे मशिन खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०८.०३.२००९ चे सभेमध्ये रु. ६,५०,०००/- चे खर्चास व विहित पध्दतीने खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.२७/०४/२००९ निविदा मागविण्यात आल्या होत्या. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण ६ पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. ३९०० दि. ०४/०४/२००९ अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन फक्त मे. चोक्सी इमॅजिनिंग, ठाणे यांची एकमेव सिलबंद निविदा प्राप्त झालेली होती .

आपणास खरेदीकामी कमीतकमी तीन निविदांची आवश्यकता असल्यामुळे ज्या कंपन्या / अधिकृत विक्रेते यांनी निविदा भरलेली नाही त्याच उर्वरीत ५ कंपन्या / अधिकृत विक्रेते यांना फेर पत्र पाठवून त्यांचेकडून कोटेशन मागविणेकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१७.०५.२००९ निर्णय क्र.४६७ अन्वये मान्यता मिळालेली होती. त्यानुसार ५ कंपन्या / अधिकृत विक्रेते यांना इकडील पत्र क्र.६५३७ दि.३०.०५.२००९ अन्वये फेर पत्र पाठवुन कोटेशन मागविण्यात आले होते. परंतू उपरोक्त पत्रास अनुसरुन देखील एकही कोटेशन प्राप्त झालेले नाही.

पुन्हा दि.२१.०७.२००९ चे मंजुर टिपणीन्वये बाजारात आणखी चौकशी करुन उपरोक्त मशिन बनवत असलेल्या ३ कंपन्याकडून इकडील पत्र क्र. ९०४८ दि.२१.०७.२००९ अन्वये दि.३०.०७.२००९ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन दोन कोटेशन प्राप्त झालेले आहे. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेली एक निविदा व पत्रास अनुसरुन प्राप्त झालेले दोन कोटेशन खालील प्रमाणे.

1. M/s.Choksi Imaging Ltd.,Mumbai (Technical + Commercial Bid) (दि.२७-०४-२००९ रोजी प्राप्त)
2. M/s.Photo Marketing Services, Pondicherry (एकच सिलबंद पाकीट आहे. Technical + Commercial स्वतंत्र Bid नाही.) (दि.०५-०८-२००९ रोजी प्राप्त)
3. M/s.MEX India, Delhi(Technical + Commercial Bid) (दि.०५-०८-२००९ रोजी प्राप्त)

उपरोक्त खरेदीकामी प्राप्त ३ सिलबंद तांत्रिक निविदा / कोटेशन दि.०५.०९.२००९ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. उपरोक्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात तीनही कोटेशनधारकांनी Protec कंपनीचे Compact-२ या मॉडेलचे Specification दिलेले आहे. सदरचा तुलनात्मक तक्ता श्री साईनाथ रुग्णालयातील रेडीओलॉजीस्ट यांना दाखविण्यात आलेला आहे. श्री साईनाथ रुग्णालयातील जुने एक्स-रे ऑटोप्रोसेसर हे मशिन देखील Protec कंपनीचेच असून ते गेली १० वर्षापासून कार्यरत आहे व त्यांची Quality चांगल्या प्रकारची आहे व विक्रीनंतरची त्यांची सेवा देखील व्यवस्थीत आहे. त्यामुळे बाहेरील तज्ञांचा सल्ला घेण्यात आला नाही. श्री साईनाथ रुग्णालयातील रेडीओलॉजीस्ट व बायोमेडीकल इंजिनिअर यांनी Protec कंपनीचेच मशिन घेण्याची शिफारस केलेली आहे.

सदरचे खरेदीकामी प्राप्त Commercial Bid समक्ष उघडून, पुरवठाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते त्यानुसार तिनही पुरवठाधारक आजचे सभेपूढे चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते त्यांनी सभेपुढे देऊ केलेल्या सूट खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे.

| S. N. | Specifications | Qty. | Mex India,Delhi | | | Photo Marketing, Pondicherry | | | Choksi Imaging, Thane | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 1) | X-ray Film Auto Processor | 1 | Protec / Compact-2 | | | Protec / Compact-2 | | | Protec / Compact-2 | | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Film Transport | Continuous roller transport system | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| 2 | Film Format | Sheet & roll films upto 45.1 cm width min.10 x l0 cm (4” x 4”) max 45 x 45cm (17 3/4” x 17 3/4”) | | Yes | 786240.00 +14175 for UPS | 675000.00 +UPS Rs.9000.00 +Vat 12.5% | Yes | 51000 0.00 + 25500. 00(Tax 12.5%) | 510000+Vat 12.5% Rs.63750.00 | Yes | 534375.00 Including Buyback | 475000.00 + + 12.5%VAT = 534375.00 Less Buyback Value of Old Machine 45000.00 =Net Value 489375.00 Free Supply of Stabilizer & Chemicals Worth Rs. 25000.00 |
| 3 | Process time | 1 ~ 5 mm (60 ~ 300 sec) | | Yes | 800415.00 | 769500.00 | Yes | 573750. 00 | 573750.00 | Yes | 534375.00 | |
| 4 | Processing Capacity at 60 sec process time | | | Yes | | | Yes | Not given cost of UPS Extra | | Yes | | |
| | Film Format 10 x 10cm (4” x 4”) (4 x parallel) | 3000 films/hr | | Yes | | | Yes | Buyba ck Rs.450 00/- | 528750.00 | Yes | | |
| | Film Format 24 x 18cm (91/2” x 7”) (2 x parallel) | 650 films/hr | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| | Film Format 24 x 30cm (91/2” x 12”) | 325 films/hr | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| | Film Format 35 x 43cm (14” x 17”) | 225 films/hr | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| 5 | Developer Temperature | 28 - 400 C (82-104° F) | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| 6 | Fixer Temperature | By means of Heat Exchanger adjusted to developer | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| 7 | Dryer Temperature | 35-70°C (95 -158° F) | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| 8 | Film Detection | Infrared sensor | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| 9 | Replenishment | Automatic by film surface measurement in relation to processed film Quantity adjustable; time replenishmen t can be activated. | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| 10 | Replenishment rate | 150-3000 ml/m2 (ml per l0 square feet) | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| 11 | Replenishment Containers | 25 L (6.6 gal) | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| 12 | Tank Capacity | 20 L for Developer/ Fixer/ Water | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| 13 | Program memory | mm. 5 Programs | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| 14 | Water Consumption | max. 2 L/min during processing 0 L/min during Standby | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| 15 | Noise Level | Less than 60 dB | | Yes | | | Yes | | | Yes | | |
| | | **Warranty --** | | **One Year** | | | **One Year** | | | **One Year Comprehensive Warranty from the date of installation** | | |
| | | **AMC--** | | AMC (Labour Only-without spares) - Rs.25000/- per annum per equipment + | | | Not Given | | | Rs.26996/- (Incl. of Service Tax) + 10% escalation upto next 3 years. | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Service tax Extra | | | | | |
| | CMC -- | | CMC (Comprehensive with spares) Rs.75000/- per annum per equipment + Service Tax, 10% annual increase after the expiry of every subsequent year, shall be charged extra. | | Not Given | | Rs. 53992/- (Incl. of Service Tax) + VAT & 10 % escalation upto next 3 years | |
| | | | Recommended Accessories at Extra Cost- 5KVA Servo Type Voltage Stablizer with Spike Suppressor | | | | | |
| | | | | | | | | |

**निर्णय क्र.८११** **यावर चर्चा होऊन M/s.Choksi Imaging Ltd., Mumbai यांचे दर जुन्या मशिनचे दर वजा जाता (रु.४५,०००.००) प्रतिनग रु.४८९३७५.०० सर्व करासह निम्नतम असून सदरचे मशिन त्यांचेकडून खरेदी करावे तसेच १ वर्षाचा वॉरंटी कालावधी संपल्यानंतर उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे त्याचेकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१४** **साई आश्रम इमारत परिसरातील सब स्टेशन व जनसेटच्या कामासाठी प्राप्त झालेले टेंडर उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** साईआश्रम इमारतीचे काम शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई (तामिळनाडू) यांचेमार्फत चालू आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २८-०७-२००९ चे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र.४८ निर्णय क्र.६४३ अन्वये साईआश्रम प्रकल्पाचे बांधकाम चालू असून या परिसरातील एक्स्टर्नल (सबस्टेशन व जनसेट)कामांचे खर्चास मान्यता मिळाली आहे.

या कामांसाठी टेंडर मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दिनांक ०५-१०-२००९ ते दिनांक २३-१०-२००९ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक २६-१०-२००९ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेंडरसचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.बीव्हीजी इंडिया प्रा.लि., पुणे |
| ०२) | मे.सुमी इलेक्ट्रिकल्स सर्व्हिसेस, पुणे |
| ०३) | मे.बीटा इलेक्ट्रिकल्स, औरंगाबाद |
| ०४) | मे.अदिती इलेक्ट्रिकल्स, नाशिक |
| ०५) | मे.एसव्हीए इलेक्ट्रिकल्स, पुणे |
| ०६) | मे.डिप्लोमॅट इलेक्ट्रिकल्स प्रा.लि., पुणे |
| ०७) | मे.सोनहिरा इलेक्ट्रीक, पुणे |
| ०८) | मे.शापुरजी पालोनजी ॲण्ड कं.लि., नाशिक |
| ०९) | मे.एम.डी.एस.कंपनी, नाशिक |
| १०) | मे.ट्रान्स फॅब पॉवर (इं).प्रा.लि., पुणे |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

(निविदा मंजूर रक्कम रुपये २,८३,००,०००/-)

| अ.नं. | निविदासादकर्त्याचे नाव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | मे.बीव्हीजी इंडिया प्रा.लि., पुणे | १९.५३ % अधिक | १५ % अधिक |
| ०२ | मे.सुमी इलेक्ट्रिकल्स सर्व्हिसेस, पुणे | १८.२१ % कमी | १८.२१ % कमी |
| ०३ | मे.बीटा इलेक्ट्रिकल्स, औरंगाबाद | ७ % अधिक | १७.१ % कमी |
| ०४ | मे.अदिती इलेक्ट्रिकल्स, नाशिक | ५ % कमी | २० % कमी |
| ०५ | मे.एसव्हीए इलेक्ट्रिकल्स, पुणे | ७ % अधिक | अपात्र |
| ०६ | मे.डिप्लोमॅट इलेक्ट्रिकल्स प्रा.लि., पुणे | १.८९९५% कमी | १५.५% कमी |
| ०७ | मे.सोनहिरा इलेक्ट्रीक, पुणे | ५ % कमी | ९ % कमी |
| ०८ | मे.शापुरजी पालोनजी ॲण्ड कं.लि., नाशिक | २४ % अधिक | १०% अधिक |
| ०९ | मे.एम.डी.एस.कंपनी, नाशिक | ५ % कमी | ६ % कमी |
| १० | मे.ट्रान्स फॅब पॉवर (इं).प्रा.लि., पुणे | १०.५% अधिक | ७.५ % अधिक |

**निर्णय क्र.८१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.आदिती इलेक्ट्रिकल्स, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१५ नवीन क्रेन खरेदीकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२१/०६/२००९ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.५३८ अन्वये, शिर्डीतील वाढत्या वाहनांच्या गर्दी नियंत्रणासाठी पोलिसांचे मदतीसाठी अद्ययावत लाईट व्हेईकल क्रेन खरेदी करणे कामी कोटेशन मागणी करणेत यावी, असे ठरले होते.

उपरोक्त निर्णयान्वये, टाटा कंपनीचे ४०७ मॉडेलची वाहन खरेदी करून त्यावर बॉडीबिल्डर यांचेकडून आपणास आवश्यक आहे तशी (आपले मागणीनुसार) क्रेन तयार करून घेणे करीता जा.नं.एसएसएस/वाहन/११५१९/२००९ दि.१४/०९/२००९ ने बॉडीबिल्डर यांचे क्रेनची बॉडी बांधणीचे करीता तसेच जा.नं.एसएसएस/वाहन/११५२०/२००९ दि.१४/०९/२००९ ने टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून टाटा४०७ मॉडेलचे वाहन खरेदी करीता कोटेशन्स बोलावण्यात आली होती. प्राप्त झालेली कोटेशन खालील प्रमाणे.

**टाटा४०७ वाहनाकरीता प्राप्त कोटेशन**

०१. स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर - बंद कोटेशन
०२. स्टर्लिंग मोटर्स, नाशिक. - फॅक्स कोटेशन
०३. मे.शुभायन मोटर्स प्रा.लि., अहमदनगर - बंद कोटेशन

**बॉडी बांधणीचे कामाकरीता प्राप्त कोटेशन**

०१. बॉम्बे ॲटोमोबाईल्स, नाशिक - बंद कोटेशन
०२. स्टार गॅरेज, ॲटोमोबाईल्स इंजि., नाशिक - बंद कोटेशन
०३. अजंता मोटर्स वर्क्स, नाशिक - बंद कोटेशन

तरी वरील प्रमाणे टाटा४०७ वाहनाकरीता प्राप्त झालेली ०३ कोटेशन्स तसेच बॉडी बांधणीचे कामाकरीता प्राप्त झालेली ०३ कोटेशन्स उघडुन अधिकृत डिलर्स / बॉडी बिल्डर यांचे बरोबर वाटाघाटी करून नवीन क्रेन खरेदीचा व या कामी येणाऱ्या रू. दहा लाख मात्रचे खर्चास मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्यात येऊन उपरोक्त निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता,त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**टाटा४०७ वाहनाकरीता प्राप्त कोटेशन**

| अ.नं. | निविदासादकर्त्याचे नाव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर | ५,४९,७३५/- | ५,२७,०००/- |
| ०२ | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक. | ५,४९,९६०/- | --- |
| ०३ | मे.शुभायन मोटर्स प्रा.लि., अहमदनगर | ५,४९,७३५/- | ५,२३,०००/- |

**बॉडी बांधणीचे कामाकरीता प्राप्त कोटेशन**

| अ.नं. | निविदासादकर्त्याचे नाव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | बॉम्बे ॲटोमोबाईल्स, नाशिक | १,८८,०००/- | अनुपस्थित |
| ०२ | स्टार गॅरेज, ॲटोमोबाईल्स इंजि., नाशिक | १,७९,८५०/- | १,७५,८५०/- |
| ०३ | अजंता मोटर्स वर्क्स, नाशिक | १,६३,९००/- | १,५५,०००/- |

**निर्णय क्र.८१३ यावर सविस्तर चर्चा होऊन, टाटा-४०७ वाहन खरेदीकामी मे.शुभायन मोटर्स प्रा.लि., अहमदनगर यांचे रुपये ५,२३,०००/- व बॉडी बांधणीचे कामाकरिता मे. अजंता मोटर्स वर्क्स, नाशिक यांचे रुपये १,५५,०००/- मात्रचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.**

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१६ गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** माहे नोव्हेंबर ,२००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | ०३/११/२००९ | १,००,००,०००.०० |
| ०२ | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | १०/११/२००९ | ३,९०,८७,७३५.०० |
| ०३ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | १४ /११/२००९ | १,००,००,०००.०० |
| ०४ | युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २१/११/२००९ | १,६६,३८,१०८.०० |
| ०५ | आंध्र बँक, शिर्डी | २१/११/२००९ | १,६६,३८,१०८.०० |
| ०६ | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | २४/११/२००९ | १,६६,३८,१०८.०० |
| ०७ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे नोव्हेंबर २००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ७,००,००,०००.०० |
| | | एकूण | **१७,९०,०२,०५९.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. १७.९० कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक

लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

| | |
|---|---|
| १) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी |
| ३)आंध्र बँक, शिर्डी | ०४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी |
| ०५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव | ०६) बँक ऑफ बरोडा, नासिक |
| ०७) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | ०८) विजया बँक, शिर्डी |

तरी वरील अ.नं. १ ते ८ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.१७.९० कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.८१४** **गुंतणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम रु.१७.९० कोटी संस्थानला नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदराने टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, असें ठरलें.**

---

**विषय नं.१७** **सन २००८-०९ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन लेखापरिक्षीत लेख्यासह वार्षिक अहवाल शासनास सादर करण्यास मान्यता मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र राज्य शासनाने संस्थानकरिता लागू केलेल्या अधिनियम -२००४ मधिल कलम १७(२) ग मधिल तदतूदीनुसार विश्वस्त व्यवस्थेच्या हिशोबाची, राज्य शासन निर्णय घेईल अशा व्यक्तीकडून, पूढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षण करण्याची व्यवस्था करेल, तसेच कलम २९(१) अन्वये विश्वस्त व्यवस्थेची आर्थिक स्थिती आणि तिचे उत्पन्न व खर्च यांचा तपशिल दर्शविणारा वार्षीक अहवाल तयार करून ३० जुन पर्यंत राज्य शासनास व धर्मदाय आयुक्त यांच्याकडे सादर करील अशी तरतुद आहे.

उपरोक्त नमुद तरतुदी अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई. यांचेकडे जा.क्र. एसएसएसटी/ वशी-१/४०२४/२००९ दि.०८ एप्रिल,२००९ या पत्रान्वये वैधानिक लेखापरिक्षकाच्या नेमणुकीबाबत व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.८५ दि.०८/०२/२००९ नुसार मे.शरद.एस. गायकवाड ॲन्ड कं., चार्टर्ड आकौटंट, मुंबई, यांची पुर्वानुभव व मानधन या निकषावर नेमणुक करणेबाबत पत्र दिले होते.

त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासन,विधी व न्याय विभाग यांनी, जा.क्र.सां.सं.वि-२००९/२५४/(१५) का.सोळा दि.१६ जुलै २००९ अन्वये वरील संस्थे मार्फत वैधानिक लेखापरिक्षण करुन घेणेबाबत मान्यता देण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने, वैधानिक लेखापरिक्षक यांनी लेखापरिक्षणाचे कामकाज पुर्ण केलेले असुन त्यांचा अहवाल दि.२८/०९/२००९ रोजी संस्थानला प्राप्त झाला आहे.

आयकर कायदा सन १९६१ अन्वये, संस्थानचे आयकर विवरणपत्र, आयकर विभागाकडे दाखल करण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबर पर्यंत असल्याने, व त्यास मुदतीचे बंधन असल्याने दि.३०/०९/२००९ रोजी लेखापरिक्षण अहवालासमवेत आयकर विवरणपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

सबब सदर लेखापरिक्षण अहवाल अवलोकनार्थ व नोंद घेण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या आजच्या सभेसमोर ठेवण्यात आला आहे. सदर अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल तयार करण्याची कार्यवाही हाती घेण्यात येईल.

तरी कृपया सदर अहवालाचे अवलोकन होऊन नोंद घेणेस व लेखापरिक्षीत लेख्यांसह शासनाकडे सादर करणेस मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.८१५** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे लेखापरिक्षित लेख्यांसह वार्षिक अहवाल शासनाकडे सादर करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच येथून पूढे लेखापरिक्षण अहवाल अंतिम करणेअगोदर वैधानिक लेखापरिक्षक व संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षक यांना व्यवस्थापन समितीचे सभेपूढे बोलविण्यात येऊन त्यांना व्यवस्थापन समितीचे सदस्यांना लेखापरिक्षण अहवालाबाबत माहिती देणेबाबत सांगण्यात यावे. तसेच अंतर्गत लेखापरिक्षक यांनी तयार केलेला लेखापरिक्षण अहवाल दर सहा महिन्यांनी संक्षिप्त स्वरुपात व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१८** **श्री साईनाथ रुग्णालयातील हिस्टोपॅथोलॉजी विभागासाठी Automatic Knife Sharpner खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील हिस्टोपॅथोलॉजी विभागाने त्यांचे दि.१५/०७/२००९ चे पत्रान्वये एक नविन Automatic Knife Sharpner मशिनची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे असलेले Panchal कंपनीचे सध्याचे मशिन हे १० वर्षापुर्वी खरेदी केलेले आहे. सदरचे मशिन हे जुने झालेले असून ते व्यवस्थित काम देत नाही, तसेच त्याचा फार आवाज होतो, शिवाय सदर मशिनला चालणारे स्पेअर पार्टचे उत्पादन कंपनीने बंद केलेले आहे. त्यामुळे ते बदलण्याची गरज आहे. त्यामुळे हिस्टोपॅथ विभागाने M/s.Panchal Scientific Corporation, Mumbai या कंपनीचे नविन Automatic Sharpner ची मागणी केलेली आहे.

याकामी दोन अधिकृत विक्रेते यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागवण्यात आले होते. त्यांचे दरानुसार सदरचे Automatic Knife Sharpner मशिनसाठी सर्व ॲक्सेसरीजसह अंदाजे रु.४०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचे Automatic Knife Sharpner मशिन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.४०,०००/- चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.८१६** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील हिस्टोपॅथोलॉजी विभागासाठी Automatic Knife Sharpner मशिन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.४०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१९** **श्री साईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागाकरीता पोर्टेबल २ डी इको/कलर डॉप्लर मशिन खरेदीस मंजूरी मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागाने त्यांचे दि.२५/०६/२००९ चे पत्रान्वये एक नविन पोर्टेबल २ डी इको / कलर डॉप्लर मशिनची मागणी केलेली आहे. त्यांचेकडे सध्या एक मशिन आहे, सदर मशिनवर साधारण एका वर्षात ४००० ते ५००० २ डी इको केले जातात. परंतु सी.आर.यु., आय.सी.सी.यु. किंवा जी.आय.सी.यु. मध्ये रुग्णांचा २ डी इको करावयाचा झाल्यास सदर मशिन तेथे स्थंलातरीत करावे लागते, अशा वेळी सदर मशिन नादुरुस्त होण्याचा धोका संभवतो, त्यामुळे त्यांनी एक नग पोर्टेबल २ डी इको / कलर डॉप्लर मशिनची मागणी केलेली आहे. याकामी टेक्नीकल स्पेसीफिकेशन हे डॉ.बजाज कार्डीओलॉजिस्ट व वरिष्ठ बायोमेडीकल इंजिनिअर यांचे दोघांकडून निश्चित करुन घेण्यात आलेले आहे. ते सोबत परिशिष्ट 'अ' म्हणून सादर केलेले आहे. त्यानुसार सदरचे मशिन खरेदीकामी अंदाजे रु.१५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर मशिनची खरेदी ही मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता मिळाल्यानंतर विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून करण्यात येईल.

**निर्णय क्र.८१७** **श्री साईबाबा रुग्णालयाचे कॅथलॅब विभागाकरीता पोर्टेबल २ डी इको/कलर डॉप्लर मशिन खरेदीकामी चांगल्या नामांकित कंपन्यांकडून थेट दरपत्रके मागवून (कोटेशन्स) उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२०** **THK & TKRचे दर आकारणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटरमध्ये रुग्णांचे THR (Total Hip Replacement ) व TKR ( Total Knee Replacement ) च्या शस्त्रक्रिया करण्यात येतात. यासाठी लागणारा कृत्रिम गुडघा व हिप (उद्‌गा) इत्यादीसाठी सन २००९-१० या वर्षाकरीता on Consignment Basis वर ठेवणेकामी निविदा मागवण्यात आल्या होत्या. त्यातील श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक सर्जन यांचे शिफारसीनुसार खालील प्रकारचे व कंपन्यांचे THR & TKR Set हे Consignement Basis वर ठेवण्यासाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०९.०८.२००९ चे सभेत मान्यता मिळालेली आहे.

संस्थान वैद्यकिय देखभाल नियमावली सन १९९९ नुसार संस्थान कर्मचाऱ्यांना संस्थानचे दोन्ही रुग्णालयात मोफत उपचाराची सुविधा आहे. त्यामुळे संस्थान कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबित यांना लागणारा THR & TKR Set मोफत वापरता येईल तर संस्थान कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर रुग्णांना खरेदीचे दर आकारावे असे मत आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

| अ.नं. | नांव | कंपनी | ब्रँड नेम | नग | खरेदीचे दर | आकारावयाचे दर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | THR Set | Indus | | १ PC | ३००००.०० | ३००००.०० |
| | | J + J | C-Stem Modular | १ PC | ४४०००.०० | ४४०००.०० |
| | | J + J | Corail Duraloc Uncemented | १ PC | ७५०००.०० | ७५०००.०० |
| २ | TKR Set | Indus | | १ PC | ४००००.०० | ४००००.०० |
| | | J + J | PFC Sigma Fixed Bearing | १ PC | ८००००.०० | ८००००.०० |
| | | J + J | PFC Sigma RP | १ PC | ८६०००.०० | ८६०००.०० |

ज्या रुग्णांना यापेक्षाही महागडा THR किंवा TKR Set बसवयाची इच्छा असेल आणि त्यासाठी आपल्या निविदांमध्ये दर प्राप्त झालेले असतील असे सेट सदर रुग्ण संपुर्ण रक्कम भरणेस तयार असेल तर ती त्यांना त्यांचे मागणीनुसार खरेदी करुन देता येईल.

**निर्णय क्र.८१८** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे रुग्णांकडून THK & TKRचे दर आकारणेस मान्यता देण्यात आली व कर्मचाऱ्यांकरिता वेगळा प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२१** **लिक्वीड आयसोप्लोरेनचे Rate contract करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे शस्त्रक्रिया विभागामध्ये रुग्णांना भुल देण्यासाठी बॉईल्स मशिनला व्हेपोरायझर हे उपकरण आवश्यक असते. सदर उपकरणामध्ये लिक्वीड आयसोफ्लोरेन हे औषध वापरुन रुग्णास भुल दिली जाते.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१६.०७.२००६ रोजीचे सभेतील मंजुरीन्वये मे.रमन ॲण्ड वेल, मुंबई यांचेकडून ०५ नग व्हेपोरायझर मशिन मोफत स्विकारण्यात येऊन सदर मशिनकरीता लागणारे लिक्वीड आयसोफ्लोरेन तीन वर्षाकरीता २५० मीलीच्या ३६० बाटल्या रु.१८५०/- या दराने खरेदी करण्यात यावे असे ठरले होते. त्यानुसार (०१) इकडील पत्र क्र.१२१७८ दि.०८.०९.२००६ अन्वये १२० बाटल्या (०२) इकडील पत्र क्र.८०३३ दि.२५.०५.२००७ अन्वये १२० बाटल्या व (०३) इकडील पत्र क्र.७१४८ दि.११.०६.२००९ अन्वये १२० बाटल्या अशा एकुण ३६० बाटल्या आयसोफ्लोरेन खरेदी करण्यात आलेल्या आहे.

सदरचे व्हेपोरायझर हे मे.रमन ॲण्ड वेल,मुंबई या कंपनीचे असून सदर मशिनकरीता त्याच कंपनीचे लिक्वीड आयसोफ्लोरेन आवश्यक असते. त्याकरीता मे.रमन ॲण्ड वेल,मुंबई या कंपनीने त्यांचे दि.०२.०९.२००९ रोजीचे पत्रान्वये पुढील दोन वर्षाकरीता Rate Contract करणेबाबत कळविले आहे. सदर पत्रात त्यांचे आयसोफ्लोरेन २५० मीली करीता रु.१५००/- प्रती नग असे दर आहे. म्हणजेच मागील मंजुर दर हे प्रती नग रु.१८५०/- पेक्षा त्यांचे नविन दर कमी आहेत.

मे.रमन ॲण्ड वेल, मुंबई या कपंनीकडे तीन वर्षाकरीता उपरोक्त लिक्वीड घेण्याचे ठरलेले असल्यामुळे सन २००९-१० या वर्षाकरीता वार्षीक खरेदीमध्ये त्याची मागणी करण्यात आलेली नव्हती. सध्या आपल्याकडे २५० मीलीचा २७ बाटल्याचा साठा शिल्लक आहे. त्यामुळे सदरचे आयसोफ्लोरेन ते खरेदी करणे गरजेचे आहे. अन्यथा सदरचे व्हेपोरायझर हे साठा संपल्यावर वापरता येणार नाही व ते पडून राहतील. तेंव्हा तुर्तास पुढील एक वर्षाकरीता मे.रमन ॲण्ड वेल,मुंबई या कंपनीकडून सदरचे आयसोफ्लोरेन घेऊन काम चालू ठेवता येईल व सन २०१०-११ चे वार्षीक खरेदीमध्ये याकामी निविदा मागवुन खरेदी करता येईल.

मे.रमन ॲण्ड वेल, मुंबई यांचेकडून लिक्वीड आयसोफ्लोरेन २५०मीलीचे प्रती बॉटल रु.१५००/- प्रमाणे पुढील एक वर्षाकरीता १२० बॉटलकरीता Rate Contract करावयाचा आहे. त्यासाठी नविन दराने रु.१,८०,०००/-इतका खर्च येईल.

**निर्णय क्र.८१९** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे लिक्वीड आयसोप्लोरेनचे पुढील एक वर्षाकरीता १२० बॉटलकरीता Rate Contract करण्यात यावे, याकामी नविन दराने येणारे रक्कम रु.१,८०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२२** **श्रीसाईबाबा रुग्णालयात भाडे तत्वावर औषध दूकान चालविणेकामीचे प्राप्त निविदाधारकांची अनामत रक्कम परत करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात रुग्ण व त्यांचे नातेवाईकांचे सोईसाठी औषध दुकान भाडे तत्वावर चालवणेस देणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७.०७.२००८ रोजीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन सदर औषध दुकान पाच वर्षा करीता भाडे तत्वावर चालविण्यास देणकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला आहे.

त्यानुसार उपरोक्त औषध दुकान भाडे तत्वावर चालवणेस देणेकामी संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत सार्वमत, सामना व जयबाबा- नगर आवृत्ती या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०७/०८/२००८ ते दि.२१/०८/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी व मुंबई कार्यालयात निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२३/०८/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. मुंबई कार्यालयात १० निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या तर शिर्डी कार्यालयात ६५ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात एकूण २६ निविदा प्राप्त झालेल्या होत्या त्या दि.२०/०९/२००८ चे सभेत उपरोक्त प्रमाणे २६ निविदाधारकांच्या निविदा समक्ष उघडण्यात आल्या असून त्यांनी देऊ केलेले दर खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | देऊ केलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | विनोद भिमसेन लोंगाणी, कोपरगाव | ५५१५५५.०० | |
| २ | गजानन जनार्दन वाणी, अशोक यशवंतराव परजणे आणि उदय सुदाम देशमुख कोपरगाव | ४५१०००.०० | तिघा मिळून एकत्रित अर्ज |
| ३ | योगेश्वर सुदाम शेळके, शिर्डी | ४०१०००.०० | |
| ४ | तरुण ओमप्रकाश भुसारी, कोपरगाव | ३५१०००.०० | |
| ५ | वेलनेस फॉर एव्हर मेडीकेअर प्रा.लि., मुंबई | ३२५४३६.०० | |
| ६ | राजेश वसंतराव गायकवाड, लासलगाव | ३१००००.०० | |
| ७ | सिध्देश्वर मेडीकल ॲन्ड जनरल स्टोअर्स, कोपरगाव | ३०१०००.०० | |
| ८ | लोकमान्य हॉस्पिटल मेडीकल स्टोअर्स, पुणे | ३०००००.०० | |
| ९ | सचिन मनोहर नवले, नवलेवाडी | २७५०००.०० | |
| १० | अशोक बाळकृष्ण वाबळे, शहरटाकळी | २५५०००.०० | |
| ११ | जीवन मेडीकल ॲन्ड एजन्सी, श्रीरामपुर पंकज झुबरलाल हिरन | २५१०००.०० | |
| १२ | अरुण पोपटलाल जानी, शिर्डी | २३५०००.०० | |
| १३ | समीर अशोक जोशी, नाशिक | २०१०००.०० | |
| १४ | नरेश संपतलाल पारख, शिर्डी | १८१०००.०० | |
| १५ | अतुल अशोकराव अहिरे, नाशिक | १७५०००.०० | |
| १६ | शैलेंद्र शिवलाल पारख, गणेशनगर | १७१०००.०० | |
| १७ | सुहास चंद्रकांत खोडदे, नाशिक | १७१०००.०० | |
| १८ | अशोक विष्णू ताठे, राहूरी | १६००००.०० | |
| १९ | संदीप नामदेवराव लूटे, साकूरी | १५००००.०० | |
| २० | पंकज धनसुखलाल रांका, कोल्हार बु. | १३१०००.०० | |
| २१ | साईकृपा मेडीकल, शिर्डी | १२१०००.०० | |
| २२ | संदीप नारायण ताठे, अपोलो हॉस्पिटल इंटरप्राईज लि. चेन्नई | १०००००.०० | |
| २३ | संदीप नारायण ताठे, अपोलो हॉस्पिटल इंटरप्राईज लि. चेन्नई | ना नफा ना तोटा धर्तीवर | |
| २४ | प्रिन्स मेडीकल, नाशिक | ८१०००.०० | |
| २५ | श्री साई संस्थान एमप्लॉईज क्रेडीट को. ऑप. सोसायटी लि., शिर्डी | ८१०००.०० अगर सर्व कर्मचारी व इतर खर्च वगैरे संगणकीकृत जमा खर्च हिशोब | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रती महिना करुन निव्वळ नफ्याच्या १/३ रक्कम प्रतीमहिना भाडे म्हणून आपण कपात करुन घेणेस विनंती. दररोजचा भरणा आपणाकडे रोख करुन प्रती माह अगर वार्षिक हिशोब करुन आपली रक्कम १/३ कपात करुन उर्वरीत रक्कम आम्हास देण्यात यावी. याप्रमाणे शक्य असल्यास देणेस विनंती. | |
| २६ | सोमनाथ कारभारी वाघे, केलवड | ५१०००.०० | |

उपरेक्त विषय वेळोवेळी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात आला होता.परंतू सदर विषय प्रत्येक वेळी स्थगित ठेवण्यात आलेला आहे. उपरोक्त औषध दुकान चालविणेकामी दि.२३.०८.२००८ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा मागवुन एक वर्ष होऊन गेलेला असल्याने सदरच्या निविदा ह्या मुदतबाह्य झालेल्या आहेत, तसेच सदरचे निविदाधारक वारंवार अनामत रक्कमेची मागणी करत आहे. औषध दुकान चालवण्याचा निर्णय झाल्यास पुन्हा निविदा मागवता येतील.

**निर्णय क्र.८२०** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्रीसाईबाबा रुग्णालयात भाडे तत्वावर औषध दूकान चालविणेकामीचे प्राप्त निविदाधारकांची अनामत रक्कम परत करणेस मान्यता देण्यात आली. तसेच संस्थानमार्फत औषध दुकान चालविणेकामी नवीन अर्थमंत्र्यांची भेट मा.उपाध्यक्ष यांनी भेट घेऊन श्री साईबाबा संस्थान हे धर्मादाय संस्थान असल्याने सेल्स टॅक्स न आकारणेबाबत चर्चा करावी असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागासाठी सी.आर्म मशिन खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने त्यांचे दि.३१.०८.२००९ रोजीचे पत्रान्वये एक नविन सी.आर्म मशिनची मागणी केलेली आहे. श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागात एक सी.आर्म मशिन खरेदी करुन देण्यात आलेले आहे. सध्या सदरचे मशिन जनरल ऑपरेशन थिएटरमध्ये युरोलॉजीच्या शस्त्रक्रियाकरीता देखील वापरण्यात येत आहे. परंतू सदरचे मशिन नेहमीच आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटरमधून स्थलांतरीत करावे लागत असल्यामुळे मशिन नादुरुस्त होण्याचा धोका संभवतो.त्यामुळे जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने एक नविन सी.आर्म मशिनची मागणी केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२१.०६.२००९ निर्णय क्र.५१८ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयाकरीता एक नग सी.आर्म मशिन मे.सिमेन्स लि.,मुंबई यांचेकडून रु.११,००,०००/- इतक्या रक्कमेत घेण्यास मान्यता मिळालेली आहे, व त्यानुसार मे.सिमेन्स लि.,मुंबई यांचे अधिकृत विक्रेते मे.एसए मेडीकल सिस्टिम,औरंगाबाद यांना इकडील पत्र क्र. ८७११ दि.१४.०७.२००९ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला असून त्याचा अजुन पुरवठा होणे आहे. सदर मशिन जनरल ऑपरेशन थिएटर विभागास तातडीने पाहिजे असल्याने विलंब टाळण्याचे द्दष्टीने मागील मंजुर दराने व नियम अटीनुसार खरेदी करता येईल.

याकामी मे.सिमेन्स लि.,मुंबई यांना मागील मंजुर दराने मशिन पुरवठ्याबाबत विचारणा केली असता त्यांनी दि.०७.०९.२००९ रोजीचे फॅक्स पत्रान्वये मागील दर रु.११,००,०००/- या दराने पुरवठा करण्यास तयार आहोत, असे कळविले आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता ०१ नग सी.आर्म मशिन मागील मंजुर दर रु.११,००,०००/- या प्रमाणे मे.सिमेन्स लि.,मुंबई यांचेकडून खरेदी करण्यास मान्यता असावी.

आजचे सभेत मे.सिमेन्स लि.,मुंबई यांचे प्रतिनिधी चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांचेशी चर्चा केली असता त्यांनी देऊ केलेल्या दरात सूट देऊन सदरहू मशिन १०,५०,०००.०० इतके किंमतीस देण्याचे मान्य केले.

**निर्णय क्र.८२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.सिमेन्स लि.,मुंबई यांनी देऊ केलेल्या रुपये १०,५०,०००.०० इतके किंमतीस श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागासाठी सी.आर्म मशिन खरेदी करण्यात यावे तसेच वॉरंटी कालावधी एक वर्षाचा संपलेनंतर त्यांचेकडे यापूर्वीचे मशिनप्रमाणे प्रत्येक वर्षाकरीता रुपये ३०,०००/- + विक्रीकर आदा करुन वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CMC) करण्यात यावे तसेच त्यांना पुरवठा आदेशासोबत १५ टक्के आगाऊ रक्कम तर ८५ टक्के मशिन डिस्पॅच झाल्याचा पुरावा सादर केल्यानंतर आदा करावी, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२४** **सन २००९-२०१०या वार्षिक निविदेतील मंजूर दराने Inj Pause खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापराकरीता लागणाऱ्या Inj.Pause करीता सन २००९-२०१० या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने मे. संजिवनी एजन्सी, अहमदनगर यांना इकडील पत्र क्र. ५४१४ दि. ०५/०५/२००९ अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| Sr. No. | Description | Make | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Inj.Pause -5ML | EMCURE | 2000 | 22.88 | 45760.00 |
| | | | | Total Amt. in Rs.- | 45760.00 |

त्यानुसार मे. संजिवनी एजन्सी, अहमदनगर यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे उपरोक्त इंजेक्शनचा पुरवठा पुर्ण केलेला आहे व रुग्णालयात त्याचा वापर देखील झालेला आहे. सध्या औषध भांडारात उपरोक्त इंजेक्शन शिल्लक नसून रुग्णालयात रुग्णाच्या सततच्या वाढणाऱ्या संख्येमुळे उपरोक्त इंजेक्शनचा दरमहा खप साधारणत: ३०० असून खालीलप्रमाणे इंजेक्शनचा साठा खरेदी करावा लागणार आहे.

| Sr. No. | Description | Make | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Inj.Pause - 5ML | EMCURE | 1500 | 22.88 | 34320.00 |
| Total Amt. in Rs.- | | | | | 34320.00 |

वरीलप्रमाणे मे. संजिवनी एजन्सी, अहमदनगर यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु.३४,३२०/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०५/२००९ निर्णय क्रमांक ३८१ (A) अन्वये वार्षिक मागणी व्यतिरीक्त अजुन काही औषधांची अतिरिक्त गरज भासलेस ती वार्षिक मंजुर दराने मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तरी मे. संजिवनी एजन्सी, अहमदनगर यांचेकडून वरीलप्रमाणे इंजेक्शन वार्षिक मंजुर दराने खरेदीस रु.३४,३२०/- खर्च आलेला आहे.

**निर्णय क्र.८२२** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे. संजिवनी एजन्सी, अहमदनगर यांचेकडून इंजेक्शन वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रु.३४,३२०/- खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२५** **श्री गोकूळ नानासाहेब आगलावे, सावळविहीर यांचे वैद्यकीय अर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत**

**प्रस्ताव-** श्री गोकूळ नानासाहेब आगलावे यांनी त्यांचा मुलगा चि. चेतन याचे वैद्यकीय उपचाराकरीता आर्थिक मदत मिळणेबाबत संस्थानकडे अर्ज केलेला असन सदरचा अर्ज दि.०८/०६/२००९ रोजी इकडील कार्यालयास मिळालेला आहे. अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे दिलेली नाहीत.

चि.चेतन हा हिमोफेलीया या विकाराने आजारी असुन त्याचेवर हिमोफिलीया सोसायटी ऑफ महाराष्ट्र, लोहाडे हॉस्पिटल पुणे या खाजगी रुग्णालयात उपचार सुरु असुन दहा दिवसासाठी रु.९२,५००/- खर्च येणार असल्याचे प्रमाणपत्र संबधीत रुग्णालयाने दिलेले आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार खाजगी रुग्णालयाचे नावे अनुदानाची रक्कम देण्यात येत नाही असे इकडील जा.नं.एसएसएस/ एसएसएच/ अनुदान/ ७२५६/२००९ दि.१३.०६.२००९ अन्वये श्री. आगलावे यांना कळविण्यात आलेले आहे.

मा.उपाध्यक्ष महोदय यांनी चि.चेतन यास अनुदान देणेबाबत शिफारस केलेली असुन या आजारावर आपले रुग्णालयात उपचार होऊ शकत नाही तसेच त्याच्या वडीलांची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजुक असुन ते उपचारासाठी पैसा उपलब्ध करु शकत नाही तेव्हा त्यांचा अर्ज मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवून रु.१,००,०००/- आर्थिक मदत मंजुर करावी असे कळविलेले आहे.

तसेच मा.ना.श्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांनीही चि.चेतन यांस अनुदान देणेबाबत शिफारस केलेली असुन संस्थानकडुन जास्तीत जास्त आर्थिक मदत मंजुर करावी असे कळविले आहे.

महाराष्ट्र शासन विधि व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी दि.०५/०५/२००६ चे पत्रान्वये संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीची काटेकोरपणे अंमलबजावणी करवी असे आदेश दिलेले आहेत.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०५/११/२००५ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र. ६६५ अन्वये फक्त संस्थान वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत बसणारे अर्ज परस्पर मा. कार्यकारी अधिकारी यांनी मान्य करावेत. नियमावलीत न बसणारे अर्ज मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेत येऊ नयेत असे ठरलेले आहे.

**निर्णय क्र.८२३** **उपरोक्त प्रस्तावाबाबत पुढे निर्णय क्र. ८२५ मध्ये चर्चा झालेली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

---

**विषय नं.२६** **श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता रेक्झीन खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वॉर्डमधील गादया हया सन २००६ मध्ये खरेदी केलेल्या आहेत. गादयांचे वरील रेक्झीन काही ठिकाणी फाटलेले तर काहि ठिकाणी गादया जास्तप्रमाणात खराब होत आहे, त्यामुळे गादयांना पुर्णतः रेक्झीन बदलावे लागणार आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयाने डि.पी. नं.५३२ दिनांक ०९/०९/२००९ अन्वये एकुण १०० मीटर रेक्झीनची गादयांवर टाकणेसाठी मागणी केलेली आहे.

सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलच्या सर्व वॉर्डच्या एकुण ७१ गादया फाटलेल्या आहेत त्यापैकी ब-याचश्या गादया जास्तप्रमाणात फाटलेल्या आहेत. तेव्हा सध्या दोन्ही रुग्णालयामिळुण एकूण ४०० मीटर रेक्झीन खरेदीचा प्रस्ताव आहे जेणेकरुन सदरचे रेक्झीन हे वेळोवेळी वापरता येऊ शकेल.

सदरचे रेक्झीन तातडीने खरेदी करावे लागणार असल्याने याकामी राहाता व श्रीरामपुर येथील पुरवठाधारकांकडुन एकुण ३ बंद कोटेशन मागविले आहेत. तसेच ज्याचेकडून गादया खरेदी केल्या होते ते पुरवठाधारक मे. जनक हेल्थकेअर,मुंबई यांनाही त्यांचे रेक्झीनचे दर फॅक्सद्वारे पाठवणेबाबत कळविले होते. त्यानुसार त्यांनी फॅक्सद्वारे आपले कोटेशन पाठवले आहे तर राहाता व श्रीरामपुर येथील ३ बंद कोटेशन दिनांक ०३/१०/२००९ रोजी मा. वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडले असुन त्याचे तुलनात्मक दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | रेक्झीनचा प्रकार | दर प्रती.मी. | एकुण मागणी ४०० मीटर | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रगती कुशन्स,राहाता | **पॉली नोव्हा**<br>मॅटी<br>पांडा<br>अॅक्सीस | **रु. १२५/-**<br>रु. ६५/-<br>रु. ६०/-<br>रु. १०५/- | ४०० मीटर | **रु.५०,०००/-**<br>रु.२६,०००/-<br>रु.२४,०००/-<br>रु.४२,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | राहुल रेक्झीन हाऊस, श्रीरामपुर | **पॉली नोव्हा**<br>ॲक्सीस<br>मॅटी<br>पांडा<br>छत्री | **रु. १३५/-**<br>रु. ११०/-<br>रु. ७०/-<br>रु. ६५/-<br>रु. ६०/- | | **रु.५४,०००/-**<br>रु.४४,०००/-<br>रु.२८,०००/-<br>रु.२६,०००/-<br>रु.२४०००/- |
| ३ | व्यंकटेश फर्निसिंग,राहाता | कुल्ट<br>आस्तर<br>पी.व्ही.सी.<br>**पॉलिनोव्हा** | रु. १८०/-<br>रु. ११०/-<br>रु. १६०/-<br>**रु. १४०/-** | | रु.७२,०००/-<br>रु.४४,०००/-<br>रु.६४,०००/-<br>**रु.५६,०००/-** |
| ४ | जनक हेल्थकेअर, मुंबई | रेक्झीन कव्हर (INR) | रु. १२९०/- | | रु.५,१६,०००/- |

प्राप्त रेक्झीनचे नमुने पाहिल्यानंतर मा.वैद्यकीय संचालक यांनी पॉलिनोव्हा रेक्झीनचा दर्जा चांगल्या प्रतीचा असुन टिकाऊ राहील. उपरोक्त चार पुरवठाधारकांपैकी प्रगती कुशन्स, राहाता यांचे निम्नत्तम दरानुसार पॉलिनोव्हा रेक्झीनचे दर रु.१२५/-प्र.मी. हे सर्वात कमी आहे.

दोन्ही रुग्णालयामिळुण ४०० मीटर रेक्झीन खरेदीकरीता रु.५०,०००/- खर्च येणार आहे तरी सदरचे खरेदीस व खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८२४** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे प्रगती कुशन्स, राहाता यांचे निम्नत्तम दरानुसार पॉलिनोव्हा रेक्झीन रु.१२५/- प्र.मी. या दराने दोन्ही रुग्णालयासाठी ४०० मीटर रेकझीन खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रुपये ५०,०००/- खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२७** **हिमोफिलीया आजारासाठी Inj AHF Factor VIII व Factor IX खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** ज्या रुग्णांचे रक्तात Anti Haemophiliac Factor ८ व ९ ची कमतरता असेल अशा रुग्णांना थोडीशी जरी जखम झाली तरी त्याचा रक्तस्त्राव थांबत नाही, अशा रुग्णांना रक्तस्त्राव थांबणेसाठी उपरोक्त इंजेक्शन तातडीने घ्यावे लागतात. परंतु सदरचे इंजेक्शन हे मे. हिमोफिलीया फेडेरेशन, दिल्ली या संस्थेकडेच विक्रीसाठी उपलब्ध असतात. सदर संस्थेचे महाराष्ट्रात पुणे व नाशिक येथील विभागीय कार्यालयात विक्रीची व इंजेक्शन देण्याची सुविधा उपलब्ध आहे.

दि. १९/०६/२००९ चे अर्जाअन्वये सावळीविहिर ता. राहाता येथील रुग्णाचे पालक श्री. गोकुळ नानासाहेब आगलावे यांचे दोन मुले चि. प्रणव व चि. चेतन गोकुळ आगलावे यांचे दोन्हीही मुलांचे रक्तात Factor ८ व ९ चा अभाव आहे व त्यासाठी त्यांना काही जखम किंवा इजा झाल्यास पुणे येथील लोहाडे हॉस्पिटल यांचेकडे न्यावे लागते. श्री.आगलावे यांची अर्थिक परिस्थीती फार नाजुक असून सदर उपचाराचा खर्च श्री. आगलावे यांना परवडत नाही असे त्यांनी त्यांचे अर्जात म्हटले आहे.

तसेच उपरोक्त आजाराचे नगर जिल्हयात अशा प्रकारच्या रुग्णांची एकुण ५६ रुग्णांची यादी त्यांचे अर्जासोबत दिली असून संस्थानचे रुग्णालयात सदर सुविधा उपलब्ध करावी असे म्हटले आहे. सदरचा अर्ज मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावा असे मा. विश्वस्त डॉ. ए. भा. गोंदकर व मा. अध्यक्ष साहेब यांनी आदेश दिलेले आहेत.

उपरोक्त इंजेक्शन बाबद दि.१९/०८/२००९ रोजी वैद्यकिय संचालक यांनी हिमोफिलीया फेडेरेशन यांचे नाशिक येथील कार्यालयात जाऊन तेथील डॉ. रंजना कुलकर्णी, प्रेसीडंट यांचेशी चर्चा करुन माहीती घेतली होती. त्यांचेशी झालेल्या सविस्तर चर्चेनुसार सदरचे इंजक्शन हे Imported असून ते वेगवेगळया Strergth मध्ये उपलब्ध होत असतात. त्यामुळे तुम्ही त्यांचे पेमेंट प्रती युनिट प्रमाणे अदा करावे तसेच त्याची मुदत बाह्यता देखील खुप कमी असते.

यासाठी तुम्ही आमचेकडे Factor VIII व Factor IX प्रत्येकी २००० युनिट करीता आगाऊ रक्कम जमा ठेवावी कारण आम्हास आमचे दिल्ली कार्यालयास आगाऊ रक्कम अदा करुनच सदरचे इंजेक्शन खरेदी करावी लागतात, जर तुमचेकडे सदर इंजेक्शनचा वापर झाला नाही तर, आम्हास ६ महिने अगोदर पाठविल्यास आम्ही ती बदलून देऊ.

तसेच आपले रुग्णालयात आम्ही हिमोफिलीया केअर सेंटर चालवू इच्छीतो व त्यासाठी आपले रुग्णालयातील एक डॉक्टर, फिजिओथेरपीस्ट, लॅब टेक्नीशियन यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करु, असे देखील त्यांनी त्यांचे दि.०९/०९/२००९ रोजीचे ई-मेल पत्राद्वारे कळविले आहे.

उपरोक्त प्रस्तावाचा विचार करीता -

**१.** हिमोफिलीया फेडेरेशन सोसायटी, नाशिक यांना Factor VIII व Factor IX प्रत्येकी २००० युनिट आपणाकडे ठेऊन वेळोवळी त्यांचे लागू असलेले दरा प्रमाणे प्रती युनीट नुसार वापरलेली इंजेक्शनचे बील त्यांना दिलेल्या आगाऊ रक्कम मधून जमानावे करुन त्यांचेकडून पुढील इंजेक्शन साठी आगाऊ रक्कम देऊन खरेदी करता येतील त्यानुसार आगाऊ रक्कम वेळोवेळी देण्यास मान्यता असावी जेणेकरुन इंजेक्शन आपणाकडे मुदतबाह्य होणार नाही.

**२.** आपल्या रुग्णालयात हिमोफिलीया केअर सेंटरच कार्यान्वीत केल्यास त्याचा गरीब व गरजू रुग्णांना चांगल्या प्रकारे फायदा होऊन जिल्ह्यातील सर्व रुग्णांना याबाबत अवगत करता येईल. सदर प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समिती सभेचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करता येईल.

**३.** अहमदनगर जिल्ह्यात एकूण अशा प्रकारच्या ५६ रुग्णांची यादी श्री. आगलावे यांनी त्यांचे विनंती अर्जासोबत दिलेली आहे. सर्व रुग्णांना श्री साईबाबा रुग्णालयात इंजेक्शन उपलब्ध असलेबाबत कळविण्यात येईलच, परंतु सदरचे इंजेक्शन जास्त अंतरावर असलेल्या रुग्णांसाठी तातडीने उपचार मिळणेचे दृष्टीने तालुका रुग्णांची संख्या पाहुन ३-४ ठिकाणच्या तालुक्याच्या शासकिय, निमशासकिय किंवा धर्मादाय अथवा नामांकित खाजगी रुग्णालयात Factor VIII व Factor IX प्रत्येकी २००० युनिट उपलब्ध करुन देऊन त्यांचेकडून इंजेक्शनचा वापर झाल्याचे रेकॉर्ड घेऊन पुढील इंजेक्शन वेळोवेळी उपलब्ध करुन देता येईल.

अहमदनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय यादी खालील प्रमाणे.

| अ.नं. | तालुक्याचे नाव | पेशंटची संख्या | अ.नं. | तालुक्याचे नाव | पेशंटची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Ahmednagar | 14 | 8 | Rahata | 5 |
| 2 | Jamkhed | 1 | 9 | Rahuri | 4 |
| 3 | Karjat | 2 | 10 | Sangamner | 9 |
| 4 | Kopargaon | 4 | 11 | Shewgaon | 1 |
| 5 | Nevasa | 2 | 12 | Shrigondha | 5 |
| 6 | Parner | 2 | 13 | Shrirampur | 4 |
| 7 | Pathardi | 3 | Total Patient - | | 56 |

तरी उपरोक्त प्रमाणे १ ते ३ प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या श्री साईबाबा रुग्णालयात दोन्ही प्रकारचे इंजेक्शन factor VIII व factor IX हे प्रत्येकी २००० I.V ठेवण्यात येऊन त्यांचे प्रत्येक वेळचे असलेल्या पॅकींग व दराप्रमाणे अगाऊ रक्कम हिमोफेलीया सोसायटी, नाशिक यांना देण्यात यावी. व अहमदनगर जिल्हयातील सर्व रुग्णांना याबाबत अवगत करण्यात येऊन सर्व रुग्णांना मोफत उपचार करावेत, त्याचप्रमाणे संस्थानमार्फत हिमोफेलीया सब सेंटर/ सेंटर श्री साईबाबा रुग्णालयात स्थापन करुन या सेंटरव्दारे अशा रुग्णांवर उपचार करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकिय संचालक/वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२८** **सन २००९-१० या वार्षिक निविदेतील मंजूर दराने सूचर्स मटेरिअल खरेदीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे कार्डीयाक विभागात कार्डीयाक सर्जरीसाठी लागणाऱ्या उपरोक्त सुचर्स मटेरियल करीता सन २००९-२०१० या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने मे. जॉन्सन ॲण्ड जॉन्सन, मुंबई यांना इकडील पत्र क्र. ५३६८ दि. ०५/०५/२००९ अन्वये रु.१,५६,२६,१०७/- पुरवठा आदेश देण्यात आलेला होता व त्यामध्ये खालील सुचर्सचा समावेश होता. सदर सुचर्सचा पुरवठा त्यांनी आदेशाप्रमाणे पुर्ण केला असून सध्या त्याचा वापर होऊन साठा संपलेला आहे. त्यामुळे त्याच मंजुर दराने खाली नमुद केल्याप्रमाणे अजून सुचर्सस खरेदी करवयाची आहे. सदर सुचर्स कार्डीयाक ऑपरेशनसाठी लागतात. त्यासाठी त्यांनी वार्षीकमध्ये मागणी केलेली होती व त्यानुसार वार्षीक खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली होती. परंतू रुग्णांचे संख्येत वाढ झ ाल्यामुळे मागणी केलेला साठा अपुरा पडलेला आहे. त्यामुळे पुन्हा ४ महिने पुरु शकेल इतका साठा खरेदीचा प्रस्ताव आहे. त्यानंतर मागणी वाढल्यास त्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव ठेऊन मान्यता घेऊन खरेदी करता येईल, जेणेकरुन सुचर्स मुदतबाह्य / पडून राहणार नाही.

| Sr. No. | Description | Make | Brand Name | Packing | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | DAFILON POLYAMIDE SIZE 2/0, 70CM 3/8 CIRCLE CUTTING 45MM CODE - G0932010 | J & J | ETHILON 3/8 CIRCLE REVERSE CUTTINGE CODE NW 3336 | 12 FOILS | 40 | 754.00 | 30160.00 |
| 2 | PERMICRON BRAIDED POLYESTER 2/0, 4 GREEN /4 WHITE SUTURE 75CM PER FOIL, DOUBLE ARM 1/2 CIRCLE ROUND BODY WITH TROCAR POINT 17MM EASYSLIDE NEEDLE WITHOUT PLEDGETS | J & J | ETHIBOND 1/2CIRCLE TAPER CUT 5 GREEN 5 WHITE CODE W10B52 | 6 FOILS | 25 | 16252.00 | 406300.00 |
| 3 | PREMILINE POLYPROPYLENE SIZE 4/0 90CM DOUBLE ARM 1/2 C.R.B. EASYSLIDE® NEEDLE WITH SHORT CUTTING TIP 26MM CODE-C0090811 SH NEEDLE | J & J | PROLENE SH NEEDLE CODE W 8845 | 12 FOILS | 20 | 3066.00 | 61320.00 |
| 4 | PREMILINE POLYPROPYLENE SIZE 5/0 90CM DOUBLE ARM 1/2 C.R.B. 17MM CODE-C0090901 | J & J | PROLENE CODE W 8556 | 12 FOILS | 20 | 3811.00 | 76220.00 |
| 5 | PREMILINE POLYPROPYLENE SIZE 6/0 75CM DOUBLE ARM 3/8 C.R.B. TAPER POINT 12MM CODE-C0090916 | J & J | PROLENE 13MM NEEDLE CODE W 8706 | 12 FOILS | 5 | 3053.00 | 15265.00 |
| 6 | SILKAM BLACK SIZE 2/0 25M REELS CODE-289299 | J & J | ETHICON R823 | 6 FOILS | 5 | 1243.00 | 6215.00 |
| 7 | MERSILINE TAPE 30 X SR521 WITH NEEDLE | J & J | CODE NW 22 | BOX OF 1 FOILS | 10 | 2058.00 | 20580.00 |
| 8 | MERSILINE TAPE 30 X SR521 WITHOUT NEEDLE | J & J | CODE W21 | BOX OF 3 FOILS | 10 | 993.00 | 9930.00 |
| | | | | | | **Total Amt. in Rs.** | **625999.00** |

वरीलप्रमाणे मे.जॉन्सन ॲण्ड जॉन्सन,मुंबई यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु.६,२५,९९९/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०५/२००९ निर्णय क्रमांक

३८१ (A) अन्वये वार्षिक मागणी व्यतिरीक्त अजुन काही औषधांची अतिरिक्त गरज भासलेस ती वार्षिक मंजुर दराने मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तरी मे.जॉन्सन ॲण्ड जॉन्सन,मुंबई यांचेकडून वरीलप्रमाणे सुचर्स वार्षिक मंजुर दराने खरेदी केले असून याकामी येणाऱ्या रु. ६,२५,९९९/- खर्च आलेला आहे. सदर खरेदीची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.८२६** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे.जॉन्सन ॲण्ड जॉन्सन,मुंबई यांचेकडून सुचर्स वार्षिक मंजुर दराने खरेदी केले असून याकामी येणाऱ्या रु. ६,२५,९९९/- खर्च आलेला आहे त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२९** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील संगणकीय यंत्रणेच्या CMC & FMS कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयकरिता मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१८/१२/२००५ रोजीच्या सभेतील ठराव क्रं.३३ व निर्णय क्रं.७३६ नुसार मे.अलाईड डिजीटल सर्व्हीसेस प्रा.लि.मुंबई. यांना संगणकीय जाळे व संगणकीय साहित्य खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर होऊन आदेश देण्यात आलेला होता. सदर कॉन्ट्रॅक्ट FMS तिन वर्षाचा वारंटी पिरीयड असल्यामुळे कंपनीबरोबर FMS कॉन्ट्रॅक्ट होता, सध्या तो दि. ३१-०७-२००९ रोजीपासून संपलेला आहे. आतापर्यंत कंपनीचे कामकाज चांगले आहे व त्यांनी वेळेत कामकाज पूर्ण केले आहे. त्यानंतर सदर कंपनीस दोन महीन्यांकरीता FMS कॉन्ट्रॅक्ट ची दोन महीन्यांकरीता मुदतवाढ देणेत आली होती. त्याकरीता कंपनीस दि.१३/०८/२००९ रोजीच्या CMC चा दोन महिने कालावधी वाढून घेण्याकरिता वर्क ऑर्डर देण्यात आलेला होती. परंतू कंपनीने दि.१३-०७-२००९ रोजीचे त्यांचे ई-मेल द्वारे सदर कॉन्ट्रॅक्ट हा CMC नसून FMS होता. सदर कंपनीने FMS कॉन्ट्रॅक्ट दोन महिने वाढून दुरुस्ती व Spare-Parts चे खर्चाची मागणी केली होती, असे कंपनीने संस्थानला कळविलेले आहे. FMS कॉन्ट्रॅक्ट मध्ये आपणास फक्त टेक्निकल मनुष्यबळ (संगणक कार्यप्रणाली संदर्भात कामकाज करणारे इंजिनीयर व स्टाफ) मिळतो. या कालावधीत संगणकाची स्पेअर पार्ट बदलावी लागल्यास कंपनी त्याचा वेगळा आकार संस्थानकडून वसुल करणार आहे. करीता, मे.अलाईड डिजीटल सर्व्हीसेस यांचेबरोबर CMC कॉन्ट्रॅक्ट करणे गरजेचे आहे.

म्हणून संदर्भीय टिपणी अन्वये कंपनी बरोबर CMC कॉन्ट्रॅक्ट करावे किंवा FMS कॉन्ट्रॅक्ट करावे याबाबतचा प्रस्ताव सादर केला असता त्यावर CMC कॉन्ट्रॅक्ट करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत यावा असे निर्देश देणेत आलेले आहेत. तरी त्यानुसार CMC कॉन्ट्रॅक्ट करणेकामी मे.अलाईड डिजीटल सर्व्हीसेस प्रा.लि.मुंबई यांनी त्यांचे दि.१४-०७-२००९ रोजी CMC & FMS चा प्रस्ताव सादर केलेले आहे. त्यात त्यांनी सर्व कन्झ्युमेबल स्पेअरपार्टस्, बॅटरीज आणि दोन साईट इंजिनीयर चे दर हे समाविष्ट असलेबाबत कळविलेले आहे. सदरचे CMC कॉन्ट्रॅक्ट अंदाजे एका वर्षासाठी रु.१५,१७,०६०/- मात्र व ३ वर्षासाठी रु.४५,५१,१८०/- मात्र खर्च येणार आहे. तरी सदरचे कॉन्ट्रॅक्ट एक वर्षाचे करावे किंवा तीन वर्षाचे करावे याबाबत निर्णय होणेस तसेच मे.अलाईड डिजीटल सर्व्हीसेस, मुंबई यांचे सोबत CMC & FMS संदर्भात त्यांनी संस्थानला सादर केलेल्या प्रस्तावाबाबत चर्चा/वाटाघाटी होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत श्री के.व्ही.रमणी यांचे मार्गदर्शनाखाली साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली असल्याने सदरहू विषय मागे घेण्यात आला.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३०** **न्युरो ओ.टी साठी लाईट सोर्स खरेदीस मंजूरी मिळणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात न्युरो ऑपरेशन थिएटर व नविन न्युरो आय.सी.यु. विभाग कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. सदरचे न्युरो ओ.टी.मध्ये शस्त्रक्रिया करणेसाठी सध्या त्यांचेकडे वापरत असलेल्या लाईट सोर्सचा चांगला प्रखर प्रकाश पडत नाही व जास्त वेळ वापरल्यानंतर गरम होतो.

सदरचा लाईट सोर्स मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांचेकडून इकडील पत्र क्र. १०३० दि. २२/०१/२००९ अन्वये रक्कम रु. ८४३७.५० इतक्या रक्कमेत खरेदी केलेला असून तो साध्या प्रकारचा लाईट सोर्स आहे. सदरचा लाईट सोर्स जनरल मायनर शस्त्रक्रियासाठी उपयोगात येऊ शकतो. त्यामुळे न्युरो सर्जन डॉ.टिंगरे यांनी नविन Asculab, या Germany कंपनीच्या लाईट सोर्सची मागणी केलेली आहे. याकामी मे. बायोमेडीकॉन सिस्टीम, मुंबई यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दर मागवण्यात आले होते. त्यांचे कोटेशननुसार सदरचे खरेदीकामी अंदाजे रु.५,००,०००/- (अक्षरी रु.पाच लाख मात्र) खर्च येईल. याच प्रकारच्या लाईट सोर्ससाठी मे. कार्ल स्टोअर्ज, जर्मनी कंपनीचे अंदाजे रु.२,५०,०००/- इतके दर आहेत. दोन्हीही कंपन्या नामांकित व विदेशी असून त्यांचे लाईट सोर्स उत्तम दर्जाचे आहे.

तेंव्हा सदरचा लाईट सोर्स हा Karl Storz या जर्मन कंपनीचा खरेदी केल्यास योग्य दरात व चांगल्या प्रतीचा मिळेल. त्यासाठी अंदाजे रु.२,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर लाईट सोर्स खरेदी कामी अंदाजे खर्च रु.२,५०,०००/- चे खर्चास व सदर खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करता येईल.

**निर्णय क्र.८२८** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे Karl Storz किंवा तत्सम कंपनीचा लाईट सोर्स विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,५०,०००/- खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३१** **डिफिबीलेटर मशिनचे दुरुस्तीबाबत**

**प्रस्ताव-** **अ)** श्री साईबाबा हॉस्पिटलचे अतिदक्षता विभाग व ऑपरेशन थिएटर्समध्ये अत्यवस्थ रुग्णांना डिफीब्रीलेशन करणेकामी वापरले जाणारे Zoll Biphasic M Series डिफीब्रीलेटर्स ०३ नग मे.एल.ॲण्ड टी. लि., मुंबई यांचेकडून खरेदी करणेत आले आहेत. सदरचे डिफीब्रीलेटर्सकरीता कंपनीने दिलेला एक वर्षांचा वॉरंटी कालावधी संपलेनंतर मशीन्सची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरुस्तीकरीता काही स्पेअर पार्टसची आवश्यकता असल्यास मशीन कंपनीकडे पाठवुन अथवा स्पेअर पार्ट खरेदी करुन मशीन दुरुस्त केले जाते.

सध्या वरीलपैकी ०१ नग डिफीब्रीलेटर मशीन नादुरुस्त झाले असुन मशिनचे काही स्पेअर पार्ट खराब झाल्यामुळे बदलणेची आवश्यकता असल्याचे कंपनीचे इंजिनीअरने त्यांचे सर्व्हिस रिपोर्टनुसार कळविले आहे. सदरकामी डिफीब्रीलेटर मशिनचे पुरवठाधारक मे.एल.ॲण्ड टी. लि., मुंबई यांनी डिफीब्रीलेटरचे खराब झालेले स्पेअर पार्ट बदलणेकरीता सर्व करांसहीत एकुण रु.८१,०००/- इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. तसेच रकमेची आगाऊ मागणी केली आहे.

तरी डिफीब्रीलेटर मशीनचे दुरुस्तीकामी आवश्यक असणारे स्पेअर पार्टस मे.एल.ॲण्ड टी. लि., मुंबई यांचेकडून बदलून घेणेस व सदरकामी येणाऱ्या एकूण रु.८१,०००/- चे खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता असावी.

**ब)** श्री साईबाबा हॉस्पिटलचे अतिदक्षता विभाग व ऑपरेशन थिएटर्समध्ये अत्यवस्थ रुग्णांना डिफीब्रीलेशन करणेकामी वापरले जाणारे M/s.Medtronics Emergency Response Systems Inc. USA या उत्पादक कंपनीचे Life Pack २० डिफीब्रीलेटर्स -०५ नग सन २००६ या वर्षी कंपनीचे तेव्हाचे भारतातील अधिकृत विक्रेते मे. बी. पी. एल. लि., मुंबई यांचेकडुन खरेदी करणेत आले आहेत. सदर डिफीब्रीलेटर्सचा एक वर्षांचा वॉरंटी कालावधी संपलेनंतर सदर मशीनची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरुस्तीकरीता काही स्पेअर पार्टसची आवश्यकता असल्यास मशीन कंपनीकडे पाठवुन अथवा स्पेअर पार्ट खरेदी करुन मशीन दुरुस्त केले जाते.

सध्या वरीलपैकी ०२ नग डिफ़ीब्रीलेटर मशीन नादुरुस्त झाले असुन तपासणीअंती दोन्ही मशीनचे पॉवर सप्लाय मॉडयुल रात्रीच्या वेळी वाढणाऱ्या विजेच्या दाबामुळे खराब झाल्यामुळे बदलणेची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाबतीत डिफीब्रीलेटर मशीनचे पुरवठाधारक मे. बी. पी. एल. लि. मुंबई यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी पॉवर सप्लाय मॉडयुल ०१ नग करीता सर्व करांसहीत एकुण रु. ८४,३७५/- इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. त्यानुसार ०२ नग पॉवर सप्लाय मॉडयुल बदलणेकामी एकुण रु. १,६८,७५०/- इतका खर्च येईल.

परंतु डिफीब्रीलेटर मशीनच्या उत्पादक कंपनीचे भारतातील सध्याचे सर्व्हिस डीलर मे. लाईफ केअर मेडीकल सिस्टीम्स, मुंबई यांचेशी संपर्क साधला असता कंपनीने सदरचे दोन्ही पॉवर सप्लाय बोर्ड बदलणेकामी येणाऱ्या खर्चाचे सर्व करांसहीत एकुण रु. १,१०,०००/- (अक्षरी रु. एक लाख दहा हजार मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन सदर रकमेची आगाउ मागणी केली आहे.

तरी ०२ नग डिफीब्रीलेटर मशीनचे पॉवर सप्लाय मॉडयुल मे. लाईफ केअर मेडीकल सिस्टीम्स, मुंबई यांचेकडुन बदलुन घेणेस व सदर कामी येणाऱ्या एकुण रु. १,१०,०००/- चे खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.८२९** **उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. डिफीब्रीलेटर मशीन वारंवार नादुरुस्त होत असल्याने यासाठी करण्यात आलेल्या इलेक्ट्रीक वायरिंगची तपासणी करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३२** **श्रीसाईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडिक शस्त्रक्रिया विभागासाठी आर्थोपेडिक इन्स्ट्रुमेंट खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडीक शस्त्रक्रियेसाठी ऑपरेशन थिएटर विभागाने दि.०५/१२/२००८ चे पत्रान्वये आर्थोपेडीक इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली आहे. श्री साईनाथ ऑपरेशन थिएटर मध्ये असलेली जुनी इन्स्ट्रुमेंट खराब झालेली असल्यामुळे आर्थोपेडीक शस्त्रक्रिया करताना अडचण निर्माण होत आहे, त्यामुळे त्यांनी नविन आर्थोपेडीक इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि. १७/०५/२००९ रोजीचे सभेत उपरोक्त आर्थोपेडीक इन्स्ट्रुमेंट विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.४,७१,२७०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ६७०० दि. ०२/०६/२००९ अन्वये एकुण ०७ उत्पादक कंपन्या / अधिकृत विक्रेते यांचेकडून दि.२०.०६.२००९ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन ३ बंद कोटेशन प्राप्त झालेले होते, ते खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | M/s. Kalelkar Surgicals Pvt. Ltd., Mumbai | ०२ | M/s. Manman, Pune |
| ०३ | M/s. Trimox, Mumbai | | |

वरीलप्रमाणे तीन प्राप्त बंद कोटेशन दि. ११/०७/२००९ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आलेली असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे. सदर तुलनात्मक तक्ता आर्थोपेडीक तज्ञ डॉ.रामाराव, हैद्राबाद जे श्री साईबाबा रुग्णालयात मानद सेवा देतात तसेच श्री साईबाबा

रुग्णालयातील आर्थोपेडीक सर्जन डॉ.जपे व श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडीक सर्जन डॉ. गायकवाड यांना देखील दाखविण्यात आलेला आहे.

सदरच्या तक्त्यातील अ.नं.१ ड्रील सॉ पॉवर सिस्टिमकरीता मे. मनमन, पुणे या एकाच कंपनीचे दर प्राप्त झालेले असून सदर कंपनीचे ड्रील घेण्याची तीनही डॉक्टरांनी शिफारस केलेली आहे. सदर कंपनीचे ड्रील यापुर्वी देखील आपण रुग्णालयात घेतलेले असुन ते चांगल्या दर्जाचे आहे. जेथे ज्या इन्स्ट्रुमेंटसाठी दोन कोटेशन धारकांचे दर प्राप्त झालेले आहे, तेथे ज्यांचे दर निम्नतम असतील तेथे त्यांचे इन्स्ट्रुमेंट घेण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. तर ज्या इन्स्ट्रुमेंटसाठी एकाच कोटेशन धारकांचे दर प्राप्त झालेले आहे, तेथे त्यांचे इन्स्ट्रुमेंट घेण्याची शिफारस केलेली आहे.

उपरोक्त शिफारसीनुसार सदरचे खरेदीकामी एकुण रु.१,९०,१३२/- इतका खर्च येणार आहे.त्याची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे.

| अ.नं. | कोटेशन धारकांचे नांव | एकुण रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | मे. कालेलकर सर्जीकल, मुंबई | ६१५०.०० |
| २ | मे. मनमन, पुणे | ११२१६९.०० |
| ३ | मे. ट्रायमॉक्स, मुंबई | ७१८१३.०० |
| | **एकुण रक्कम रु.-** | **१९०१३२.००** |

सोबतच्या तक्त्यात अ.नं. २ व ११ करीता कोणाचेही दर प्राप्त झालेले नाही, ती आवश्यकतेनुसार खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे इन्स्ट्रुमेंट वरील पुरवठाधारकांकडून खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,९०,१३२/- चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.८३०** **प्रस्तावत नमूद केल्याप्रमाणे इन्स्ट्रुमेंट वरील पुरवठाधारकांकडून खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,९०,१३२/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३३** **श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन नष्ट करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामध्ये सर्व वॉर्ड/ ओ.टी.चे अतीशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले निरुपयोगी कपडे लिनन विभागाकडे जमा झाले आहेत.

यापुर्वी दिनांक २९/०४/२००९ च्या मंजुर टिपणीअन्वये सर्व वॉर्ड/ओ.टी.चे लिनन नष्ट केलेले आहे. दिनांक ३०/०४/२००९ पासुन विविध वॉर्ड/ विभागातुन निकामी लिनन जमा झालेले आहे त्याचा तक्ता सादर केला आहे. सोबत सादर केलेल्या तक्त्याप्रमाणे सदरचे लिनन जमा झाले असुन सदरचे लिनन वापरण्यास निरुपयोगी असलेबाबतची सहा.अधिसेविका व वैद्यकीय संचालक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे.

तरी सादर केलेल्या तक्त्याप्रमाणे लिनन वॉर्डमधील स्टॉक रजिष्टरमधुन कमी करुन रुग्णालयाच्या स्वच्छतेसाठी जे वापरण्यास योग्य आहे ते स्वछतेसाठी वापरता येईल तर उर्वरीत जाळुन नष्ट करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८३१** **उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३४** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये दिनांक २७.०९.२००९ रोजी झालेल्या शिबीराबाबत.**

**प्रस्ताव-** रविवार दि. २७.०९.२००९ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉ. प्रितम जपे व डॉ. संजय खुराणा, अस्थिव्यंग तज्ञ, यांचे देखरेखीखाली सांधारोपण व दुर्बिणीद्वारे सांध्याच्या शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सदरचे शिबीरास चांगला प्रतिसाद मिळाला असुन १०१ रुग्णांची तपासणी करणेत आलेली आहे. या रुग्णांपैकी १८ रुग्णांना कृत्रिम गुडघ्याच्या सांधारोपणाच्या व दुर्बिणीद्वारे लिगामेंटच्या शस्त्रक्रियेच्या तारखा देण्यात आलेल्या आहेत. या शस्त्रक्रिया हॉस्पिटलमधील उपलब्ध बेड संख्येनुसार व रुग्णांच्या सोयीच्या दृष्टीने पुढे टप्प्या-टप्प्याने करण्यात येणार आहेत.

संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमार्फत गरीब-गरजु रुग्णांना अस्थिव्यंग संदर्भात अतिविशेषोपचार सेवा शिबीराच्या निमित्ताने अत्यंत अल्प दरात मिळणार आहे. कारण रुबी, जहांगिर, संचेती, सह्याद्री व इतर नामांकीत हॉस्पिटलमध्ये या सांधारोपणाच्या शस्त्रक्रियेकरिता साधारणतः १,००,०००/- रुपये इतका खर्च येतो. परंतु त्यांच्या तुलनेने आपल्या हॉस्पिटलमध्ये रुग्णास फक्त २१,०००/- रुपये शस्त्रक्रिया खर्च येणार आहे. (कृत्रिम सांधा हा रुग्णास स्वखर्चाने घ्यावा लागतो.) यामुळे रुग्णास इतर हॉस्पिटलच्या तुलनेत किमान ८०,०००/- इतका आर्थिक लाभ होणार असुन त्यांना अशा प्रकारच्या गुंतागुंतीच्या अवघड शस्त्रक्रियेकरिता पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरांमध्ये जाणेची आवश्यकता नाही, प्रसंगी वेळ व पैसा दोन्हींची बचत होऊन रुग्णांस यामुळे लाभच होणार आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मागील दोन वर्षामध्ये सांधारोपणाच्या १५० यशस्वी शस्त्रक्रिया झालेल्या आहेत.

अशा प्रकारच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये होत असलेबाबत माहिती होणेकामी सांधारोपण व दुर्बिणीद्वारे सांध्याच्या शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीराकरिता हॅन्डबिल्स, बॅनर्स व वृत्तपत्र या प्रसिध्दी माध्यमांचा वापर करणेत आला. तसेच संबंधीत रुग्णांना/ नागरीकांना सांधारोपण शस्त्रक्रियेकरिता येणाऱ्या खर्चाबाबत कल्पना देण्यात आली. अशा प्रकारच्या गुंतागुंतीच्या अवघड शस्त्रक्रियेकरिता रुग्णांची संख्या ही खुपच दुर्मिळ असते. त्या प्रमाणात शिबीराचे दिवशी तपासणी करिता आलेल्या रुग्णांची संख्या अधिक होती.

या तपासणीमध्ये ज्या रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी निवड झालेली आहे अशा रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी पुढील तारीख देण्यात आली आहे.

**निर्णय क्र.८३२ उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३५ रेडिओलॉजिस्ट यांचे इन्सेन्टीव्हबाबत.**

**निर्णय क्र.८३३ सदरहू विषय मागे घेण्यात आला.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३६ डॉ.सुभाष शामकुंवर, आर.एम.ओ श्री साईबाबा हॉस्पिटल यांच्या वैद्यकीय उपचाराकरीता आगाऊ रक्कम देणे बाबत**

**प्रस्ताव-** डॉ. सुभाष शामकुंवर (R.M.O.) हे दि.१७/१०/२००५ पासून श्री साईबाबा रुग्णालयात कार्यरत असून यांना स्वतःला पोटाचा त्रास होत असतांना त्यांनी प्रथम श्री साईबाबा रुग्णालयातील डॉ. गोरे यांना दाखविले होते सर्व प्रकारच्या तपासण्या करुन तपासणी अंती डॉ. किरण गोरे यांनी त्यांना Liposuction + Abdominal Plasty ची शस्त्रक्रिया करायला सांगितली परंतु सदरची शस्त्रक्रिया साईबाबा हॉस्पिटलमध्ये होत नसल्यामुळे डॉ. किरण गोरे यांनी त्यांना पुढील शस्त्रक्रिया बॉम्बे हॉस्पिटल मध्ये करण्यास सांगितले. बॉम्बे हॉस्पिटल मधील डॉ. एस.आर. ताम्बेकर यांनी त्यांना Liposuction + Abdominal Plasty शस्त्रक्रिया करणे गरजेचे आहे. सदर शस्त्रक्रियेसाठी दि.१३/०५/२००८ चे Estimate Certificate नुसार रु.१,००,०००/- इतका खर्च सांगितलेला आहे.

संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ निर्णय क्र. १४ नुसार उपरोक्त शस्त्रक्रियेसाठी आगाऊ रक्कम देण्याची तरतूद नाही. डॉ सुभाष शामकुंवर यांनी त्यांच्या विनंती अर्जात म्हटले की, त्यांचेकडे सदरच्या शस्त्रक्रियेसाठी इतकी रक्कम उपलब्ध नाही, त्यामुळे त्यांनी सदरच्या शस्त्रक्रियेसाठी संस्थानकडे रु.१,००,०००/- इतकी आगाऊ रक्कम मिळावी असे त्यांचे दिनांक १०/०९/२००९ चे विनंती अर्जात म्हटलेले आहे. तसेच त्यांनी अर्जासोबत मा. उपाध्यक्ष साहेब यांचे दि.३१/०८/२००९ चे शिफारस पत्र आणलेले असून मा. उपाध्यक्ष साहेब यांनी त्यांना रु.१,००,०००/- इतकी आगाऊ रक्कम अवश्य देण्याचे करावे अशी शिफारस केलेली आहे. संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ मध्ये उपरोक्त शस्त्रक्रियेसाठी आगाऊ रक्कम देण्याची तरतूद नसल्याने व मा. उपाध्यक्ष साहेब यांची शिफारस असल्याने एक विशेष बाब म्हणून त्यांना आगाऊ रक्कम देणेबाबत पुढील निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८३४ डॉ.सुभाष शामकुंवर, आर.एम.ओ श्री साईबाबा हॉस्पिटल यांच्या वैद्यकीय उपचाराकरीता आगाऊ रक्कम मिळणेबाबतच केलेली विनंती अमान्य करण्यात येऊन त्यांनी प्रथम खर्च करुन संस्थानकडे परतावा मिळणेसाठी अर्ज करावा असे ठरले .** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३७ जादा वैद्यकीय बीलांचा परतावा मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे.

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | आजाराचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. लक्ष्मण सदाशिव चव्हाण | मानेचा कॅन्सर | टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई | १३११७.०० | १३११७.०० |
| २ | डॉ. सौ.प्रणोती रुपेश जडगे | Renal ICA & Retroperitoncal Malignancy & Sarcoma | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी | ३०५७५.०० | ३०५७५.०० |
| ३ | श्री.पांडुरंग एकनाथ बकरे | Ca Breast Cancer | नामको हॉस्पिटल, नाशिक | १२७०३.०० | ९६९१.०० |
| ४ | श्री.मधुकर भिवाजी डोखे | Idiopathic Isosexual Central Precocious Puberty | के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई | २८१३४.०० | २८०५४.०० |
| | | | एकुण रक्कम रु.- | ८४५२९.०० | ८१४३७.०० |

**निर्णय क्र.८३५ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३८ विविध बांधकामांना मुदतवाढ देणे बाबत**

**प्रस्ताव-** **अ) संस्थानचे विविध ठिकाणचे जमिनीचे भोवताली काटेरी तारेचे कुंपण करणेकामाचे ठेकेदार यांचे मूदतवाढीबाबत.**

संस्थानचे विविध ठिकाणी खरेदी केलेल्या प्लॉटचे कडेने काटेरी तारेचे कुंपण करणेचे काम ठेकेदार आर.एल. भुतडा, कोपरगांव यांना इकडील जा.नं. १६५५८/२००८ दि. १२/११/२००८ चे कार्यादेशान्वये देण्यात आलेले आहे. निविदा व करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याचा कालावधी नऊ महिने म्हणजे दि. १०/०१/२००९ ते दि. ३०/०९/२००९ असा होता. ठेकेदार यांची काम पूर्ण करण्याची मूदत दि. ३०/०९/२००९ रोजी संपुष्टात आली असून ठेकेदार यांनी दि. ०५/१०/२००९ रोजीचे पत्रान्वये त्यांना आलेल्या खालील अडचणीमुळे मूदतीत काम पूर्ण करु शकले नाही. म्हणून ०६ महिन्यांची मूदतवाढ मिळण्याची विनंती केली आहे.

१. संस्थानचे गट नं. १९५,२४९,१८६, १९९ ते २०१, २५०, २१८,२४५ या प्लॉटचे हद्दी कायम नसल्याने ते लवकर काम पूर्ण करु शकले नाही.
२. तार कंम्पाउंड करावयाचे प्लॉटमधील काटेरी झाडे, झुडपे, प्लॉटमधील मातीचे ढीग, प्लॉटमध्ये जाणेकरीता रस्ता नसल्यामुळे याकारणामुळे काम करणेस अडचण आली.
३. प्लॉटचे हद्दी कायम नव्हत्या आणी लगतचे शेतकऱ्यांनी हरकत घेतल्याने प्लॉटमध्ये टाकलेले पोल उचलून दुसऱ्या प्लॉटमध्ये टाकण्यात आले. हद्दी कायम केल्यानंतर पुन्हा दुसऱ्यांदा प्लॉटमध्ये तार कम्पाऊंडचे साहित्य टाकण्यात आले यामुळे विलंब झाला.
४. संस्थान प्लॉटचे हद्दी मोजमापानुसार कायम करणेकामी लगतचे शेतकऱ्यांनी घेतलेल्या हरकतीमुळे कामास विलंब झाला.
५. पावसामुळे प्लॉटमध्ये मटेरीअल टाकणे व पोल उभे करणेस अडचणी आल्याने कामास विलंब झाला.

उपरोक्त सर्व सबबींचा विचार करुन ठेकेदार यांनी उर्वरीत प्लॉटचे कडेने तार कंमाउंड करणेकामी सहा महिने मूदतवाढ मिळणेची विनंती केली आहे.

ठेकेदार यांचे तार कम्पांऊड करणेकामी पूर्ण केलेल्या व बाकी असलेल्या तारकम्पाउंड कामाचा तपशिल खालीलप्रमाणे.

**I)** मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थानने भूसंपादीत केलेल्या जमिनीचे भोवताली तार कम्पाऊंड करणे कामी ठेकेदार यांनी पूर्ण केलेल्या कामाचा तपशिल :-

| **अ.नं.** | **गट नं.** | **तार कम्पांडची लांबी (मिटर)** | **कामाचा तपशिल - तार कम्पाउंड कामी आर.सी.सी पोल उभे करुन काटेरी तार लावणे व गेट उभारणी करणे.** |
|---|---|---|---|
| ०१ | ८७ | ६७०.०० | काम पुर्ण |
| ०२ | ८८ | | |
| ०३ | १८३ | ९३७.०० | काम पूर्ण |
| ०४ | १८६ | ५१०.६४ | काम पूर्ण |
| ०५ | २१८ | ५२५.१५ | काम पूर्ण |
| ०६ | २२१ | १११५ | पश्चिम बाजुचे १५४ मी लांबी व्यतीरीक्त काम पुर्ण |
| ०७ | २४५ | | |
| ०८ | १९८ | ९८६.०२ | काम पूर्ण, उत्तर बाजू ३०० मी काम बाकी |
| ०९ | १९९ | | काम पूर्ण |
| १० | २०० | | काम पूर्ण |
| ११ | २०१ | | काम पूर्ण |
| १२ | १९५ पै | ३१९+२३३ | काम पूर्ण |
| १३ | २५० | ९६७.०० | किरकोळ भागातील कामा व्यतीरीक्त काम पुर्ण |
| | | ६२६२.७५ मी | |

उपरोक्त प्लॉटचे एम एम गेट उभारणी कामाव्यतिरिक्त काम पूर्ण.

II) ठेकेदार यांचे खालील गटाचे तारकम्पाऊंड करणेचे काम बाकी आहे.

| अ.नं. | गट नं. | तार कम्पांडची लांबी मिटर | कामाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | २२९ | ५७५ | काम बाकी |
| २ | २३५ | ८११ | काम सुरु |
| ३ | २४९ | १०१४ | काम पूर्ण |
| ४ | २३८ पै | ४२१ | काम बाकी |
| ५ | २३४ पै | ३६८ | काम बाकी |
| ६ | १२१/ब-१ १२१/अ-२ (कनकुरी) | ५०८ | काम बाकी |
| ७ | १२४/२ब/२/१ (शिर्डी) | ३१३ | काम बाकी |
| ८ | १२४/२ब/२/२ (शिर्डी) | ३१४ | काम बाकी |
| | | ४३२४ मी | |

१. ठेकेदार यांनी एकूण २१ प्लॉटपैकी १३ प्लॉटमधील तारकंपाउंडचे काम ठेकेदार यांनी पूर्ण केले आहे. काम चालू असताना प्लॉट नं. १९५,२४५,१९८ ते २०१, २५० २२१, २१८, १८६ चे लगतच्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण केलेले होते. सदर शेतकऱ्यांची कपाउंडचे कामास विरोध केला होता. वेळोवेळी त्यांचेशी वेळोवेळी चर्चा करुन सरकारी मोजणीचे नकाशे, जागेवरील सद्य परिस्थिती दाखविण्यात आली व त्यानंतर त्यांनी सहमती दिल्यानंतर सदरचे प्लॉटचे काम पूर्ण करण्यात आले.

२. अद्यापही प्लॉट नं. २२९,२४९, २४५ पै., १९८, १७२ चे लगतचे शेतकऱ्यांनी तारकंपाउंड कामास विरोध केला आहे. त्यामुळे सदरचे काम ठेकेदार यांनी स्थगित ठेवले आहे.

तरी उपरोक्त अडचणी विचारात घेता ठेकेदार यांना तारकम्पाउंडचे उर्वरीत काम पूर्ण करणेकरीता चार महिने दि. ३०/०१/२०१० पर्यंत मूदतवाढ देणेबाबत पुढील आदेश होणेस विनंती.

**ब) <u>स.नं.१४८ मधील द्वारावती भक्तनिवास इमारत बांधकाम ठेकेदार मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई यांना मुदतवाढ मिळणेबाबत</u>**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे स.नं. १४८ मधील व्दारावती भक्तनिवास बांधकाम ठेकेदार मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई यांचेमार्फत 'तळमजला (पार्कींग) अधिक तिन मजले बांधकाम करणे ' व '४ था मजला बांधकाम करणे व रस्ता कॉक्रीटीकरण करणे ' अशा दोन स्वतंत्र निविदा मागवुन करून घेण्यात आले आहे. तळमजला (पार्कींग) अधिक तिन मजले बांधकामातील खोल्या माहे मार्च, २००९ पासून तसेच ४ था मजला बांधकामातील खोल्या माहे ऑगस्ट, २००९ पासून भक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन देणेत आलेल्या आहेत. सदर बांधकामांचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे-

| कामाचे नांव | तळमजला (पार्कींग)अधिक तिन मजले बांधकाम करणे. | ४ था मजला बांधकाम व रस्ता कॉक्रीटीकरण करणे. |
|---|---|---|
| आर्किटेक्ट | आर्किटेक्ट मे.काबरे- चौधरी, नाशिक. | आर्किटेक्ट मे.काबरे- चौधरी, नाशिक. |
| बांधकाम ठेकेदार | मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई | मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई |
| मंजूर निविदा रक्कम | रु.११,६२,३५,२२६.७३ + भावफरक | रू.६,४५,७७,५३१.००<br>+ भावफरक |
| कार्यादेश क्रमांक | जा.क्र.एसएसएस/वशी/बांध/२०२६/०६, दि.१३ फेब्रु.,२००६. | जा.नं.SSST-WS-CONST-१८३५/२००८ दि.३०/०१/२००८ |
| कामाची मुदत | १८ महिने ( दि. २९ सप्टेंबर, २००७ अखेर). | ०७ महिने (दि.१४ सप्टेंबर,२००८ अखेर). |
| मंजूर मुदतवाढ | ३०/०४/२००९ अखेर | ३०/०४/२००९ अखेर |
| कामाची सद्य:स्थिती | काम पूर्ण. | काम पूर्ण. |
| शेरा | ठेकेदार यांनी अंतिम बिल सादर केले नाही, त्यामुळे अंतिम बिल तपासणी व आदा करणे बाकी. | |

ठेकेदार गोलानी यांनी दि.१७.०९.२००९ चे पत्रान्वये वाढीव मुदतीत काम पूर्ण करणे शक्य झाले नाही, करीता सदर काम पूर्ण करणेसाठी दि.१५/०८/२००९ अखेर मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे. सदरहु पत्रान्वये कळविलेल्या विलंबाबतचे कारणांचा गोषवारा खालीलप्रमाणे : -

१. Deviations -तळमजला(पार्कींग)अधिक तिन मजले बांधकाम व ४ था मजला बांधकाम निविदेतील विद्यूतविषयक डिझाईनमुळे सदर बार्बीमध्ये Deviations झाले.
२. Increase in scope of work-विद्यूतविषयक डिझाईनमधील बदलांमुळे व बऱ्याच अतिरिक्त बाबींमुळे विद्यूतविषयक बाबींची किंमत निविदेपेक्षा वाढ झाली.
३. Execution of work in building already put to use- तळमजला(पार्कींग)अधिक तिन मजले बांधकाम पूर्ण झाल्यानंतर इमारत भक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन देणेत आल्यानंतर ४ था मजला बांधकाम करणे अवघड असल्याने विलंब लागला.
४. Work of specialized agencies- लिफ्ट,सोलर इ.कामाचे समन्वयन करणे अवघड असल्याने विलंब लागला.

तसेच त्यांनी त्यांचे पत्रातील मुद्दा क्र. ३ व ४ साठी लागलेला विलंब हा ठेकेदार गोलानी यांनी विहीत पदधतीने सर्व कागदपत्रांसह बिले सादर न केल्याने तसेच बांधकाम साहित्याचे नमुने व दरपत्रके वेळेवर सादर न केल्याने लागलेला आहे. पहिल्या टप्प्यातील तिन मजल्यावरील खोल्यांचा वापर दिनांक ०५.०३.२००९ पासुन सुरु करण्यात आलेला आहे. व चौथ्या मजल्यावरील खोल्यांचा वापर दिनांक १४.०८.२००९ पासुन सुरु करण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे ठेकेदार यांचे विनंतीवरून व कामास लागलेल्या विलंबाबतची कारणे विचारात घेता ठेकेदार यांना तळमजला (पार्कींग) अधिक तिन मजले बांधकाम व ४ था मजला बांधकाम करणे या दोन्ही कामांसाठी साडेतिन महिने (१५/०८/२००९अखेर) मुदतवाढ देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८३६** **उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.शेती महामंडळाचे खरेदी केलेल्या जमिनीस ज्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण केलेले आहे व तारकंपाऊंड करण्यास अडथळा आणतात अशा शेतकऱ्यांशी प्रथम चर्चा करुन घ्यावी व त्यातून मार्ग न निघाल्यास अशा शेतकऱ्यांच्या अडथळयाविषयी सक्षम अधिकाऱ्यांसमोर संस्थानच्या वतीने अर्ज दाखल करुन प्रसंगी पोलिस कारवाई करण्याची कार्यवाही करावी,असे ठरलें.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/विधी अधिकारी )

---

**विषय नं.३९** **श्री साईनाथ रुग्णालयातील धर्मशाळा क्र.०१ व ०२ च्या खिडक्यांना नेटलॉन जाळी बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाने दि.३०.०९.२००९ रोजीचे डी.पी. नुसार कळविले आहे की, रुग्णालय परिसरांत डासांचे प्रमाण वाढले आहे. तसेच पेशंट व पेशंटचे नातेवाईक खिडक्यांतून कचरा, पाणी टाकतात व थुंकतात त्यामुळे रुग्णालय परिसर खराब होतो. त्यामुळे धर्मशाळा क्र. ०१ व ०२ च्या इमारतीतील सर्व खिडक्यांना नेटलॉन जाळया बसवून मिळाव्या धर्मशाळा क्र. ०१च्या इमारतीत तळमजला, पहिल्या व दुसऱ्या मजल्याच्या खिडक्यांना व धर्मशाळा क्र. ०२ च्या इमारतीत पहिल्या व दुसऱ्या मजल्याच्या खिडक्यांना नेटलॉन जाळी लावणेस कळविले

आहे. याकामी एकूण ३२० खिडक्यांना नेटलॉन जाळी बसवावी लागणार आहे. यासाठी येणाऱ्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | परिमाण/ एकक | अंदाजे दर | अंदाजे खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | नेटलॉन जाळी | ५३७६ चौ.फुट | ७ प्र. चौ.फुट | ३७,६३२.०० |
| २ | सागवान पट्टी | ५५.०० घ.फुट | ७०० प्र. घ.फुट | ३८,५००.०० |
| ३ | चांभारी टेकस | ०३ किलो | ८० प्र.किलो | २४०.०० |
| ४ | फेव्हीकॉल | ०५ किलो | १६५ प्र.किलो | ८२५.०० |
| ५ | स्टिकींग पट्टी | ५२४८ र. फुट | १० प्र.र. फुट | ५२,४८०.०० |
| ६ | मजुरी खर्च | ३२० खिडक्या | १०० प्र.खिडक्या | ३२,०००.०० |
| | | | रुपये- | १,६१,६७७.०० |
| | | | अधिक ५% कन्टेनजन्सी- | ८,०८४.०० |
| | | | एकूण रु. | १,६९,७६१.०० |

सदरचे काम करणेसाठी मटेरीअलचे व मजुरीचे कोटेशन मागवून करुन घेता येईल. वर नमूद केलेप्रमाणे कामाचे पूर्ततेसाठी रक्कम रु.१,६९,७६१.०० मात्रचा खर्च अपेक्षित आहे. तरी सदरहू खर्चास व याकामी मटेरीअल व मजुरीसह संपूर्ण कामासाठी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेकरीता मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.८३७ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील धर्मशाळा क्र.०१ व ०२ च्या खिडक्यांना नेटलॉन जाळी बसविणेकामी मटेरीअल व मजुरीसह संपूर्ण कामासाठी विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून काम करुन घेण्यास व याकामी येणारे रक्कम रु.१,६९,७६१.०० मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४० शिर्डी विकास योजनेमधील रस्त्याचे (नांदुर्खी रस्ता १८ मीटर रुंदीकरण) बाधित होणाऱ्या (भू-संपादीत होणाऱ्या) क्षेत्राच्या बदल्यात अतिरिक्त (वाढीव) बांधकाम क्षेत्रास परवानगी मिळणेकामी सादर करावयाच्या प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** शिर्डी विकास योजनेतील नांदुर्खी रस्ता १८ मीटर रुंदीकरणासाठी आरक्षित आहे. सदर रस्त्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षेत्राचे भूसंपादन करण्याचे काम मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेमार्फत सुरु आहे. सदर रस्त्याचे भूसंपादन शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत होत आहे.

मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दिनांक ०१ ऑक्टोबर, २००९ रोजीचे पत्रानुसार, खाली नमूद केलेल्या संस्थान मालकीच्या जमिनीतून, सर्व्हे नंबरचे पुढे दर्शविलेले क्षेत्र बाधित होत असलेबाबत / भूसंपादीत होत असलेबाबत कळविले आहे :

| अ.नं. | सर्व्हे नंबर | भूसंपादनाने बाधीत होणारे क्षेत्र |
|---|---|---|
| ०१ | शिर्डी सर्व्हे नंबर १२५ पैकी | २८३.०० चौमी |
| ०२ | शिर्डी सर्व्हे नंबर १२६ पैकी | ३६४.२५ चौमी |
| ०३ | शिर्डी सर्व्हे नंबर १४८ पैकी | ०७८.५० चौमी |

उपरोक्त संस्थानचे भूसंपादित होणाऱ्या क्षेत्राची मोबदल्याची रक्कम संस्थानला मिळणार आहे. तथापि, सदरचे क्षेत्र नगरपंचायतीस विनामुल्य उपलब्ध करुन दिल्यास त्याबदल्यात संस्थानला बांधकामामध्ये तेवढेच वाढीव बांधकाम क्षेत्र मिळणार आहे, असे शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी कळविले आहे. त्यासाठी विहीत नमुन्यात प्रस्ताव अर्ज व रक्कम रुपये १००/- मात्रच्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र करुन द्यावे लागणार आहे.

**(ब)** शिडी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत शिर्डी शहर व परिसरातील पहिल्या प्राधान्य गटातील ११ रस्त्यांचा विकास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे पूर्ण आर्थिक सहाय्यातून, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे माध्यमातून व शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे सहकार्याने होणार आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्प राबविणेत येत असून, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००६/ ८७६/(१३९)/का.सोळा, दिनांक १९ सप्टेंबर, २००८ अन्वये प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांचे विकासासाठी रक्कम रुपये २८ कोटी मात्र पर्यन्तचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. या आदेशातील भूसंपादनाची कार्यवाही चालू असलेले रस्ते या शीर्षाखालील अ.नं. ०१ मध्ये नांदुर्खी रस्ता १८ मीटर रुंदीकरण व डांबरीकरण करणे याचा समावेश आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व शासनाचे दिनांक १९ सप्टेंबर, २००८ रोजीचे कार्योत्तर मान्यतेनुसार, शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील ०९ रस्त्यांचे विकासासाठी आवश्यक असणारे भूसंपादनाचे मोबदल्यापोटी, भूसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार २/३ रक्कम रुपये १८.२३ कोटी मात्र मा. भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडेस दिनांक २८ मार्च, २००७ रोजी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे वतीने वर्ग करणेत आलेले आहेत.

म्हणजेच थोडक्यात, शिर्डी विकास योजनेतील रस्ते भूसंपादित करणेसाठी मोबदल्यापोटी संस्थानने शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामुळे परिच्छेद अ मध्ये नमूद केलेल्या संस्थानचे भूसंपादित क्षेत्रापोटी संस्थानला जी नुकसान भरपाईची रक्कम मिळणार आहे, ती संस्थानचीच असणार आहे.

**(क)** आता, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी परिच्छेद अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, भूसंपादित होणाऱ्या क्षेत्राच्या बदल्यात मोबदला घेतला नाहीतर त्याचेऐवजी संस्थानला तेवढेच वाढीव बांधकाम क्षेत्र देणेत येणार आहे. त्यामुळे संस्थानला वाढीव बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय होईल. या बाबीचा विचार करता, भूसंपादित होणाऱ्या जमिनीच्या मोबदल्यापोटी / मोबदला न घेता वाढीव बांधकाम क्षेत्र मागणी करणे उचित होणार आहे.

तथापि, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७ (३) समितीची अधिकार व कर्तव्ये मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे :

.. .. (३) विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रामित करण्यात येणार नाही.

या तरतुदीनुसार, उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमूद केलेले व भूसंपादित होणारे क्षेत्र नगरपंचायतीला विनामुल्य उपलब्ध करुन देणेस व त्या मोबदल्यापोटी वाढीव बांधकाम क्षेत्र घेणेस मा. व्यवस्थापन समितीची व शासनाची मान्यता आवश्यक आहे.

परंतु, मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सुचविलेल्या उपरोक्त पर्यायाबाबत सविस्तर प्रस्ताव अर्ज व प्रतिज्ञापत्र दिनांक १४ ऑक्टोबर, २००९ रोजीचे आत सादर करण्याचे बंधन दिनांक ०१ ऑक्टोबर, २००९ रोजीचे पत्रानुसार घातलेले होते. त्यामुळे मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सुचविलेला, भूसंपादनाच्या मोबदल्यापोटी वाढीव बांधकाम क्षेत्र हा पर्याय उचित असल्याने याबाबतचा प्रस्ताव व प्रतिज्ञापत्र नगरपंचायतीकडे सादर करण्यात आलेले आहे.

तसेच याबाबत सादर करणेत आलेल्या प्रस्तावात, सदरहू बाबींस मा. व्यवस्थापन समितीची व शासनाची मंजूरी घेणेत येत आहे. मा. व्यवस्थापन समितीच्या व शासनाच्या मान्यतेस अधिन राहून वाढीव चटई क्षेत्र (निदेशांक) मिळणेचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे, असे नमूद करणेत आलेले आहे.

**(ड)** उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमूद केलेल्या विवेचनास अनुसरुन खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती आहे

०१. संस्थान मालकीचे परिच्छेद अ मध्ये नमूद केलेले, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२५ पै मधील क्षेत्र २८३ चौरस मीटर, सर्व्हे नंबर २६ पै मधील क्षेत्र ३६४.२५ चौरस मीटर आणि सर्व्हे नंबर १४८/२ पै, १४८/३ पै व १४८/३ पै मधील क्षेत्र ०७८.५० चौरस मीटर हे क्षेत्र शिर्डी विकास योजनेतील नांदुर्खी रस्ता १८ मीटर रुंदीकरणासाठी भूसंपादित होत आहे, ते शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणेस व त्यापोटी तेवढेच वाढीव बांधकाम क्षेत्र शिर्डी नगरंपचायत, शिर्डी यांचेकडून उपलब्ध करुन घेणेकामी मा. कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास व प्रतिज्ञापत्रास कार्योत्तर मान्यता असावी.

०२. याकामी अधिनियमातील तरतुदीनुसार मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेकामी प्रस्ताव सादर करणेस मान्यता असावी.

०३. याकामी संस्थान जमिनीचे ७/१२ उतारे, फेरफार उतारे, मोजणी नकाशे उपलब्ध करुन घेणेसाठी व इतर अनुषंगिक कामांसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८३८ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४१ STP Plant करिता Sodium Hypochlorite खरेदी बाबत**

**निर्णय क्र.८३९ सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.४२ श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान कार्यालयाचे पश्चिम बाजूकडील व शैक्षणिक संकुल (इंग्लिश मिडीयम स्कूल) पश्चिमेकडील संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे बाबत**

**प्रस्ताव-** **अ)** मा. कार्यकारी अधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांनी दिनांक ०५ ऑक्टोबर, २००९ रोजी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरामध्ये पहाणी केली असता, भक्तनिवासस्थान कार्यालयाचे पश्चिम बाजूकडील (गॅस शेडचे बाजूकडील) असलेले तारकम्पांउंडचे जागेवर संरक्षक भिंत बांधकाम करुन घेणेबाबत सूचना केली. तसेच सदरहू परिसरामधील शैक्षणिक संकुल (इंग्लिश मेडीयम स्कुल) पश्चिमेकडील (अहमदनगर - मनमाड राज्य महामार्गाचे बाजूने) असलेल्या संरक्षक भिंतीला प्लास्टर करुन, साई आश्रम प्रकल्पाचे परिसराशी सुसंगत अशी कम्पांउड वॉलचे बांधकाम करणेबाबत सुचना केली आहे.

**ब)** उपरोक्त परिछेद अ मध्ये मा. कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या सूचनाप्रमाणे सदरहू कामासाठी विभागामार्फत अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. त्यामध्ये कोपींग, विट बांधकाम, प्लास्टर, चेनलिंक जाळी, रंगकाम इ. कामांचा समावेश असून या अंदाज पत्रकानूसार यासाठी अंदाजीत रुपये १७,६७,८२६/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त ब प्रमाणे करणेत आलेल्या अंदाज पत्रकानूसार संरक्षक भिंतीचे बांधकाम, प्लास्टर व रंगकाम करुन घेणेकामी येणारे रुपये १७,६७,८२६/- मात्रचे खर्चास तसेच याकामी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन स्पर्धात्मक सिलबंद निवीदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८४० प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान कार्यालयाचे पश्चिम बाजूकडील व शैक्षणिक संकुल (इंग्लिश मिडीयम स्कूल) पश्चिमेकडील संरक्षण भिंतीचे बांधकाम करणेकामी दोन स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. इंग्लिश मिडीयम स्कूल इमारतीचे**

**पश्चिमेकडील भिंतीची उंची कलर कोटेड शिट बसवून वाढविण्यात यावी. यासह याकामी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.४३ श्री दिगंबर निवृत्ती जगताप व इतर ०३ रा.शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर यांची मौजे कनकूरी येथील गट नंबर १३४ मधील क्षेत्र ८४ आर खरेदी घेणेबाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री.दिगंबर निवृत्ती जगताप, श्री. नवनाथ निवृत्ती जगताप, सौ. हिराबाई रायभान गुंजाळ, श्रीमती यमुनाबाई निवृत्ती जगताप सर्व राहणार शिर्डी, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांनी, त्यांची मौजे कनकुरी, तालुका राहाता येथील गट नंबर १३४ क्षेत्र ०० हे ८४ आर जमीन संस्थानने विकत घ्यावी, म्हणून दिनांक २५ मे, २००९ रोजी विनंती अर्ज दिलेला आहे.

**(ब) जमिनीविषयक माहिती :**

श्री. दिगंबर निवृत्ती जगताप व इतर ०३ यांनी सादर केलेल्या उपरोक्त अर्जासोबत जमिनीचे ७/१२ उतारा व इतर फेरफार जोडलेले आहेत. सदरहू जमिनीच्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे वस्तुस्थिती दिसून येत आहे :

| अ.नं. | गाव व गट नंबर | क्षेत्र | कब्जेदार सदरी असलेली नोंद | इतर हक्कातील नोंदी |
|---|---|---|---|---|
| ०१ | मौजे कनकुरी **गट नंबर १३४** | ०० हे ७५ आर<br>०० हे ०९ आर पोख<br>**०० हे ८४ आर** | दिगंबर निवृत्ती जगताप<br>नवनाथ निवृत्ती जगताप<br>हिराबाई रायभान गुंजाळ<br>यमुनाबाई निवृत्ती जगताप | ०१. कनकुरी वि.का.सोसा. इ.प.क.घे.<br>०२. शिर्डी वि.का.सोसा. इ.प.क.घे.<br>०३. श्री साई नागरी सह.पतसंस्था मर्या., शिर्डी ग.ख.क.घे.<br>०४. विहीर सामायिक |

सदरहू उताऱ्यात पिकपहाणीस दिगंबर निवृत्ती जगताप व इतर यांचे नाव आहे.

सदर जमीन ही कनकुरी व शिर्डी येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीस तसेच श्री साईनागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शिर्डी यांना कर्जापोटी तारण आहे.

**(क) जमिनीची भौगोलिक स्थिती :**

अर्जदार यांचा मौजे कनकुरी येथील विषयांकित गट नंबर १३४ हा शिर्डी संस्थान - पिंपळवाडी - कनकुरी पाणीपुरवठा तळयाचे गट नंबर ११९, १२० व १२७ च्या पुर्व दिशेला गट नंबर १३२ व १३३ सोडून जवळ आहे.

**(ड) जमिनीच्या किंमतीबाबत :**

अर्जदार श्री. जगताप व इतर ०३ यांनी त्यांचे दिनांक २५ मे, २००९ रोजीचे अर्जात जमिनीची किंमत रक्कम रुपये ०३ लाख मात्र प्रति गुंठा मिळावी, अशी मागणी केलेली आहे. त्याबाबत विवेचन असे की,

०१. सन २००८ चे शासकीय मुल्यांकन दर (रेडिरेकनर) सन २००९ साठी अंमलात आहेत. सदरहू मुल्यांकन दर पुस्तिकेत (पान १३२ विभाग क्रमाक ०६) गट नंबर १३४ चा दर रक्कम रुपये ५,००,०००/- मात्र प्रति हेक्टर म्हणजेच रक्कम रुपये ५०००/- मात्र प्रति आर दर्शविलेला आहे.

०२. संस्थानने यापूर्वी म्हणजेच माहे मार्च, २००८ मध्ये श्री. बाबासाहेब रामभाऊ डांगे यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १२१ पैकी मधील क्षेत्र ०१ हे ५० आर रक्कम रुपये १ लाख मात्र प्रति आर या दराने खरेदी घेतलेली आहे.

०३. संस्थानने नुकतीच म्हणजेच माहे मार्च, २००९ मध्ये श्री.अण्णासाहेब रामभाऊ डांगे यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १२१ पैकी मधील क्षेत्र ०० हे ७९ आर रक्कम रुपये १,७१,०००/- मात्र प्रति आर या दराने खरेदी घेतलेली आहे.

०४. तसेच, श्री. देवराम बंडू पवार यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १३५/१ पैकी मधील क्षेत्र ०० हे ८० आर जमीन रक्कम रुपये १,८१,०००/- मात्र आर या दराने खरेदी करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीने दिनांक ०८ फेब्रुवारी, २००९ रोजीच्या सभेत निर्णय घेतलेला आहे. तथापि कायदेशीर बाबीमुळे सदरहू खरेदी प्रलंबित आहे.

उपरोक्तपैकी अ.नं. ०२ व ०३ च्या जमिनी पाणीपुरवठा तळयाचे दक्षिणेला, अ.नं. ०४ ची जमीन तळयाचे पुर्व-दक्षिणेला तर अर्जदार श्री. जगताप यांची विषयांकित जमीन पाणीपुरवठा तळयाचे पुर्वेला आहे.

**(इ) जमिनीची उपयुक्तता :**

अर्जदार श्री. जगताप यांची जमीन संस्थानच्या पाणीपुरवठा तळयालगत असून, जमिनीचे क्षेत्र ८४ आर म्हणजेच साधारणतः ०२ एकर ०४ गुंठे म्हणजेच बऱ्यापैकी मोठे आहे. त्यामुळे भविष्यकाळात पाणीपुरवठा तळयाचे विस्तारीकरणासाठी उपयुक्त आहे.

**(ई) जमीनखरेदीकामी येणारी त्रुटी :**

०१. अर्जदार श्री. जगताप व इतर ०३ यांनी अर्जासोबत जोडलेल्या मौजे कनकुरी येथील गट नंबर १३४ चे ७/१२ उताऱ्यात इतर हक्कात विहीर सामायिक अशी नोंद आहे. सदरहू सामायिक विहीरीत कोणत्या खातेदारांचे हिस्से आहेत, त्यांनी पाणी पुरवठयाठी सायफन केले आहे किंवा कसे याबाबत अर्जात उल्लेख नाही.

त्यामुळे सदरहू जमिनीची संस्थानच्या कंत्राटी मोजणीदाराकडून पहाणी करुन, जमिनीची कच्ची मोजणी करुन, विहीरीचे स्थान, त्यावरुन केलेले सायफन कोण-कोणत्या दिशेस गेलेले आहे, किती खातेदार आहेत याची

माहिती घेणेत येत आहे. तसेच सदरहू विहिरीत ज्या खातेदारांचे हक्क आहेत ते सदरचा हक्क सोडून देणार किंवा कसे याबाबत अर्जदार यांना पत्र देऊन माहिती घेणेत येत आहे.

०२. विषयांकित गट नंबर १३४ वर शिर्डी व कनकुरी येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटी व श्री साईनागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शिर्डी यांचा कर्जाचा बोजा आहे, असे दिसून येत आहे.

त्याकामी संबंधित सोसायटी व पतसंस्थेस पत्र देऊन कर्ज व इतर बाबतीत माहिती घेणेत येत आहे. तसेच उपरोक्त त्रुटींबाबत संस्थान वकिलांचा अभिप्राय घेऊन जमीन खरेदी करणेकामी कार्यवाही करणेत येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावाबाबत खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती :

०१. श्री. दिगंबर निवृत्ती जगताप व इतर ०३ यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १३४ क्षेत्र ०० हे ८४ आर (पोटखराब्यासह) खरेदी करणेत यावी किंवा कसे.

०२. जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, अर्जदार श्री. जगताप यांचेशी चर्चा करुन जमिनीचा प्रति आर खरेदी दर ठरविणे.

०३. जमीन खरेदीकामी विहीत पध्दतीने संस्थान वकिलांमार्फत जमिनीचा सर्च रिपोर्ट घेणे, जमीन खरेदी करणेकामी येणाऱ्या त्रुटींबाबत अर्जदार यांचेकडून माहिती घेणे, सदरहू त्रुटी दूर करणेबाबत संस्थान वकिलांचा अभिप्राय घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही तसेच याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणे.

**निर्णय क्र.८४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री दिगंबर निवृत्ती जगताप व इतर ०३ रा.शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर यांची मौजे कनकूरी येथील गट नंबर १३४ मधील क्षेत्र ८४ आर जमीनीची मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी पहाणी करुन आपला अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.४४** **प्रसादालयासाठी तुरदाळ खरेदी जादा खर्चास मंजूरी मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन मंडळ सभा दि.०३.०१.०९ मधील निर्णय क्रं.७१ नुसार सन २००९-१० करिता प्रसादालयासाठी दैनंदिन वापराकरिता आवश्यक १५०० क्विंटल तुरदाळ खरेदीस तत्वतः मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार विहित पद्धतीने वृत्तपत्रात जाहिर निविदा सुचना देऊन मुदतीअंती प्राप्त नमुने व निविदा मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१९.०३.२००९ रोजीचे सभेत सादर करणेत आले. स्विकाराह नमुन्यांच्या संबधीत निविदाधारकांना मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१३.०४.२००९ चे सभेत चर्चेसाठी आमंत्रित करणेत येऊन मे.जयंत ट्रेडिंग कंपनी, जळगांव यांना प्रति क्विंटल रु.५,२५०/- या न्युनतम दराने पुरवठा आदेश पाठविणेत आलेला होता.

त्यानुसार त्यांनी तुरदाळीचा पुरवठाही सुरु केला, तथापि तुरदाळीचे बाजारभावात अचानक खुपच दरवाढ झाल्याने मे.जयंत ट्रेडिंग कंपनी, जळगांव यांनी दरवाढ मिळणेकामी विनंती केली होती. त्यांचे विनंती पत्र १९.०७.२००९ चे मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर केले असता, त्यावर चर्चा होऊन दि.०९.०८.२००९ चे सभेत काही दुरुस्ती होऊन खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

उपरोक्त निविदा धारकांनी पुरवठाआदेशाचे शर्ती व अटीनुसार वर्षभर मालाचा पुरवठा करणे त्यांचेवर बंधनकारक आहे. उपरोक्त पुरवठादारांनी मालाचा पुरवठा न केल्यास व साईभक्तांना सेवा पुरविण्यास अडचणी निर्माण झाल्यास संबंधितांचे अनामत रक्कम जप्त करणेत यावी. तसेच बाजारभावप्रमाणे तात्पुरता माल खरेदी करण्यात यावा व उर्वरीत कालावधीसाठी आवश्यक माल खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

निर्णयाप्रमाणे तात्पुरती २०० क्विंटल तुरदाळ खरेदीकामी संस्थानला नेहमी माल पुरवठा करणाऱ्या पुरवठादारांना दुरध्वनीवरुन दरपत्रक व नमुने पाठविणेबाबत कळविले होते. त्यानुसार सहा पुरवठाधारकांनी दरपत्रके व नमुने पाठविले होते. सदर नमुने व दरपत्रके मा.कार्यकारी अधिकारी साो, मा.उप कार्यकारी अधिकारी साो. यांचे पुढे सादर करणेत येऊन सर्वानुमते मे.संदिप ट्रेडिंग कंपनी, नांदेड यांची अ.नं.१ या नमुन्याची प्रती क्विंटल रु.७,८९५/- दराची तुरदाळ मान्य करणेत येऊन, इकडील जा.क्रं.९२९४ दि.२७.०७.२००९ अन्वये त्यांना पुरवठा आदेश देणेत आला होता. त्यांनी तुरदाळीचा पुरवठा पुर्ण केला असून त्याकामी झालेल्या रु.१५,७९,०००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

उर्वरीत दि.०१.१०.२००९ ते दि.३१.०३.२०१० कालावधीसाठी आवश्यक १००० क्विंटल तुरदाळ खरेदीकामी वृत्तपत्रात जाहिर निविदा सुचना देऊन निविदा व नमुने मागविणेत आले. दि.०५.०९.२००९ चे मा.व्यवस्थापन मंडळाचे उपसमिती सभेपुढे नमुने व दरपत्रकांचा तुलनात्मक विचार होऊन मे.कैलास ट्रेडिंग कंपनी, नांदेड यांचा नमुना क्रं.१ या नमुन्याची ५०० क्विंटल तुरदाळ प्रती क्विंटल रु.७,३७५/- दराने आवश्यकतेनुसार पुरविणेबाबत इकडील जा.क्रं.११३३४/०८.०९.२००९ अन्वये मे.कैलास ट्रेडिंग कंपनी, नांदेड यांना पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. त्यानुसार माल पुरवठा सुरु झालाआहे. याकामी खर्च होणाऱ्या एकुण रक्कम रु.३६,८७,५००/- चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८४२** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तुरदाळ नमुना क्र.०१ या नमून्याची ५०० क्विंटल तूरदाळ प्रती क्विंटल रु.७,३७५/- दराने मे.कैलास ट्रेडिंग कंपनी, नांदेड यांचेकडून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रक्कम रुपये ३६,८७,५००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.४५** **प्रसादालयासाठी मठ,मुग व मुगदाळ विहित पद्धतीने वृत्तपत्रात जाहिर सुचना देऊन निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रसादालयासाठी सन २००९-१० करिता नित्याचे वापरसाठी आवश्यक मठ, मुग व मुगदाळ खरेदीकामी प्रथेप्रमाणे निविदा विक्री करणेत येऊन प्राप्त नमुने व निविदेतील दर व मा.व्यवस्थापन मंडळातील सभेत समक्ष चर्चेत दिलेली सुट यांचा विचार होऊन खालीलप्रमाणे कार्यादेश देणेत आले आहेत.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नांव | मालाचा तपशील | परिमाण क्विंटल | वार्षिक मंजुर दर प्रती क्विंटल | पुरवठा आदेश क्र./दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | मे.सिताराम ट्रेडींग कंपनी, जळगांव | मठ | ८०० | ३९५०/- | ४४५४/२०.०४.०९ |
| | | मुग | ८०० | ३९५०/- | |
| ०२. | मे.जयंत ट्रेडींग कंपनी, जळगांव | मुगदाळ | २६० | ४९५०/- | ४४०४/२०.०४.०९ |

पुरवठा आदेशाप्रमाणे त्यांनी अंशतः मालाचा पुरवठा केला आहे. माल मागणी चलनानुसार नोंदविलेली मागणी व पुरवठा केलेला माल यांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | मालाचा तपशिल | नोंदविलेली मागणी परिणाम क्विंटल | दि.०७.१०.२००९ अखेर झालेला पुरवठा परिणाम क्विंटल | येण बाकी माल परिमाण क्विंटल |
|---|---|---|---|---|
| ०१. | मठ | ३४० | २४० | १०० |
| ०२. | मुग | २७५ | १४५ | १३० |
| ०३. | मुगदाळ | १४५ | १२० | २५ |

सदर मालाचा पुरवठा नियमित करणेबाबत पुरवठाधारकांना अनेक वेळा दुरध्वनी केले असता उद्या माल पाठवितो असे उत्तर मिळत असे. याबाबत त्यांना इकडील जा.क्रं.११९१४/२३.०९.२००९ अन्वये रजिस्टर्ड पोच पोष्टाने मालाचा पुरवठा नियमीत करणेबाबत कळविले आहे, त्याचीही त्यांनी दखल घेतली नाही. यावरुन त्यांना माल पुरवठा करणेत स्वारस्य नाही असे दिसते. प्रसादालयाची कामाची गैरसोय होऊ नये म्हणुन पुरवठा आदेशातील तरतुदीनुसार आवश्यक इतका माल बाजारभावाने खरेदी करुन, जादा खर्चाची भरपाई त्यांचे जमा सुरक्षा अनामत रकमेतून केली आहे. त्यांची उर्वरीत जमा सुरक्षा अनामत रक्कमही दंड म्हणुन अलहिदा जप्त करणेत येईल.

प्रसादालयास दि.०१.११.२००९ ते ३१.०३.२०१० अखेर कालावाधीसाठी आवश्यक माल व बाजारभावाने येणाऱ्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | मालाचा तपशिल | परिणाम क्विंटल | बाजरभाव प्रती किलो रु.पै. | बाजारभावाने येणारी किमंत रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ०१. | मठ | ३०० | ६०/- | १८,००,०००.०० |
| ०२. | मुग | ३०० | ६५/- | १९,५०,०००.०० |
| ०३. | मुगदाळ | १०० | ७५/- | ७,५०,०००.०० |
| | | | **एकुण** | **४५,००,०००.००** |

तरी दि.०१.११.०९ ते दि.३१.०३.२०१० अखेर कालावधीसाठी प्रसादालयास आवश्यक उपरोक्त परिणामाप्रमाणे मठ, मुग, मुगदाळ विहित पद्धतीने वृत्तपत्रात जाहिर सुचना देऊन निविदा मागवून खरेदीस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४५,००,०००.०० चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८४३** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे दि.०१.११.०९ ते दि.३१.०३.२०१० अखेर कालावधीसाठी प्रसादालयाकरिता आवश्यक परिणामाप्रमाणे मठ, मुग, मुगदाळ विहित पद्धतीने वृत्तपत्रात जाहिर सुचना देऊन निविदा मागवून खरेदीस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४५,००,०००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.४६** **देणगी आलेले फोटो स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांचे सोईसाठी मा.व्यवस्थापन समितीने भव्य/दिव्य अशा श्री साई प्रसादालय इमारतीचे बांधकाम केलेले असून सदर इमारतीमध्ये दिनांक ०८/०१/२००९ पासून प्रसादालय सुरु झालेले आहे.

श्री साई प्रसादालयाचे भव्य अशा विस्तीर्ण इमारतीमधील भोजन हॉल, किचन्स , सन्मा.अतिथी भोजनकक्ष प्रतिक्षालय , तिकीट विक्री काऊंटर , कार्यालय यामध्ये श्री साईबाबांचे फोटो लावणे गरजेचे असल्याने त्याकामी मा.व्यवस्थापन समिती दि. १८/१०/२००८ चे सभेतील निर्णय क्रं.७९२ नूसार ०६ फोटो खरेदी करुन लावणेत आलेले होते. मात्र प्रसादालयाचे विस्तीर्ण इमारतीचे प्रमाणात सदर फोटो अतिशय कमी पडले. त्या दरम्यान श्री मदनलाल विष्णु मुरारका, मुंबई व राजन साखळे हे साईभक्त प्रसादालयामध्ये प्रसादभोजन घेणेसाठी आले असता त्यांनी प्रसादालयासाठी फोटो देणगी देण्याची इच्छा व्यक्त केली. सदर देणगी फोटोबाबत मा.सौ.उर्मिला जाधव, मा.व्यवस्थापन समिती सदस्या यांचे समक्ष तोंडी संमतीनूसार खालीलप्रमाणे फोटो देणगी घेणेत आलेले आहेत.

| अ.नं. | देणगीदाराचे नांव | वर्णन | साईज | संख्या | प्रत्येकी किंमत | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | श्री मदनलाल विष्णु मुरारका , मालाड(पू) मुंबई - ९७ | श्री साईबाबांचे वेगवेगळे फोटो | १६८X१४२ से.मी. | २० | ६०००/- | १,२०,०००/- |
| २) | ------"------ | श्री गणपती फोटो | ११५ X ९० से.मी. | ०१ | ३०००/- | ३,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३) | ------"------ | श्री हनुमानजीचा फोटो | ११५ x ९० से.मी. | ०१ | ३०००/- | ३,०००/- |
| ४) | श्री राजन साखळे | श्री साईबाबांचा बॉक्स फोटो | ३१ x २० से.मी. | ०१ | ११००/- | १,१००/- |
| ५) | श्री संतोष शिवाजी गुंजाळ, शिर्डी | श्री साईबाबा फोटो | १६८ x १३५ से.मी. | ०१ | ३७५०/- | ३,७५०/- |
| ६) | श्री अमृत गंगाधर जगताप, शिर्डी | श्री साईबाबा फोटो | १६८ x १४२ से.मी. | ०१ | ६०००/- | ६,०००/- |
| ७) | श्री आप्पासाहेब खंडू कोते, शिर्डी | श्री साईबाबा फोटो | १६८ x १३० से.मी. | ०१ | ७०००/- | ७,०००/- |
| ८) | व्दारकामाई स्टोअर, शिर्डी | श्री साईबाबा फोटो | ११५ x ९० से.मी. | ०१ | ३०००/- | ३०००/- |
| ९) | मे.वाबळे टायर्स, श्रीरामपूर | श्री साईबाबा फोटो | ११५ x ९० से.मी. | ०१ | ३०००/- | ३,०००/- |
| १०) | श्री दिलीप काशिनाथ गोडे, पुणे | श्री साईबाबा फोटो | १९९ x १३८ से.मी. | ०१ | ३५०००/- | ३५,०००/- |
| | | | | | **एकूण रु.=** | **१,८४,८५०/-** |

तरी वरीलप्रमाणे फोटो देणगी म्हणून स्विकारणेस व स्टॉक रजिस्टरला नोंद करणेबाबत मान्यतेकामी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४४** **प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फोटो देणगी म्हणून स्विकारणेस व स्टॉक रजिस्टरला नोंद करण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

---

**विषय नं.४७** **श्रीसाईप्रसादालयामधील स्वच्छता/हाऊस किंपींग कामी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे यांना आऊट सोर्सिंग पद्धतीने कामास मुदतवाढ देणे अथवा निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयामधील स्वच्छता / हाऊसकिपींगचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेसाठी सन २००९-१० मध्ये वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. मा. व्यवस्थापन समिती दि.०३/०१/२००९ चे सभेमधील निर्णय क्र.१० अन्वये उपरोक्तकामी निवीदा सादरकर्त्याकडून वापरणेत येणारी मशिनरी, मनुष्यबळाची संख्या, कामाचा दर्जा, काम करण्याची पध्दती व कामाचा अनुभव या सर्व बाबींचा विचार होऊन दि.०७/०१/२००९ ते ०६/०१/२०१० या कालावधीसाठी मे. बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांचे दरमहा रु.८,००,०००/- दर मान्य करुन काम देण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर कामाची मुदत दि.०६/०१/२०१० रोजी संपणार आहे.

बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांनी निवीदेमध्ये नमूद केल्याप्रमाणे मशिनरी व मनुष्यबळाचा वापर करुन दि.०७/०१/२००९ पासून श्री साई प्रसादालयामधील हाऊसकिपींग / स्वच्छतेचे काम समाधानकारक केलेले आहे. सौर उर्जा प्रकल्प उद्घाटनाचे वेळी व उत्सव काळात जादा कर्मचारी लावून चांगल्या प्रकारे स्वच्छता करण्यात आलेली होती. त्याकामी वेगळे चार्जेस मागितलेले नाहीत. तसेच निवीदेमध्ये नमूद केलेल्या पेक्षा जादा मशिनरी आणलेल्या आहेत.

बी.व्ही.जी. इंडिया लि.पुणे यांनी दि.०५/१०/२००९ चे पत्राद्वारे सध्याचेच दरात (रु.८,००,०००/- दरमहा) यापुढील २ वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

टेंडर कालावधीमध्ये बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांनी श्री साई प्रसादालयामधील स्वच्छता / हाऊसकिपींगचे काम चांगल्या प्रकारे केल्यामुळे साईभक्तांनी समाधान व्यक्त केलेले असून त्याबाबत अभिप्राय रजिस्टरमध्ये स्वच्छतेबाबत चांगला अभिप्राय नोंदविलेले आहेत. त्यामुळे यापुढील कालावधीसाठी स्वच्छता / हाऊसकिपींगचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणे संस्थानचे दृष्टीने हितावह आहे.

बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांचे दि.०५/१०/२००९ चे पत्रानुसार विषयांकित कामासाठी मुदतवाढ देणे अथवा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निवीदा मागविणे याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४५** **श्रीसाईप्रसादालयामधील स्वच्छता/हाऊस किंपींग कामी आऊट सोर्सिंग पद्धतीने काम करणेकामी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

---

**विषय नं.४८** **साईप्रसाद नं.०१ इमारतीचे गॅलरी व इतर स्वच्छतेबाबत.**

**प्रस्ताव-** चौकशी व निवास्थान विभागाकडील साईप्रसाद नं. ०१ या इमारतीतील ८५ रुम असून तेथील, संडास बाथरुम, भिंतीचे डाग, पंखे, व बाहेरील गॅलरी, रुम समोरील पॅसेज गॅलरी सर्व साफसफाईचे कामाकरीता दि.०२/०९/२००९ रोजी दुपारी १ ते २.३० च्या दरम्यान मा.श्री मोरे कार्यकारी अधिकारी, व श्री माने उपकार्यकारी अधिकारी व प्रशासकिय अधिकारी श्री बी.डी.साबळे व निवास्थान प्रमुख यांनी राउंड घेतला असता साफसफाईचे कामाबाबत सुचित केलेले होते.

त्याप्रमाणे इंटिग्रेटेड फॅसिलीटी सर्व्हिसेस, कॅम्प शिर्डी यांना जा.नं एसएसएस/वशी/ निवास/ ११५०२/ २००९ दि.१२.०९.२००९ अन्वये पत्र देऊन सदर कामाबाबत येणाऱ्या खर्चाची माहिती मागविणेत आलेली होती त्यानुसार त्यांनी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे असे सुचित केले आहे.

| अ.नं | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | मशिनरी पुणे येथून आणावी लागणार असून त्याचा | २५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | सर्व केमीकल्स सह खर्च | |
| ०२ | कन्झुमेबल्स मटेरियल्स यांचा खर्च | २५,०००/- |
| ०३ | कर्मचारी खर्च | २५,०००/- |
| ०४ | मॅनेजमेंट फी | १०,०००/- |
| | एकुण खर्च | ८५,०००/- |
| | सर्व्हिस टॅक्स १०.३०% | ८,७५५/- |
| | एकुण खर्च | ९३,७५५/- |

उपरोक्तप्रमाणे ९३,७५५/- रुपये खर्च अपेक्षित आहे असे पत्रात नमुद केलेले आहे. व सदर काम करते वेळी संस्थानने दिलेला रुम अगर जिन्यातील कलर हा अंधुक होईल अशावेळी कंपनीमार्फत भिंतीवरील कलरकाम करुन मिळणार नाही असे पत्रात स्पष्ट म्हटलेले आहे. सदरचा खर्च हा एकवेळचा क्लिनींग म्हणून केला जाईल, असे नमुद केलेले आहे.

**अ) कामासाठी लागणाऱ्या मशनरी**

०१.हायपेशर मशीन ०२. वॉटर पाईप ०३.अॅन्टीग्रील पाईप

०२.सिंगल डिस्क मशीन ०२. ड्रायव्हिंग डिश ०३.हार्डब्रश

०३.व्हॅक्युम क्लिनर ०२.ड्रायआणि वेट

०४. १६ फुटी लॅडर ०२.टेलीसकॉपीक रॉड ०३.क्राऊब्रश

**ब) केमिकल्स :-**

०१) R- १, ०२) R- २, ०३) R- ५, ०४) R- ६, ०५) D- २, ०६) स्पायरल इ.

**क) कन्झुमेबल मटेरियल्स-**

०१) ड्रायमोप, व्हाईट स्पंच, टॉयलेट ब्रश, चोकअप पंप, वेटमोप, नायलन स्क्रबर, पेन्ट ब्रश, चेकडस्टर, केबास डस्टर, सायनेटिक क्युंब येलोडस्टर, नॅपथोलिन बॉल, प्लोरास्टीक, डस्टपॅन, कारपेट ब्रश, गारबेज बॅग इ.

**ड)** या कामासाठी १२ कर्मचारी लागणार व हे काम २० दिवसात पूर्ण करुन देणार.

तरी खास बाब म्हणून उपरोक्त साफसफाई आय.एस.एस. सर्व्हिसेस, मुंबई, कॅम्प शिर्डी यांचेकडून काम करुन घेणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेच प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४६** **प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मे.इंटिग्रेटेड फॅसिलीटी सर्व्हिसेस, कॅम्प शिर्डी यांचेकडून प्रायोगिक तत्वावर खास बाब म्हणून साईप्रसाद नं.०१ इमारतीचे गॅलरी व इतरत्र स्वच्छता काम करुन घेणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रुपये ९३,७५५/- खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-अधिक्षक,चौकशी निवासस्थान)

---

**विषय नं.४९** **श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता जनरेटर व पॅनेल खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये असाध्य अशा ह्दयविकार, मेंदु विकार, मुत्रपिंड विकार अशा दुर्धर, आजारावरील अवघड व नाजूक प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. या शस्त्रक्रिया चालू असतांना श्री साईबाबा हॉस्पीटलला वीजपुरवठा सातत्याने विनाखंडीत चालू ठेवावा लागतो. अन्यथा वीजपुरवठा खंडीत झाल्यास रुग्णाचे जिवितास धोका उद्‌भवू शकतो. श्री साईबाबा हॉस्पीटलचा सुरुवातीस चालू होण्याच्या वेळेसचा स्टाफ क्वॅार्टरसहीत विद्युत भार साधारण ३०० के.डब्ल्यु. (३७५ KVA, ४६५ AMP) इतका होता. त्यामुळे पुर्वीचा लोड ग्रहीत धरुन याठिकाणी पर्यायी वीजपुरवठयाकामी ५०० केव्हीए (४०० के.डब्ल्यु) चा एक जनरेटरसेट व २५० केव्हीए (२०० K.W.) चा एक असे दोन जनरेटरसेट व सबस्टेशन मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.चे सप्लायसाठी एक ५०० केव्हीएचा ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आलेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सेंट्रलाईज ए.सी.प्लँट ११ नग आहे. तसेच स्प्लीट ए.सी, प्लोअर ए.सी.६९ नग आहे. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलमधील एम.आर.आय मशिन,सिटीस्कॅन मशिन, कार्डियाक मशिनरी इ.विविध मशिनरी हॉस्पीटलमधील इलेक्ट्रिक पॉवर लोड ६५० ॲम्पीअर पर्यंत गेला आहे.

जनरेटरसेटची कॅपॅसिटी ५०० केव्हीए इतकी आहे. तो जास्तीत-जास्त ५५० ॲम्पीअर पर्यंत लोड व्यवस्थीत घेऊ शकतो. उन्हाळयात वातावरणातील दुपारचे तापमान ४५ डिग्री सेंटीग्रेट पर्यंत जात असल्याने जनरेटरच्या कुलींग सिस्टिम वर याचा परिणाम होतो व जनरेटरचे वॉटर टेम्परेचर वाढते. त्यामुळे जनरेटर मशिनची कार्यक्षमता कमी होते. सध्या श्री साईबाबा हॉस्पीटलच्या एकुण लोडच्या ७०% पॉवर लोड ए.सी.यंत्रणेचा आहे व इतर ३०% लोड फॅन, टयुब चा आहे. जनरेटरवर प्रमाणापेक्षा जास्त लोड वाढत आहे.

जर साईनगर येथील ५०० केव्हीए क्षमतेचे जनरेटरसेट फेल झाले तर पर्यायी व्यवस्था म्हणून फक्त २५० केव्हीएचा जनरेटर आहे. परंतू २५० केव्हीए जनरेटर ५०० केव्हीए जनरेटर इतका लोड घेऊ शकणार नाही. अशावेळी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये बायपास, एन्जोप्लास्टी, एन्जोग्राफी यासारख्या शस्त्रक्रिया चालू असतात. अशा वेळी जनरेटर ओव्हर लोड होऊन बंद पडल्यास वीजपुरवठा बंद होईल अशा वेळेस पेशंटवर त्याचा वाईट परिणाम होऊ शकतो.

तरी या सर्व बाबींचा गांभिर्याने विचार करुन पर्यायी जनरेटरची व्यवस्था लवकरात लवकर करावी लागणार आहे. याकरीता १००० केव्हीए चा जनरेटर व ट्रान्सफॉर्मर बसविणे गरजेचे आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सातत्याने नवनविन मशिनरींची वाढ होत गेली. येथील मशिनरींचा तसेच ए.सी.प्लांटचा स्टाफ क्वॅार्टरसहीत उन्हाळयाचे दिवसात एकुण लोड साधारणतः ८०० के.डब्ल्यु. (९६५ KVA, ११५५ Amp) इतका असतो. लोडचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | लोड (K.W.) |
|---|---|---|
| १ | कार्डियाक | ०५० KW. |

| | | |
|---|---|---|
| २ | न्यूरो | ०३० KW. |
| ३ | सी.टी.स्कॅन | १३० KW |
| ४ | एम.आर.आय.मशिन | १५० KW |
| ५ | ऑपरेशन थिएटर (सर्व) | ०५० KW |
| ६ | सेन्ट्रल ए.सी. | १५० KW |
| ७ | न्यूरो ए.सी.प्लँट | ०८० KW |
| ८ | इतर ए.सी. | ०५० KW |
| ९ | ब्लड बँक | ०३० KW |
| १० | स्टाफ क्वार्टर | ०८० KW |
| | एकुण | ८०० KW |

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठयाचे बंद काळात स्टाफ क्वॉर्टर इमारतींचा वीजपुरवठा बंद करुन दोन्ही जनरेटर चालवावे लागतात. दोन्ही जनरेटर चालू असतांना एखादा जनरेटर जर बंद पडला तर हॉस्पीटलच्या काही भागात वीजपुरवठा बंद ठेवावा लागतो.

आता न्युरो विभागाचा ए.सी.प्लांट चालू झाला असून या प्लांटचा साधारण ८० के.डब्ल्यु. लोडमध्ये वाढलेला आहे. तसेच नव्याने उभारलेल्या STP PLANT चा १३ KW इतका जादा लोड वाढलेला आहे. हा प्लांट १८ तास चालू ठेवणेकरीता या प्लांटला जरेटरला सप्लाय जोडून देणेबाबत बांधकाम विभागाने कळविले आहे. सद्या बसविण्यात आलेले पॅनेल बोर्डवरील स्विचगिअर्स विशेषतः चेंजओव्हर स्विचेस हे जादा विद्युत भारामुळे गरम होत आहेत. त्यामुळे साईनगर सबस्टेशनमध्ये वाढीव लोडकरीता ५०० केव्हीए ट्रान्सफॉर्मर ऐवजी १००० केव्हीए ट्रान्सफॉर्मर बसवावा लागेल. नविन Electrical Control Panel + APFC Panel बसवावा लागणार असून १००० केव्हीए जनरेटर बसवून तेथील २५० केव्हीए जनरेटरसेट पाणीपुरवठा साठवण तळयावर बसविता येणार आहे.

पाणीपुरवठा तळयावर नविन ५० एच.पी.च्या दोन मोटार बसविल्याने तेथील इलेक्ट्रीकल लोडमध्ये १०० एच.पी.इतकी वाढ झालेली आहे. याठिकाणी सद्या १०० केव्हीएचा एकच जनरेटर सेट असून दुसरा ४५ केव्हीए जनरेटरसेट असून तो ३० वर्षापूर्वीचा असून फारच जुना झाल्यामुळे त्याचे स्पेअर्स उपलब्ध होत नसल्याने तो दुरुस्त होऊ शकत नाही. १०० केव्हीए जनरेटर पूर्ण लोड घेत नाही. याकरीता साठवण तलावावर २५० केव्हीए जनरेटर सेट बसविणे गरजेचे आहे.

त्यामुळे आता श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता खालील तपशिलानुसार जनरेटरसेट, ट्रान्सफॉर्मर, पॅनेल बोर्ड खरेदी करुन बसविणे, जनरेटर शिफ्ट करणे ही कामे निविदा मागवून करावी लागणार आहे. खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| SR.NO. | DSR Item No. | Description | Qty. | Unit Rate | | Amount | | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Material | Labour | Material | Labour | |
| 01) | 7-3-11 | 3 x 185sq.mm. XLPE Armoured cable | 100 mtr. | 1266.00 | 28.00 | 126600.00 | 2800.00 | 01,29,400.00 |
| 02) | 7-5-4 | Indoor termination kit | 6 | 8113.00 | 490.00 | 48678.00 | 2940.00 | 00,51,618.00 |
| 03) | 7-5-13 | Outdoor termination kit | 2 | 11722.00 | 525.00 | 23444.00 | 1050.00 | 00,24,494.00 |
| 04) | 6-4-1 | HT metering cubical | 1 | - | 4931.00 | - | 4931.00 | 00,04,931.00 |
| 05) | NON-DSR | HT PANEL | 1 | - | 2000.00 | - | 2000.00 | 00,02,000.00 |
| 06) | NON-DSR | 1000KVATRANSFORMER | 1 | 1702795.00 | 10000.00 | 1702795.00 | 10000.00 | 17,12,795.00 |
| 07) | 9-2-2 | Copper Strip | 1000Kg. | 487.00 | 14.00 | 487000.00 | 14000.00 | 05,01,000.00 |
| 08) | 9-1-2 | COPPER EARTH PLATE | 24 | 2250.00 | 250.00 | 54000.00 | 6000.00 | 00,60,000.00 |
| 09) | 10-2-22 | Instruction Chart | 2 | 50.00 | 7.00 | 100.00 | 14.00 | 00,00,114.00 |
| 10) | 10-2-23 | Rubber hand gloves | 1 | 336.00 | 0.00 | 336.00 | 0.00 | 00,00,336.00 |
| 11) | 10-2-24 | FIRE Bucket | 8 | 355.00 | 0.00 | 2840.00 | 0.00 | 00,02,840.00 |
| 12) | 10-2-25 | Stand for FIRE buckets | 2 | 1773.00 | 50.00 | 3546.00 | 100.00 | 00,03,646.00 |
| 13) | 10-2-29 | Rubber Matting | 30 Mtr. | 1828.00 | 0.00 | 54840.00 | 0.00 | 00,54,840.00 |
| 14) | NON-DSR | 1010 KVA Diesel Generating Set, | 1 | 8400000.00 | 25000.00 | 8400000.00 | 25000.00 | 84,25,000.00 |
| 15) | NON-DSR | AMF Panel | 1 | 345000.00 | 3000.00 | 345000.00 | 3000.00 | 03,48,000.00 |
| 16) | | MAIN PCC PANEL | 1 | 1825770.00 | 32080.00 | 1825770.00 | 32080.00 | 18,57,850.00 |
| 17) | NON-DSR | APFC PANEL- 400 KVAR A | 1 | 300000.00 | 2000.00 | 300000.00 | 2000.00 | 03,02,000.00 |
| 18) | 7-1-30 | PVC armoured XLPE cable 3-1/2 core 240 Sq.mm. | 500 Mtr. | 1011.00 | 55.00 | 505500.00 | 27500.00 | 05,33,000.00 |
| 19) | 7-7-11 | Cable gland | 36 | 249.00 | 36.00 | 8964.00 | 1296.00 | 00,10,260.00 |
| 20) | 7-10-10 | Aluminium lugs | 150 | 52.00 | 9.00 | 7800.00 | 1350.00 | 00,09,150.00 |
| 21) | | Dismentling the existing 250 KVA Diesel Generator set with AMF Panel | 1 Set. | 75000.00 | 25000.00 | 75000.00 | 25000.00 | 01,00,000.00 |
| 22) | | Dismentling the existing | 1 No. | - | 15000.00 | - | 15000.00 | 00,15,000.00 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | main distribution control panel | | | | | | |
| 23) | | Civil Work : | | 150000.00 | 25000.00 | 150000.00 | 25000.00 | 01,75,000.00 |
| | | | | | | | Total :- | 1,43,23,274.00 |
| 24) | | Less Cost of 500 KVA Transformer | 01 No. | 50000.00 | 0.00 | 50000.00 | 0.00 | 0,00,50,000.00 |
| | | | | | | | **Total :-** | **1,42,73,274.00** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता जनरेटर, ट्रान्सफॉर्मर व पॅनेल खरेदी करुन बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,४२,७३,२७४.०० मात्र खर्च अपक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा बोलाविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८४७ श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता जनरेटर व पॅनेल खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणारे अदाजे रक्कम रुपये १,४२,७३,२७४.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत् विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५० नगर-मनमाड रोडवरील स्ट्रीट लाईटकरीता स्वतंत्र जनरेटर खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे भारनियमन चालू असल्याने रात्रौ भारनियमनाच्या कालावधीत नगर-मनमाड रोडवरील स्ट्रीट लाईट बंद राहून भक्तांची गैरसोय होते.

मा.अध्यक्ष महोदय यांनी दिनांक २१-१०-२००९ रोजी या स्ट्रीट लाईटकरीता स्वतंत्र जनरेटरसेट खरेदी करावा म्हणून आदेश दिले आहेत. याकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 11-1-10 | 62.5 KVA Genset | 01 Nos. | 7,07,970.00 | 07,07,970.00 |
| 02) | 7-1-16 | Cable 4x16 | 225 Mtr. | 0,00,164.00 | 00,36,900.00 |
| 03) | 7-1-15 | Cable 4 x 10 | 2950 Mtr. | 0,00,135.00 | 03,98,250.00 |
| 04) | 7-8-3 | Pole Box | 33 Nos. | 0,00,607.00 | 00,20,031.00 |
| 05) | 5-3-3 | SPMCB | 99 Nos. | 0,00,155.00 | 00,15,345.00 |
| 06) | 7-7-2 | Cable Gland for 4 x 10 Cable | 66 Nos. | 0,00,031.00 | 00,02,046.00 |
| 07) | 7-7-3 | Cable Gland for 4 x 16 Cable | 05 Nos. | 0,00,061.00 | 00,00,305.00 |
| 08) | 9-1-2 | Copper Earthing | 06 Nos. | 0,02,500.00 | 00,15,000.00 |
| 09) | | G.I. Wire | 100 Kg. | 0,00,076.00 | 00,07,600.00 |
| 10) | 5-1-33 | Automatic Transformer Switch | 05 Nos. | 0,34,507.00 | 01,72,535.00 |
| 11) | 17-1-2 | Cable trench | 2300 Mtr. | 0,00,070.00 | 01,61,000.00 |
| | | | | Total. | 15,36,982.00 |

उपरोक्तप्रमाणे नगर-मनमाड रोडवरील स्ट्रीट लाईटकरीता स्वतंत्र जनरेटर खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये १५,३६,९८२.०० मात्र खर्च अपक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा बोलाविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८४८ सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा. नगर-मनमाड रोडवरील स्ट्रीट लाईटकरीता स्वतंत्र जनरेटर खरेदी करणेऐवजी सिंगल फेज विद्युत पुरवठ्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास विनंती करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीस लेखी कळविण्यात यावे,असें ठरलें.** (कार्यवाही-विद्युत् विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५१ साईनाथ सगुणोपासना कन्नड आरती संस्थानमार्फत प्रकाशित करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री अनंता रामु,बंगलोर यांनी दि.२१.०८.२००९ चे पत्राने श्री सगुणोपासना आरती कन्नड भाषेत भाषांतर केलेली संस्थान मार्फत प्रकाशित करण्याची इच्छा प्रकट केली असून, सोबत मॅन्युस्क्रीप्टची झेरॉक्स प्रत पाठविलेली आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

संस्थानने प्रकाशित होणा-या प्रकाशनाची वाढती संख्या विचारात घेऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेत "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत" असा निर्णय क्र.४१५ झालेला आहे.

संस्थान मार्फत श्री साई चरित्र व स्तवन मंजरी, कन्नड भाषेत प्रकाशित करण्यात आलेली आहे. परंतु श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा कन्नड भाषेत अनुवाद उपलब्ध नसल्याने सदरचे कन्नड भाषेत आरती असणे आवश्यक आहे.

श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा कन्नड भाषेत अनुवाद कन्नड भाषेतील तज्ज्ञाकडून सदरील मॅन्युस्क्रीप्ट तपासून घेऊन संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत विचार करता येईल.

तरी श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा कन्नड भाषेत अनुवाद कन्नड भाषिक भक्तांना उपलब्ध करुन देणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.८४९ सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा, असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

---

**विषय नं.५२ गुरुकुलम मासिकात संस्थान प्रकाशित श्रीसाईसच्चरित्रातील माहिती छपाई करण्यासाठी परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सारिका बक्षी यांनी दि.२९.०९.२००९ चे इमेल पत्रान्वये गुरुकुलम नावाचे मासिक प्रकाशित करणार असल्याने त्या मासिकात त्यांना संस्थान प्रकाशित श्री साईचरित्रातील भागांची छपाई करावयाची आहे. संस्थानकडून छपाईचे हक्क व परवानगी मिळणेची मागणी केली आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

संस्थान प्रकाशनांचे हक्क संस्थानकडे असल्याने इतरांना संस्थान प्रकाशनांतील माहिती छपाई करणेस संस्थानने यापूर्वी छपाई हक्क व परवानगी देण्यात आलेली नाही.

सबब गुरुकुलम नावाचे मासिकात संस्थान प्रकाशित साईचरित्रातील भागांची छपाई करण्यास परवानगी दिल्यास श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार परदेशात होईल.

निर्णय क्र.८५० **सदरहू विषय अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

---

विषय नं.५३ **श्रीसाईलिला द्वैमासिक मराठी व हिन्दी-इंग्रजी अंकाचे जाहिरात करणेकामी निवेदन पत्रिका छपाई करणेबाबत.**

प्रस्ताव- मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडील जा.नं.एसएसटीएस/वशी-काअ/१५९८/२००९ दि.१६.०५.२००९ ने मुंबई साईलीला संपादकीय विभागाकडून जावक नं.एसएसएस-वशी-मुं.१८८१-२००९ दि.०४.०६.२००९ व जा.क्र. २२३६/ ०६ दि.२५.०६.२००९ श्री साईलीला मराठी ७५ प्रती व हिंदी - इंग्रजी ७५ प्रती अशा एकूण १५० प्रती काऊंटरवर विक्रीस उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

श्री साईलीला द्वैमासिक मराठी व हिंदी-इंग्रजी अंक दि.०३.०७.२००९ ते दि.२३.०७.२००९ या २० दिवसाच्या कालावधीत १५० अंकाची विक्री झाली आहे. म्हणजे महिन्याला १५० अंक विक्री करणेसाठी आवश्यकता असणार असल्याने प्रती महा साईलीला मराठीचे १५० अंक व हिंदी -इंग्रजी चे १५० अंक याप्रमाणे ३०० अंक प्रिंटर्स् कडून छपाई करुन विक्रीचे प्रयोजन आहे. संस्थान प्रकाशित श्री साई दैनंदिनी मध्ये दरवर्षी श्री साईलीला द्वैमासिक मराठी व हिंदी-इंग्रजी अंकांचे सभासद संख्येत वाढ होणेसाठी निवेदन छपाई करण्यात येत असते. तसेच संस्थानव्दारा मनिऑर्डरने देणगी देणारे साईभक्तांना पोस्टाने उदी प्रसाद पाठविण्यात येतो त्यासोबत प्रत्येक पाकिटामध्ये सोबतचे निवेदन छपाई करावयाचे प्रयोजन आहे.

तरी त्याकामी ६.२५" x ८.७५" अथवा ७.२५" x ९.७५" यासाईज निवेदन पत्रिका २,००,००० नग अंदाजे छपाई दर रु. ०.५० पैसे याप्रमाणे १,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.सदरचे निवेदन पत्रिकांचे छपाईचे काम मुंबई येथील अधिकृत निवडक प्रेसधारकांकडून दरपत्रक मागवून छपाई करुन घेणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.८५१ **प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्रीसाईलिला द्वैमासिक मराठी व हिन्दी-इंग्रजी अंकाचे जाहिरात करणेकामी निवेदन पत्रिका छपाईचे काम मुंबई येथील अधिकृत निवडक प्रेसधारकांकडून दरपत्रक मागवून छपाई करुन घेणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी श्रीसाईलिला द्वै-मासिकामध्ये प्रसिद्ध करावयाचे लेखाबाबत संस्थानकडे असलेल्या यादीतील लेखकांना पत्र पाठवून लेख मागविण्यात यावेत.**

(कार्यवाही-संपादक,मुंबई कार्यालय/अधिक्षक,प्रकाशने)

---

विषय नं.५४ **श्रीसाईबाबा ॲनिमेशन फिल्मबाबत.**

प्रस्ताव- श्री बालकृष्णन एम.आर, मॅनेजिंग डायरेक्टर मेडिया टेक आय सोल्युशन प्रा.लि., बंगलोर यांनी श्री साईबाबावर ॲनिमेशन फिल्म तयार केलेली असून पुण्यतिथी उत्सवात दि.२८.०९.२००९ रोजी मा.अध्यक्षांचे हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आलेले आहे. सदर फिल्म ६५ मिनिटांची असून इतर भाषेत मराठी, इंग्रजी, तेलगू, कन्नड आणि तामिळ भाषेमध्ये फिल्म लवकरच पूर्ण होईल. मेडिया टेक यांनी भारतीय पौराणिक कथा व महानसंताच्या १८ ॲनिमेशन फिल्म तयार केलेल्या आहेत.

मेडिया टेक बंगलोर यांनी संस्थानला रु.२३.५० लाख रकमेचा बदल्यात संस्थानला कायमचे पूर्ण मार्केटिंगचे हक्क देण्यास तयार आहे. श्री टी.व्ही.रमणी यांनी संस्थानची ओळख करुन दिल्याचे म्हटले आहे.

संस्थानला फिल्मबाबत स्वारस्य असल्यास ते चर्चा करण्यास तयार असलेबाबत कळविले आहे. सध्या संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित मराठी पोथीची तसेच श्री साईसत्चरित्र सार हिन्दी दोहावली नादमयी न्यास, पुणे यांचेद्वारा संगीतबद्ध केलेली स्वर माधुरी ज्योत्स्ना गणपुले यांच्या सुमधूर व भावपूर्ण आवाजात ऑडीओ सी.डीची निर्मिती करुन साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडीओ सी.डी.,व्हीसीडी व डीव्हीडी, गुरुपाठ अभंग, शिर्डी साईबाबा की, व्हीसीडी इ. साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यापूर्वी अशा प्रकारे कोणीही रकमेची मागणी केलेली नाही.

संस्थानने प्रकाशित होणा-या प्रकाशनाची वाढती संख्या विचारात घेऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेत "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत" असा निर्णय क्र.४१५ झालेला आहे.

निर्णय क्र.८५२ **सदरहू विषय अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने)

---

विषय नं.५५ **स्कुल बसेस खरेदी बाबत**

प्रस्ताव- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल यांचेकडील मा.कार्यकारी अधिकारी कार्यालय, आवक क्रं.५६८२ दि.२२/०९/२००९ चे टिपणीनुसार, विद्यार्थी नें-आण करणे कामी प्राचार्या, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल

यांनी चार नवीन स्कुल बसेस खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेकरीता येत्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केलेला आहे. सदर सभेत नवीन चार स्कुल बसेस खरेदीस मान्यता मिळाल्यास एक बस चालु करणे करीता संस्थानचा भांडवल गुंतवणुकीसह वार्षिक अंदाजे संभाव्य येणाऱ्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

**५२ सिट असलेली एक बसची अंदाजे खरेदी किंमतः- रू.१६,००,०००/-**

**अ)** निश्चित खर्च (०१ वर्षासाठी):-

| अ.नं. | तपशिल | रक्कम (रू.) |
|---|---|---|
| ०१ | भांडवलावरील व्याज ८% प्रमाणेः- | १,२८,०००.०० |
| ०२ | घसारा २०% प्रमाणेः- | ३,२०,०००.०० |
| ०३ | टॅक्स (रू.५००/- प्रति शिट):- | २६,०००.०० |
| ०४ | विमा खर्चः- | ४२,०००.०० |
| | **एकुण रक्कम (रू.)** | **५,१६,०००.००** |

**ब)** उपयोगिता खर्च (०१ वर्षासाठी):-

| अ.नं | तपशिल | रक्कम (रू.) |
|---|---|---|
| ०१ | इंधन वंगण खर्च अंदाजे दररोज ३० कि.मी. प्रवास डिझेल दर रू.३६/-, प्रति लिटर ३.५० कि.मी. ॲव्हरेज व २४० शाळेचे दिवस | ७४,०५७.०० |
| ०२ | अंदाजे दुरूस्ती व देखभाल खर्चः- | ५,०००.०० |
| ०३ | कायम चालक पगार प्रति महा रू.७,०००/- प्रमाणे १२ महिण्याकरिता | ८४,०००.०० |
| ०४ | कायम मदतनीस पगार प्रति महा रू.७,०००/- प्रमाणे १२ महिण्याकरिता | ८४,०००.०० |
| | **एकुण रक्कम (रू.)** | **२,४७,०५७.००** |

**अ व ब मिळून वार्षिक खर्चः- रू.७,६३,०५७/-**

नवीन एक बस खरेदी केल्यास वार्षिक अंदाजे रू.७,६३,०५७/- मात्र संस्थानचा संभाव्य खर्च येणार आहे.

तरी श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे मागणीनुसार, नवीन चार स्कुल बसेस खरेदी करणे कामी टाटा कंपनीच्या अधिकृत डिलरकडून कोटेशन बोलाविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रू.६४,००,०००/- मात्रचे खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे पुढील निर्णया करीता सविनय सादर.

**निर्णय क्र.८५३ सदरहू विषय अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५६ वाहनांकरीता नवीन टायर्स खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील वाहनांचे सध्याचे टायर खराब झालेने त्यांना नवीन टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | वाहन क्रं. | वाहन प्रकार / वापर | सध्याचे टायर एकूण वापर कि.मी. | आवश्यक टायर साईज | कंपनी | टायर नग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एमएच-१७/ व्ही-९९८८ | टोयोटा इनोव्हा/ कार्यालयीन | ४२,०१२ | २०५-६५R-१५ रेडियल | ब्रिजस्टोन | ०५ |
| २. | एमएच-१७/ व्ही-१६४१ | महिंद्रा बोलेरो/ कार्यालयीन | ६०,९०९ | २१५-७५R-१५ रेडियल | ब्रिजस्टोन | ०५ |
| ३. | एमएच-१७/ टी-७१०९ | टाटा बस / नगरसुल बस | ५५,६०८ | १०-००-२० | अपोलो | ०२ |
| ४. | एमएच-१७/ टी-८५०४ | टाटा बस / न.भ.नि. बस | ४३,७०४ | १०-००-२० | अपोलो | ०२ |
| ५. | एमएच-१७/ टी-८५०३ | टाटा बस / स्कुल बस | २५,०३७ | ०९-००-२० | अपोलो | ०२ |
| ६. | एमएच-१७/ के-९५०१ | कार्डीयाक / रूग्णवाहिका | ४५,१६२ | २१५-R-१४ | जे.के. | ०४ |
| | | | | | **एकुण** | **२०** |

वरील प्रमाणे सहा वाहनांकरीता २० टायर्स, टयुब, फ्लॅपसह खरेदी कामी रू.१,७०,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

टोयोटा ईनोव्हा व महिंद्रा बोलेरो करीता ब्रिजस्टोन कंपनीचे तसेच नगरसुल बस, न.भ.नि. बस, स्कुल बस तसेच कार्डीयाक रूग्णवाहिके करीता अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून कोटेशन बोलावुन टायर्स खरेदी करण्यात येतील.

तरी वरील प्रमाणे २० टायर्स, टयुब, फ्लॅपसह खरेदीस व या कामी येणारे अंदाजे रू.१,७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यतेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे पुढील निर्णयाकरीता सविनय सादर.

**निर्णय क्र.८५४ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे वाहन विभागातील वापरात असलेल्या ०६वाहनांसाठी २० टायर्स, टयुब, फ्लॅपसह कोटेशन मागवून खरेदी करणेस व या कामी येणारे अंदाजे रू.१,७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५७ सन १९८७ ते १९८९ या कालावधीतील प्रलंबित पोलिस बंदोबस्त शासकीय शुल्काबाबत**

**प्रस्ताव-** सन १९८७ ते १९८९ या काळात उत्सावासाठी बाहेरुन आलेल्या पोलिस बंदोबस्त चार्जेस रक्कम ९३,०६५/- (अ.रु.त्रेऐन्नौ हजार पासष्ठ मात्र) भरणेकामी पोलिस विभागाकडुन संस्थानला वेळोवेळी पत्र देण्यात आलेले आहे.उपरोक्त पत्रास संरक्षण विभाग टपाल /१८९/२००६ दि.११.०६.२००६ अन्वये कोणत्या कारणास्तव बंदोबस्त देण्यात आलेला आहे या बाबत विचारणा करण्यात आलेली होती.परंतु सदर बाबतचे त्या वेळचे रेकॉर्ड पोलिस स्टेशन दुसऱ्या जागेत स्थलांतर झालेमुळे मिळुन येत नाही असे कळविण्यात आले होते.

सदर पत्रानुसार दप्तर विभाग यांना सन १९८७ नंतरचा पत्रव्यवहाराच्या उत्सवाचे फायलिंगची चौकशी केली असता त्यांनी सन १९८९ पुर्वीचे ड प्रकारचे सर्व रेकॉर्ड नस्तीबद्ध केल्याचे सांगितले. तथापी सदर बाबतीत यापुर्वीचे पत्रव्यवहारा बाबत चौकशी केली असता पोलिस स्टेशन शिरडी यांना पुर्वी पासुनच बाहेरुन बंदोबस्तासाठी आलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांची निवास व भोजन व्यवस्था संस्थान मार्फत मोफत केली जाते.त्यामुळे बंदोबस्त चार्जेस देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे नम्र मत आहे. तसेच देवस्थानचे व साईभक्तांचे संरक्षण करणे व त्यासाठी बंदोबस्त ठेवणे हे पोलिसांचे आद्य कर्तव्य आहे.तसेच पोलिस कर्मचाऱ्यांसाठी निवासास्थान व पोलिस स्टेशनचे बांधकाम संस्थान मार्फत करुन दिलेले आहे. त्याच प्रमाणे शिरडी व्यतिरिक्त इतरत्र पोलिस बंदोबस्त असल्यास बाहेरुन बंदोबस्तासाठी आलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांची निवास व भोजन व्यवस्था संस्थान मार्फत मोफत केली जाते.तसेच त्यांच्या अधिकाऱ्यांची निवास व्यवस्था संस्थान मार्फत संस्थानचे क्वार्टरमध्ये करण्यात येते. तसेच फक्त सन १९८७ ते १९८९ या सालाचेच बंदोबस्त चार्जेसची मागणी केलेली आहे. तत्पुर्वी अथवा तदनंतरची करण्यात आलेली नाही.

तथापी पोलिस स्टेशन शिरडी यांचे मागणी नुसार सन १९८७ ते १९८९ चे बंदोबस्ताचे चार्जेस रुपये ९३,०६५/- अदा करणेस मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव प्रशासन शाखा वशी ०५ मार्फत तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ०६.०१.२००७ चे मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत सादर केलेला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन या बाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.श्री.आर.आर.पाटील उप-मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांचेशी सन १९८७ ते १९८९ चे बंदोबस्ताचे चार्जेस आकारु नये या बाबत समक्ष चर्चा करावी असे ठरले होते.परंतु सदरील विषयासंबधी मा.अध्यक्ष साहेब यांची समक्ष चर्चा झाली किंवा नाही या बाबत काहीही खुलासा झालेला नाही.

शासनामार्फत बंदोबस्त शुल्क भरणे बाबतचा पत्रव्यवहार इकडील कार्यालयास वारंवार होत असुन तगादा सुरुच आहे. तसेच शिरडी पोलिस कार्यालय जा.क्र.६२८/०५ दि.२०.०३.२००५ चे पत्राने इकडील कार्यालयास कळविले नुसार शासनाचे वरीष्ठ अधिकारी यांनी बंदोबस्ताची फी संस्थानला माफ होणे बाबतचा प्रस्ताव अमान्य केलेला आहे. बंदोबस्त शुल्क हे शासकिय स्वरुपाचे असल्याने ते भरणे अत्यावश्यक आहे.

तरी सदरील प्रलंबित असलेले बंदोबस्ताचे शासकिय शुल्क शासनास आदा होणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.८५५ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सन १९८७ ते १९८९ या कालावधीतील प्रलंबित पोलिस बंदोबस्त शासकीय शुल्क रुपये ९३,०६५/- एक विशेष बाब म्हणून आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही-संरक्षण विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५८ नवीन ठिकाणी स्कूलबस देणे व बसमधील अतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी स्कुल बस खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** **अ)** श्री पोपट भागवत वाणी सरपंच, नांदुर्खी खु ा यांनी त्यांचे दि.१८.०८.२००९ वे सदर्भीय पत्रात नांदुर्खी खु ा येथून सुमारे १२ विद्यार्थी विविध वर्गामधून आपल्या इंग्लिश माध्यम विद्यालयात शिक्षण घेत आहे. परंतु त्यांच्या दळणवळणाची व्यवस्था नांदूर्खी बु ा येथील स्टॉपवरुन आहे. कृपया ती व्यवस्था नांदुर्खी खु ा येथून होणेस विनंती आहे. हे अंतर सुमारे १ कि मी आहे. तरी छोटया विद्यार्थ्यांना गैरसोयीचे असल्याने कृपया वरील सेवा उपलब्ध करुन दयावी अशी त्यांनी सदर पत्रात विंनती केलेली आहे.

आपल्या श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे विद्यार्थी शाळेत घेऊन जाणे / येणे कामी स्कुलबसची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर सुविधा देताना विद्यार्थी संख्या शाळेपासुन स्टॉपचे / गावाचे अंतर आदी बाबी लक्षात घेऊन व नंतर त्याप्रमाणे स्कुलबस शुल्क ठरविण्यात आलेले आहे. सर्व बस स्टॉप मार्गावर सर्व्हेकरुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सोयीस्कर होईल असे मध्यवर्ती ठिकाणी बस स्टॉप दिलेला आहे. खाली नमूद केलेप्रमाणे विद्यार्थ्यांना नांदुर्खी बु ा हा बसस्टॉप दिलेला आहे. या स्टॉपच्या पुढे नांदूर्खी खु ा येथे बस नेण्याची विनंती मान्य करावयाची झाल्यास -

१) ९ विद्यार्थ्यासाठी स्कुलबस नांदुर्खी खु ा येथे पाठवावी लागेल.

२) नांदुर्खी बु ।। ते नांदुर्खी खु ।। गावाचे अंतर १ कि.मी. आहे यामध्ये ०३ विद्यार्थी के.जी. वर्गातील असून या विद्यार्थीची शाळा दुपारी १.३० वाजता सुटते त्या विद्यार्थ्यासाठी स्कुलबस दुपारी जाऊन - येऊन २ कि.मी. अंतर वाढेल.

३) ४.०० वाजता शाळा सुटल्यावर उर्वरित ०६ विद्यार्थीसाठी २ कि.मी. अंतर वाढते. त्याचप्रमाणे सकाळी हया विद्यार्थाना नांदुर्खी खु ।। येथे स्कुलबस पाठविण्यासाठी १५ ते २० मिनीटे स्कुलबस लवकर पाठवावी लागेल.

४) सध्या या मार्गावरील स्कूलबस सकाळी ८.३० वाजता जाते.वरील स्टॉप केल्यास किमान ८.१५ वाजता बस काढावी लागेल.

५) प्रत्येक मार्गावर पालकांची जादा बस स्टॉप संदर्भातील मागणी वाढेल. या सर्व बाबींचाही विचार करावा लागेल.

**ब)** श्री राजेंद्र भाऊसाहेब जपे, डो-हाळे यांनी त्यांचे दि.०७.०९.२००९ चे संदर्भीय पत्रात डो-हाळे गावातून ७ ते ८ मुले इंग्लिश मिडीयमला शिक्षण घेत आहे. बस ही कनकुरी गावापर्यंतच येते. त्यामुळे विद्यार्थी व पालकांचे हाल होत आहे. बस डो-हाळे गावापर्यंत सुरु व्हावी अशी विनंती केलेली आहे.

वरील दोन्ही संदर्भीय पत्रानुसार सर्व स्कूलबस व मार्गासंबंधीची माहिती खालील प्रमाणे आहे.

**<u>शैक्षणिक वर्ष २००९-१० स्कूलबस तक्ता</u>**

| अ. नं. | स्कूलबस मार्ग | इं.मि.स्कूल विद्यार्थी संख्या | कन्या विद्या मंदीर विद्यार्थी संख्या | एकुण विद्यार्थी संख्या | बस क्रमांक | पासिंग प्रमाणे | अतिरिक्त | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रुई-सावळीविहिर | ६६ | १ | ६७ | एमएच १७ सी ८८५१ | ५७ | १० | |
| २ | काळेवस्ती-पोलिसस्टेशन | ६८ | --- | ६८ | एमएच १७ टी३१०१ | ५२ | १६ | |
| ३. | शिरडी-राहाता | ८८ | ---- | <u>८८</u> | एमएच१७ टी८५०२ | <u>५२</u> | <u>३६</u> | |
| ४. | पुष्पांजली -गायकेवस्ती | ८२ | ---- | <u>८२</u> | एमएच१७ टी३१०४ | <u>५२</u> | <u>३०</u> | |
| ५. | शिरडी चारी-पिंपळवाडी | ६२ | ३ | ६५ | एमएच १७ टी ३१०३ | ५२ | १३ | |
| ६. | पिंपळवाडीरोड-बन | ७३ | ---- | ७३ | एमएच१७ के९३७० | ५४ | १९ | |
| ७. | पाण्याची टाकी श्रीरामनगर पहिली ट्रीप | ७० | ---- | ७० | एमएच१७ टी८५०३ | ५२ | १८ | |
| | साईनगर-कनकुरी दुसरी ट्रीप | ९१ | ---- | <u>९१</u> | --,,-- | --,,-- | <u>३९</u> | |
| ८. | कोटस्थान-दारुवाल पहिली ट्रीप | ६२ | ४ | ६६ | एमएच१७ टी३१०२ | ५२ | १४ | |
| | हॉलीडेपार्क-लक्ष्मीनगर दुसरी ट्रीप | ५८ | १ | ५९ | --,,-- | --,,-- | ७ | |
| ९. | शिरडी-नांदुर्खी पहिली ट्रीप | ५३ | --- | ५३ | एमएच१७ टी८५०१ | ५२ | १ | |
| | शिरडी-नांदुर्खी दुसरी ट्रीप | ७७ | ५ | <u>८२</u> | --,,-- | --,,-- | <u>३०</u> | |
| | एकुण | ८५० | १४ | ८६४ | | ६३१ | २३३ | |

संदर्भीय तक्त्यात परिसरप्रमाणे नमूद केलेले विद्यार्थी संख्या ६३१ इतकी असावी. तथापी शाळेकडे ९ स्कूलबस असून त्यामध्ये सहा स्कूलबस सिंगल ट्रीप तर ०३ स्कूलबस दोन ट्रीप करतात. तरीही एकूण ०९ स्कूलबसमधून २३३ विद्यार्थी बस क्षमतेपेक्षा अतिरिक्त आणावी लागतात.

उपरोक्त मागणी, उपलब्ध बस व क्षमतेपेक्षा अतिरिक्त असल्याने विद्यार्थ्याचे बाबतीत खालील बाबींवर विचार करता येईल.

०१) नांदुर्खी खु ।। येथे स्कूलबस चालू करावी व नादुर्खी बु ।। इतकीच स्कूलबस फी नांदुर्खी खु ।। साठी ( रुपये १३००/-) ठेवावी.

०२) कनकुरी ते डो-हाळे हे अंतर जाउुन येवून ४ कि मी असून शिरडी पासून ०६ कि मी इतके होणार आहे. त्यामुळे डो-हाळे येथे बस सुरु करावयाची झाल्यास तेथील स्कूलबस फी रुपये १५६०/- इतकी करावी.(सा.विहीर, पिंपळवाडी अंतर ६ कि मी ची फी इतकी)

०३) विद्यार्थी संख्या दिवसेंदिवस वाढती आहे. श्री साईबाबा इं.मि.स्कूलच्या विद्यार्थ्याना स्कूलबस अपुरी पडत आहे. त्यामध्ये कन्या विद्या मंदिरकडील १४ विद्यार्थीनी येत असल्याने आणखी गर्दी वाढली आहे. कन्या विद्या मंदिरकडील विद्यार्थीनी मोठया वर्गातील असल्याने त्यांची बस सुविधा चालू ठेवावी किंवा कसे१ .

०४) श्री साईबाबा इं.मि.स्कूलकडील विद्यार्थी संख्या स्कूलबस पासिंगपेक्षा २३३ इतकी जास्त आहे. तसेच भविष्यात आणखी पालकांनी बस सुविधा मागणी केल्यास आणि या सर्व विद्यार्थ्याना स्कूलबस सुविधा दयावयाची ठरल्यास सध्यातरी किमान ०४ जादा स्कूलबस खरेदी कराव्या लागतील.

०५) प्रत्येक स्कूलबसची अंदाजे किंमत रुपये १५,५०,०००/- इतकी आहे. ०४ स्कूलबससाठी एकूण खर्च रुपये ६२,००,०००/- इतका अंदाजे खर्च येईल. सदर बस खरेदीचा प्रस्ताव मान्य झाल्यावर कोणत्या बस घ्यावयाच्या, त्यांचा टॅक्स व विमा, इंधन,घसारा तसेच ड्रायव्हर, मदतनीस पगार खर्च या सर्व बाबींचा सविस्तर प्रस्ताव वाहन विभागामार्फत सादर करता येईल.

अ) वरील अ.नं. ०१ ते ०५ या बाबींचा विचार होवून नांदुर्खी खु ाा व डो-हाळे या गावी स्कूलबस सुरु करणे.

ब) कन्या विद्या मंदिरकडील विद्यार्थीनींची सुविधा पुढील सत्रापासून चालू ठेवावी किंवा कसे १.

क) नवीन ०४ स्कूलबस खरेदी करणे .

**निर्णय क्र.८५६ सदरहू प्रस्ताव अमान्य करण्यात आला.** (कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश स्कुल)

---

**विषय नं.५९ श्रीसाईबाबा इंग्लिश मिडियम स्कुल करिता नवीन बेंचेस खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ज्यु.केजी ते इयत्ता १० वी पर्यतचे वर्ग आहेत. या वर्गातील विद्यार्थ्याना वर्गात बसणेकामी एकूण ७७३ बेंच आहेत. त्यापैकी ज्यु.केजी ते इ. २ री पर्यतचे बेंचेस चांगले आहेत. इ. ३ री ते १० पर्यतचे वर्गातील १५० बेंचेस तुटलेले / निकामी झालेले आहेत. सदरचे बेंचेस विद्युत व बांधकाम विभागाकडून आतापर्यत वेळोवेळी दुरुस्त करून घेण्यात आलेले आहेत. सदर बेंचेस कमी करुन १५० नवीन खरेदी करावयाचे आहेत.

| अ.नं. | शाळेतील निकामी/खराब बेंचेस संख्या | वर्ग | बेंचेसची मापे | आवश्यक बेंचेस खरेदी संख्या | अंदाजे प्रतिनग किंमत | अंदाजे एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ज्यु.केजी ते इ. १० वी एकूण-१५० | इ. ३री ते ४ थी | लांबी x रुंदी x उंची २" x २".१०" x २" | ७५ | २८००/- | २,१०,०००/- |
| ०२ | | इ. ५ वी ते ७ वी | लांबी x रुंदी x उंची २.२ x २.१० x २.६ | २५ | ३०००/- | ७५,०००/- |
| ०३ | | इ.८ वी ते १० वी | लांबी x रुंदी x उंची २.७ x २.१० x २.७ | ५० | ३२००/- | १,६०,०००/- |
| | | एकूण | | १५० | | ४,४५,०००/- |

वरील तपशिलात नमूद केलेप्रमाणे १५० नग बेंचेस खरेदी करावयाचे असून त्यासाठी एकूण रुपये ४,४५,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे बेंचेस आपल्याला खरेदी विभागामार्फत खरेदी करता येतील. सोबत आवश्यक असलेल्या बेंचेस डिझाईन (आकृती) व मोजमाप देत आहोत.

तरी उपरोक्त प्रमाणे १५० नग बेंचेस खरेदी विभागामार्फत कोटेशन्स मागवून खरेदी करुन मिळणेकामी सदर विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८५७ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्रीसाईबाबा इंग्लिश मिडियम स्कुल करिता आवश्यक असणारे १५० नग बेंचेस विहित पद्धतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४,४५,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश स्कुल/अधिक्षक,खरेदी)

---

**विषय नं.६० श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदीर करिता नवीन बेंचेस खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदीर, शिर्डी या विद्यालयात शैक्षणिक वर्ष- २००९-१० मध्ये इयत्ता ५ वी ते १० वीच्या प्रत्येकी दोन वर्ग तुकडयांमधुन एकूण ६०८ विद्यार्थीनी शिक्षण घेत असून विद्यालयात विद्यार्थीनींना बसणेकामी एकूण ३७३ बेंचेस आहेत. पैकी १५० बेंचेस तुटलेल्या/ निकामी झाल्याने जुने बेंचेस कमी करुन २०० नग नवीन बेंचेस खरेदी करावयाचे आहेत.

| अ. नं. | शाळेतील उपलब्ध बेंचेसची संख्या | शाळेतील निकामी व खराब झालेल्या बेंचेसची संख्या | वर्ग | बेंचेसचे माप लांबी x रुंदी x उंची | आवश्यक बेंचेस खरेदी संख्या | अंदाजे प्रती नग किंमत | अंदाजे एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३७३ | १५० | इ.५ वी ते इ.१० वी | २.४ x २.८ x २.७ | २०० | ३,२००/- | ६,४०,०००/- |
| | | | | एकूण- | २०० | | ६,४०,०००/- |

वरील तपशीलामध्ये नमूद केलेप्रमाणे २०० नग नवीन बेंचेस खरेदी करावयाचे असून त्यासाठी एकूण अंदाजीत रक्कम रु.६,४०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरहू बेंचेस आपल्याला खरेदी विभागामार्फत खरेदी करता येतील.

**निर्णय क्र.८५८ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदीर करिता आवश्यक असणारे २०० नग बेंचेस विहित पद्धतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६,४०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्या,कन्या शाळा/अधिक्षक,खरेदी)

---

**विषय नं.६१ डीश टीव्हीवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधेबाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार Tata Communications Ltd., Mumbai यांचेमार्फत श्रींचे ऑनलाईन दर्शन व आरतीची सुविधा टाटास्काय डिश वर सुरु करण्यात आलेली असून, त्याबदल्यात त्यांचेबरोबर एक वर्षाचा करारनामा करुन सदर सुविधा पुरविणेपोटी एका वर्षासाठी एक कोटी + टॅक्सेस इतकी रॉयल्टी समान चार हप्त्यात घेणेचे ठरले आहे. त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करण्यात आलेला असून, त्याची मुदत दिनांक १३ नोव्हेंबर, २००९ रोजी संपुष्टात येत आहे. श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधेचा जगभरातील अनेक साईभक्त लाभ घेत असून, यास चांगला प्रतिसाद मिळत असल्याने, Tata Communications Ltd., Mumbai यांचेमार्फत पुढील कालावधीत ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु ठेवणे आवश्यक आहे. तथापि, त्यांचेशी करण्यात आलेल्या करारनाम्याचे पुढील एक वर्षासाठी नूतनिकरण करुन त्यांचेकडून घेण्यात येणाऱ्या रॉयल्टीमध्ये वाढ करुन निव्वळ रुपये सव्वा कोटी मात्र (Non Exclusive) एक वर्षासाठी घेण्यात यावे, असे नम्र मत आहे.

**(ब)** सध्या Airtel कंपनीचीही डिश टि.व्ही. सेवा सुरु असल्याने, सदर डिश टि.व्ही. वर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करणेबाबत माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत वेळोवेळी त्यांचेकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे. त्यानुसार त्यांनी उपरोक्त संदर्भान्वये सदर सुविधा सुरु करणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

त्यास अनुसरुन, Airtel कंपनीचे डिश टि.व्ही.वर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करणेस परवानगी देण्यात यावी व त्या बदल्यात त्यांचेकडून निव्वळ रुपये सव्वा कोटी मात्र (Non Exclusive) एक वर्षासाठी रॉयल्टी स्वरुपात घेण्यात यावे, असे नम्र मत आहे. तथापि, रॉयल्टी रक्कमेबाबत Tata Communications Ltd., Mumbai व Airtel यांचे प्रतिनिधींना मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चेसाठी बोलाविण्यात आलेले आहे.

उपरोक्त परिच्छेदातं नमुद केलेप्रमाणे, Tata Communications Ltd., Mumbai व Airtel यांचे प्रतिनिधींशी चर्चा-तथा-वाटाघाटीअंती निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.८५९ आजचे सभेत Tata Communications Ltd., Mumbai व Airtel यांचे प्रतिनिधीं उपस्थित होते, त्यांचेशी चर्चा केली असता चर्चा-तथा-वाटाघाटीअंती Tata Communications Ltd., Mumbai यांनी एक वर्षासाठी निव्वळ रुपये सव्वा कोटी मात्र (Non Exclusive) व Airtel यांनी एक वर्षासाठी निव्वळ रुपये साठ लाख मात्र (Non Exclusive)देण्याचे मान्य केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन,याबाबत सविस्तर माहिती घेऊन प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पूढील सभेत निर्णयार्थ सादर करण्यात यावा असे ठरले. दरम्यानचे काळामध्ये Tata Communications Ltd., Mumbai यांची सेवा चालू ठेवण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

---

**विषय नं.६२ Vistaas Media Ltd.Mumbai यांचे नावात झालेल्या बदलाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थान समितीचे दिनांक १९/०७/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६४५ अन्वये मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा उपलब्ध करुन देणेस व त्याबदल्यात सदर सुविधा पुरविणाऱ्या प्रस्तावधारकांकडून प्रतिवर्षासाठी रॉयल्टी रुपये २५ लाख+ टॅक्स (exclusive basis- Except Airtel Network) घेणेचा निर्णय झालेला आहे. त्यास अनुसरुन, Vistaas Media Ltd., यांनी दिनांक २०/०६/२००९ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर केलेला होता. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये सदर सुविधा सुरु करणेस व त्याबदल्यात रॉयल्टीची रक्कम रुपये २५ लाख+ टॅक्स (exclusive basis- Except Airtel Network) असलेबाबत Vistaas Media Ltd., Mumbai यांना जा. नं. एसएसएसटी/आयटी/ १०४२३/०९ दिनांक २०/०८/२००९ रॉयल्टीबाबत पत्र देण्यात आलेले आहे.

त्यानुसार Vistaas Media Ltd., Mumbai यांनी मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा उपलब्ध करुन देणेस व त्याबदल्यात रॉयल्टीची रक्कम रुपये २५ लाख+ टॅक्स (exclusive basis- Except Airtel Network) संस्थानला देणेस त्यांचे दिनांक ०४/०९/२००९ रोजीचे पत्राव्दारे इकडील कार्यालयाकडे कळविलेले आहे. त्याप्रमाणे विधी विभागामार्फत करारनामा करणेची पूढील कार्यवाही सुरु आहे. Vistaas Media Ltd., Mumbai यांनी त्यांचे उपरोक्त संदर्भान्वये ०६/१०/२००९ रोजीचे (संस्थान आवक नंबर ३११३५ दिनांक ०६/१०/२००९) पत्रान्वये त्यांचे नावात नावात बदल होऊन, Vistaas Digital Media Ltd., असे करण्यात आलेबाबत कळविलेले आहे.

Vistaas Media Ltd., Mumbai यांचेमार्फत मोबाईलवर ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करण्यात येत असल्यामुळे त्यांचेशी वेळोवेळी करावा लागणारा पत्रव्यवहार व सदर सुविधेसाठी करण्यात येणारा करारनामा हा नवीन नावाने म्हणजेच Vistaas Digital Media Ltd., या नावाने करावा लागणार असल्याने, सदर झालेल्या बदलाची नोंद घेणेसाठी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात यावी, असे नम्र मत आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे Vistaas Media Ltd., यांचेशी संस्थानमार्फत करण्यात येणारे सर्व अर्थिक व्यवहार, पत्रव्यवहार, करारनामे हे त्यांचे नविन नावाने म्हणजे Vistaas Digital Media Ltd., या नावाने करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.८६०** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे Vistaas Media Ltd., यांचेशी संस्थानमार्फत करण्यात येणारे सर्व अर्थिक व्यवहार, पत्रव्यवहार, करारनामे हे त्यांचे नविन नावाने म्हणजे Vistaas Digital Media Ltd., Mumbai या नावाने करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

---

**विषय नं.६३** **श्रींचे लाकडी रथास चांदीचा नक्षीदार पत्रा बसविणे बाबत**

**प्रस्ताव-** श्रींचे प्रमुख तीन उत्सव व इतर स्थानिक उत्सवामध्ये श्रींचे रथाची गावातून मिरवणूक काढण्यात येते, त्यावेळी रथामध्ये श्रींचा फोटो व पादुका दर्शनासाठी ठेवण्यात येतात. मंदिर विभागाकडे सध्या दोन लाकडी रथ आहेत, त्यामध्ये नवीन रथ सध्या वापरात आहे.

दि.०९.०८.२००९ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं.०७ निर्णय क्र.७२० अन्वये श्रींचे दोनही रथास चांदीचा पत्रा बसविणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. वरील दोन्हीही देणगीदाराचे कारागीरास समक्ष बोलावून सदरहू काम कशाप्रकारे करणार याबाबत माहिती घेऊन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावे, असे ठरले. परंतू दोन रथ उत्सवाचे मिरवणूकीसाठी न वापरता त्यातील फक्त एक रथ आता कायमस्वरुपी गावातून मिरवणूकीसाठी वापरात असलेने त्याच रथाला चांदी बसवून घ्यावी, असे नम्र मत आहे. चांदीचे काम दोन देणगीदार करुन देणार आहे, मात्र पुर्वी ज्यांनी रथ देणगी दिला आहे त्यांचकडूनच सदरचे चांदी काम करुन घ्यावे, असे वाटते. दुसरे देणगीदार श्री.जी.एस. मोहमद रफिक, मु.पो. बेल्लारी यांचेकडून दुसरे काम देणगीदाखल करुन घेता येईल, असे वाटते.

याबाबत असे वाटते की, साईभक्त श्री.रमेश जी. सहेंता, मुंबई यांनी दि.१७.०६.२००४ रोजी रु.५१,०००/- किमतीचा लाकडी सागवानी रथ स्वखर्चाने श्रींना देणगीदाखल अर्पण केलेला आहे. सदर लाकडी रथ मिरवणूकीसाठी वापरण्यात येतो. फक्त या एका लाकडी रथास चांदीचा पत्रा बसविण्यात यावा. सदर चांदीचा पत्रा स्वखर्चाने मजूरीसह देणगी दाखल बसवून देणेबाबत श्री.संहेता, मुंबई यांनी इच्छा प्रदर्शित केली आहे. याबाबत त्यांनी दि.०८.०४.२००९ रोजी पत्राने कळविले आहे.

तरी साईभक्त श्री. रमेशभाई संहेता, मुंबई यांचेकडून नवीन लाकडी रथास चांदीचा नक्षीदार जाडपत्रा मजूरीसह देणगीदाखल बसवून घ्यावा, असे वाटते. सदरचे काम मंदिर अधिक्षक, मुख्य लेखाधिकारी व संस्थानचे अधिकृत सराफ श्री.माधवराव नागरे, शिर्डी यांचे देखरेखीत शिर्डी येथे करुन घेता येईल. तरी याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत फेर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.८६१** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईभक्त श्री.जी.एस. मोहमद रफिक, मु.पो. बेल्लारी यांचेकडून श्रींचे लाकडी रथास चांदीचा नक्षीदार पत्रा बसविणेचे काम मंदिर अधिक्षक, मुख्य लेखाधिकारी व संस्थानचे अधिकृत सराफ श्री.माधवराव नागरे, शिर्डी यांचे देखरेखीत शिर्डी येथे देणगीदाखल करुन घेण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग)

---

**विषय नं.६४** **कर्मचाऱ्यांचे आगमन-निर्गमन वेळेकरीता बसविणेत आलेल्या फिंगर प्रिंट सिस्टीम (बायोमेट्रीक) मशिन्सचे वार्षीक देखभाल सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट बाबत**

**प्रस्ताव-** मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांना संस्थान कर्मचाऱ्यांचे आगमन-निर्गमन वेळेकरीता ०७ नग फिंगर प्रिन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् पुरविणे व इन्स्टॉलेशन करुन देणे कामी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५८५४/२००६ दि.०२-०५-२००६ अन्वये पुरवठा आदेश देणेत आला. त्याप्रमाणे मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांनी माहे मे-जुन २००६ मध्ये संस्थान कर्मचा-यांचे आगमन-निर्गमन वेळेकरीता ०७ नग फिंगर प्रिन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् ०१) प्रशासन शाखा (शांतीनिवास इमारत), ०२) चौकशी व निवासस्थान कार्यालय, ०३) श्री साईबाबा हॉस्पीटल, ०४) श्री साईनाथ हॉस्पीटल, ०५) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, ०६) आय.टी.आय., ०७) मुंबई कार्यालय या ठिकाणी इन्स्टॉल करुन दिलेली आहेत.

त्याचप्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७-०७-२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६० (२५) यास अनुसरून मंदिर व संरक्षण विभागातील कर्मचाऱ्यांसाठी ०१ व नविन प्रसादालयातील कर्मचाऱ्यांसाठी ०१ असे आवश्यक असलेल्या एकूण ०२ नग फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् माहे नोव्हेंबर-२००८ मध्ये मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांचेकडून खरेदी करून, बसविणेत आलेले आहेत. त्याकामी एकुण रूपये २,५८,०००/- (अक्षरी रूपये दोन लाख अठ्ठावन्न हजार) मात्र खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. अशाप्रकारे एकूण-०९ ठिकाणी बसविणेत आलेल्या फिंगर प्रिन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्सद्वारे संस्थान कर्मचाऱ्यांच्या आगमन-निर्गमन वेळेची नोंद केली जात आहे. पैकी माहे मे-जून २००६ मध्ये बसविणेत

आलेल्या ०७ फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्सचा वॉरंटी कालावधी दि.२३-०५-२००६ ते दि.२३-०५-२००९ असा ०३ वर्षांचा होता. मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई या कंपनीने तीन वर्षाचे वॉरंटी पिरियडमध्ये वेळोवेळी त्यांचा प्रतिनिधी संस्थानमध्ये पाठवून फिंगर प्रिन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स व सॉफ्टवेअरची देखभाल, दुरूस्तींची कामे चांगल्याप्रकारे करून दिलेली आहेत. सदर वॉरंटी कालावधी दि.२३-०५-२००९ रोजी संपलेला आहे.

म्हणून मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांनी उपरोक्त प्रमाणे माहे मे-जून २००६ मध्ये बसविणेत आलेल्या ०७ फिंगर प्रिन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स्चे दि.०१-०८-२००९ ते दि.३१-०७-२०१० या एक वर्ष कालावधीकरीता, वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (ॲन्युअल मेन्टेंनन्स कॉन्ट्रॅक्ट) संदर्भात दि.१४-०८-२००९ रोजीचे पत्रान्वये कोटेशन सादर केलेले आहे. सदर कोटेशनप्रमाणे त्यांनी ०७ फिंगर प्रिंन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स व टाईम ॲन्ड अटेंन्डन्स सॉफ्टवेअरचे वार्षिक देखभाल सर्व्हिस (ॲन्युअल मेन्टेंनन्स कॉन्ट्रॅक्ट) कामी एकूण रूपये १, ४०,०००/-(अक्षरी रूपये एक लाख चाळीस हजार) मात्र रक्कम मिळावी अशी विनंती केली आहे. मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांनी सदर वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (ॲन्युअल मेन्टेंनन्स कॉन्ट्रॅक्ट) च्या जनरल अटी व शर्ती खालीलप्रमाणे दिलेल्या आहेत.

**GENERAL TERMS & CONDITIONS-**

- ❖ This contract will be a comprehensive service contract.
- ❖ The Rates are inclusive of all the Taxes.
- ❖ The Contract excludes Power Adaptor.
- ❖ १२ months onsite service support.
- ❖ The immediate support will be telephonic or through mail.
- ❖ Service turn-a-round time will be within २४ hrs.
- ❖ Provision of stand-by unit in the event of the technical failure of the product.
- ❖ The provision of the stand-by unit will free of cost but at your risk.

The standby unit will be the sole property of M/s Alacrity Technologies Pvt.Ltd & will be billed, if returned with any physical damage of Non-working condition.

- ❖ The following cases will be excluded from the service contract.
  १. Physical damage of the product and its components.
  २. Product damage in case of fire, flood, short-circuit, electrical problems.
- ❖ No warranty on physically damaged or burnt parts.
- ❖ Civil, Cabling, Carpentry & providing power points are not in our scope.
- ❖ Further Scope of Service:-Monthly visit of an engineer can be provided for, Subject to provision of free accommodation by the Sansthan.

सबब, उपरोक्तप्रमाणे मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांना माहे मे-जून-२००६ मध्ये बसविणेत आलेल्या ०७ फिंगर प्रिन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स व टाईम ॲन्ड अटेंन्डन्स सॉफ्टवेअरचे दि.०१-०८-२००९ ते दि.३१-०७-२०१० या एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (ॲन्युअल मेन्टेंनन्स कॉन्ट्रॅक्ट) देणेबाबत, व सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामी रक्कम रूपये १,४०,०००/- (अक्षरी रूपये एक लाख चाळीस हजार) मात्र मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि., मुंबई यांना अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.८६२ **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे.अेलाक्रिटी टेक्नॉलॉजीस प्रा.लि.,मुंबई यांना माहे मे-जून-२००६ मध्ये बसविणेत आलेल्या ०७ फिंगर प्रिन्ट अटेडंन्स सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स व टाईम ॲन्ड अटेंन्डन्स सॉफ्टवेअरचे दि.०१-१०-२००९ ते दि.३०-०९-२०१० या एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक देखभाल सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (ॲन्युअल मेन्टेंनन्स कॉन्ट्रॅक्ट) देणेस व सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कामी रक्कम रूपये १,४०,०००/- मात्र अदा करणेस, तसेच प्रचलित दराप्रमाणे प्रती वर्षी रुपये १,४०,०००/- कॉन्ट्रॅक्ट रक्कम त्यांना मान्य असल्यास यापूढे दरवर्षी वार्षिक देखभाल सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचे नुतनीकरण करणेस व त्याकामी प्रती वर्षी रक्कम रुपये १,४०,०००/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-कामगार अधिकारी )

---

विषय नं.६५ **संस्थान आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना नविन ओळखपत्र देणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थान आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना यापुर्वी मे.पेस मार्केटींग सर्व्हीसेस्, मुंबई यांचेकडून ओळखपत्रे (आयकार्ड) तयार करुन घेणेत आलेले आहेत. परंतु सदरची ओळखपत्रे ही जुनी व खराब झालेली आहे. म्हणून संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांना नवीन पी.व्ही.सी. टाईप ओळखपत्र तयार करुन देणेकामी मे.डिजीटल रेन्बो, नाशिक यांना जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/ २१७/२००६ दि.०७-०१-२००६ अन्वये पुरवठा आदेश देणेत आला होता. तसेच त्यांना अनेकवेळा लेखी व तोंडी सुचना देवून देखील त्यांचेकडून संस्थान कर्मचाऱ्यांचे नवीन पी.व्ही.सी.टाईप ओळखपत्र तयार करुन मिळाले नाही.त्यावेळी संस्थान

आस्थापनेवरील सर्व कर्मचा-यांना द्यावयाचे पी.व्ही.सी.टाईप ओळखपत्र, लेस, दोन्ही साईट प्रिटींग करुन, कार्ड होल्डर कव्हर व फोटो ग्राफीसह रुपये ४५/- (अक्षरी रुपये पंचेचाळीस) प्रती ओळखपत्र या दराप्रमाणे तयार करुन देण्याचे त्यांनी मान्य केले होते.

त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१-०४-२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२५ अन्वये संमत करण्यात आलेल्या नियमावलीस अनुसरुन व मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६-०७-२००६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र.५२२ अन्वये संस्थान मध्ये सन १९९१ ते डिसेंबर २००० अखेर पर्यंत जे कंत्राटी कर्मचारी नियमीत कामावर आहेत व त्यापैकी आजमितीस कामावर सलग हजर असणा-या अशा कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमीत नेमणूका देणे बाबत निर्णय संमत झालेला आहे. त्यास अनुसरुन माहे डिसेंबर २००६ मध्ये ९९७ व माहे जुन २००७ मध्ये ५५ कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नव्याने नियमीत नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत.अशा प्रकारे पुर्वीचे १,०३९ कायम कर्मचारी, रुपये २००० दरमहा एकत्रित नियत वेतनावर नियमीत नेमणूक आदेश दिलेले १,०५२ कर्मचारी व श्री साईबाबा हॉस्पीटलकडे नव्याने नियुक्त केलेले सुमारे ३०९ कर्मचारी अशा एकूण- २,४०० कर्मचाऱ्यांना श्री साईबाबा संस्थान, शिरडी या नावा ऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिरडी) व इंग्रजीत Shri Saibaba Sansthan Trust (Shirdi) या नावाप्रमाणे नवीन पी.व्ही.सी.टाईप ओळखपत्र तयार करुन द्यावयाचे असल्याने संबंधीत ओळखपत्र पुरवठा एजन्सीकडून दरपत्रक मागविणेत आले आहे. त्याबाबत तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | एजन्सीचे नांव | दरपत्रकाचा दिनांक | तपशिल | दरपत्रक (रुपये) प्रतिनग |
|---|---|---|---|---|
| १. | फॉरच्युन एन्टरप्रायजेस, नाशिक | २३-०९-२००९ | **अ)** पी.व्ही.सी.आयकार्ड (कलर फोटो व दोन्ही बाजूस प्रिटींग)<br>**ब)** कार्ड होल्डर<br>**क)** लेस<br>**ड) एकूण** | ३८.००/-<br><br>वरील दरात<br>समाविष्ट<br>--"--<br>**=३८.००/-** |
| २. | फिक्सो फोटोज, सातपूर नाशिक | २३-०९-२००९ | **अ)** पी.व्ही.सी.आयकार्ड (कलर फोटो व दोन्ही बाजूस प्रिटींग)<br>**ब)** कार्ड होल्डर<br>**क)** प्रिंन्टेड लेस (दोन्ही बाजू प्रिटींग )<br>**ड) एकूण** | ४०.००/-<br><br>वरील दरात<br>समाविष्ट<br>--"--<br>**=४०.००/-** |
| ३. | सुवर्णा फोटो ॲन्ड डिजिटल आर्ट, येवला | २६-०९-२००९ | **अ)** पी.व्ही.सी.आयकार्ड ( लेजर प्रिन्टींग)<br>**ब)** कार्ड होल्डर<br>**क)** लेस (दोन्ही बाजू प्रिटींग )<br>**ड) एकूण** | ७३.००/-<br><br>१६.००/-<br>२३.००/-<br>**=११२.००/-** |
| ४. | साई कोमल, नांदुर्खी रोड शिरडी | २६-०९-२००९ | **अ)** पी.व्ही.सी.आयकार्ड ( एक बाजू प्रिन्टींग)<br>**ब)** कार्ड होल्डर<br>**क)** लेस (दोन्ही बाजू प्रिटींग )<br>**ड) एकूण** | ७०.००/-<br><br>--<br>१५.००/-<br>**=८५.००/-** |
| ५. | श्री गणेश फोटोज, अहमदनगर | २६-०९-२००९ | **अ)** पी.व्ही.सी.आयकार्ड ( लेजर प्रिन्टींग)<br>**ब)** कार्ड होल्डर<br>**क)** लेस (दोन्ही बाजू प्रिटींग )<br>**ड) एकूण** | ८०.००/-<br><br>१६.००/-<br>२५.००/-<br>**=१२१.००/-** |
| ६. | साईल फोटोज, शिरडी | २६-०९-२००९ | **अ)** पी.व्ही.सी.आयकार्ड ( लेजर प्रिन्टींग)<br>**ब)** कार्ड होल्डर<br>**क)** लेस (दोन्ही बाजू प्रिटींग )<br>**ड) एकूण** | ६५.००/-<br><br>१५.००/-<br>२०.००/-<br>**=१००.००/-** |
| ७. | संजय फोटो स्टुडिओ, राहाता | २६-०९-२००९ | **अ)** पी.व्ही.सी.आयकार्ड ( लेजर प्रिन्टींग)<br>**ब)** कार्ड होल्डर<br>**क)** लेस (दोन्ही बाजू प्रिटींग )<br>**ड) एकूण** | ७५.००/-<br><br>१५.००/-<br>२५.००/-<br>**=११५.००/-** |
| ८. | श्री.एल.एस.पुरोहीत | २२-०९-२००९ | **अ)** पी.व्ही.सी.आयकार्ड | ३५.००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मे लॅमिनेशन इंन्क, नाशिक | | (डिजिटल प्रिन्टींग, फोटोग्राफीसह)<br>**ब)** कार्ड होल्डर<br>**क)** लेस (दोन्ही बाजू प्रिटींग)<br>**ड) एकूण** | वरील दरात<br>समाविष्ट<br>--"--<br>**=३५.००/-** |
| ९. | आकार ऑफसेट प्रिन्टर्स, नाशिक | २४-०९-२००९ | **अ)** पी.व्ही.सी.आयकार्ड (फोटोग्राफीसह)<br>**ब)** कार्ड होल्डर<br>**क)** लेस (दोन्ही बाजू प्रिटींग)<br>**ड) एकूण** | ४०.००/-<br>वरील दरात<br>समाविष्ट<br>--"--<br>**=४०.००/-** |
| १०. | मे.ॲक ऑफिस ॲटोमेशन, पुणे | ०६-१०-२००९ | **अ)** पी.व्ही.सी.आयकार्ड (फोटोग्राफीसह)<br>**ब)** कार्ड होल्डर<br>**क)** लेस (दोन्ही बाजू प्रिटींग)<br>**ड)** व्हॅट टॅक्स<br>**ई) एकूण** | ७५.००/-<br>वरील दरात<br>समाविष्ट<br>--"--<br>३ रूपये<br>**=७८.००/-** |

उपरोक्त दहा एजन्सीज् पैकी अ.नं.०८ श्री.एल.एस.पुरोहित, लॅमिनेशन इंन्क, पंचवटी कारंजा, नाशिक यांनी पी.व्ही.सी.टाईप ओळखपत्र (डिजीटल प्रिटींग), कार्ड होल्डर व प्रिन्टेड लेस फोटोग्राफीसह एकत्रीत रूपये ३५.००/- प्रतिनग याप्रमाणे दर दिलेले असून, ते इतर एजन्सीच्या तुलनेत कमी आहे. म्हणून संस्थान आस्थापने वरील सुमारे २४०० कर्मचाऱ्यांचे नवीन पी.व्ही.सी.टाईप ओळखपत्रे तयार करुन घेणे संदर्भात त्यांचेशी दि.१२-१०-२००९ रोजी दुरध्वनीवरून चर्चा केलेली आहे. चर्चेअंती श्री.एल.एस.पुरोहित, लॅमिनेशन इंन्क, पंचवटी कारंजा, नाशिक यांनी संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांचे पी.व्ही.सी.टाईप ओळखपत्र (डिजीटल प्रिटींग), कार्ड होल्डर व प्रिन्टेड लेस, फोटोग्राफीसह एकत्रीत रूपये ३५.००/- प्रतिनगास या दराप्रमाणे पुरवठा आदेश दिलेपासून दोन महिन्याचे आंत तयार करुन देण्याचे मान्य केलेले आहे.

सबब, श्री.एल.एस.पुरोहित, लॅमिनेशन इंन्क, पंचवटी कारंजा, नाशिक यांचेकडून संस्थान आस्थापनेवरील सुमारे २,४०० कर्मचा-यांना द्यावयाचे पी.व्ही.सी.टाईप ओळखपत्र (डिजीटल प्रिटींग), कार्ड होल्डर व प्रिन्टेड लेस, फोटोग्राफीसह एकत्रीत रूपये ३५.००/-(अक्षरी रूपये पस्तीस) मात्र प्रतिनगास या दराप्रमाणे तयार करुन घेणेस व त्यांना पुरवठा आदेश देणेस तसेच त्याकामी येणाऱ्या सुमारे रुपये-८४,०००/- (अक्षरी रुपये चौऱ्यांशी हजार) मात्र खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८६३ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री.एल.एस.पुरोहित, लॅमिनेशन इंन्क, पंचवटी कारंजा, नाशिक यांचेकडून संस्थान आस्थापनेवरील सुमारे २,४०० कर्मचा-यांना द्यावयाचे पी.व्ही.सी.टाईप ओळखपत्र (डिजीटल प्रिटींग), कार्ड होल्डर व प्रिन्टेड लेस, फोटोग्राफीसह एकत्रीत रूपये ३५.००/- मात्र प्रतिनगास या दराप्रमाणे तयार करुन घेणेस व याकामी येणारे रक्कम रुपये-८४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरकामी मा.कार्यकारी अधिकारी यांनी क्वॅालिटी तपासून निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-कामगार अधिकारी )

---

**विषय नं.६६ श्री विलास शामराव घोडेराव, बडतर्फ मदतनीस, प्रसादालय विभाग यांना संस्थान सेवेत पून्हा हजर करुन घेणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री.विलास शामराव घोडेराव हे दि.२१-०५-२००२ पासून संस्थान सेवेत होते. श्री.घोडेराव हे संरक्षण विभागात पहारेकरी म्हणून कार्यरत असतांना दि.२९-०१-२००५ रोजी त्यांचेकडून खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन घडलेले होते.

दि.२९-०१-२००५ रोजी सुपर सिक्युरिटीचे कार्यालयात कंत्राटी स्त्री सुरक्षा कामगार सौ.सिंधु दुनबळे व सौ.सुनिता मगर यांचे भांडण झाले होते. सदर भांडणाचे वेळी दुपारी ३.३० चे दरम्यान श्री.घोडेराव हे घटणास्थळी मद्यपान केलेल्या अवस्थेत आले. त्यानंतर श्री.घोडेराव हे सौ.दुनबळे यांचेशी भांडण करू लागले. श्री.घोडेराव यांनी दारू पिऊन, दारूचे नशेत सौ.सिंधु दुनबळे यांना शिवीगाळ करून मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तेथील सुरक्षा गार्ड श्री.शब्बीर नुरमहंमद सय्यद व कंत्राटी सुरक्षा अधिकारी श्री.माळवदे यांनी सदर भांडणे सोडविणेचा प्रयत्न केला. श्री.घोडेराव यांनी संस्थान कार्यालयात मद्यपान करून येणे, भांडणे करणे ही बाब गंभीर असून, गैरशिस्तवर्तनात मोडते.

उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.घोडेराव यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१२१२/२००५ दि.०१-०६-२००५ अन्वये आरोपपत्र देवून, त्यांचेवर दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट स्टॅंडींग ऑर्डर्स ॲक्ट-१९४६ चे कलम नंबर २४ (के) प्रमाणे आस्थापनेच्या जागेत दारूने झिंगणे, दंगा मस्ती, बेताल किंवा असभ्य वर्तन करणे, तसेच कलम नंबर २४(एल) आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सद्वर्तनाला बाधक ठरेल असे कोणतेही कृत्ये करणे असे आरोप ठेवणेत आले होते.

श्री.घोडेराव यांचे विरूध्द दि.०१-०६-२००५ रोजी ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोपांची खातेचौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव, खातेचौकशी अधिकारी यांनी पुर्ण करून, त्यांचा दि.२०-०५-२००९ रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केला होता. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढलेले आहे.

**आदेश (निष्कर्ष)**

सबब, आदेश की, इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ चे स्थायी आदेश क्र.२४ (के) यातील तरतुद की, आस्थापनेच्या जागेत दारूने झिंगणे या मुद्दयाखाली श्री.वि.शा.घोडेराव दोषी नाहीत. तसेच स्थायी आदेश क्र.२४ (के) नुसार श्री.घोडेराव यांनी आस्थापनेच्या जागेत दंगामस्ती, बेताल व असभ्य वर्तन केले हा मुद्दा शाबीत झाल्याने श्री.घोडेराव दोषी आहेत. तसेच स्थायी आदेश क्र.२४ (एल) नुसार श्री.घोडेराव यांनी आस्थापनेच्या जागेत शिस्तीला व सद्वर्तनाला बाधक ठरेल असे कृत्ये केल्याचे शाबीत झाल्याने श्री.घोडेराव दोषी आहेत. अशा रितीने श्री.घोडेराव हे अंशतः दोषी आहेत.

श्री.विलास शामराव घोडेराव यांनी यापूर्वी केलेल्या गैरशिस्त वर्तनाचा तपशिल व त्यांना यापूर्वी झालेल्या शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

- दि.०७-११-२००२ रोजी भक्तांशी वाद घालून, त्यांचे तोंडातून रक्त येईपर्यंत त्यांना मारहाण केली व अश्लील भाषेत शिवीगाळ केली. याबाबत श्री.घोडेराव यांना शिक्षा म्हणून एक दिवसाचे मुळ वेतनाइतका दंड करणेत आला.
- दि.१९-०९-२००५ रोजी डयुटी पॉईंट सोडून पुजारी यांचे कपडे बदलण्याचे खोलीकडे जावून, श्री.उदय वाळूंजकर यांची चेष्टा-मस्करी केली. याबाबत श्री.घोडेराव यांना शिक्षा म्हणून दि.०२-१०-२००५ ते दि.०४-१०-२००५ अखेर तीन दिवसा तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आले.
- दि.०१-११-२००४ रोजी विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले.याबाबत श्री.घोडेराव यांना शिक्षा म्हणून अनाधिकृत गैरहजेरी धरून लेखी ताकीद देणेत आली.
- दि.१४-०५-२००६ रोजी नेमून दिलेल्या कामाची जागा सोडून बाहेर निघून गेले. याबाबत श्री.घोडेराव यांना शिक्षा म्हणून एक दिवसाचे मुळ वेतनाइतका दंड करणेत आला आहे.
- दि.२७-०३-२००७ रोजी डयुटीवर असतांना श्री.घोडेराव हे मद्यपान केलेल्या अवस्थेत आढळून आले. याबाबत त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२५७१/२००७ दि.२१-०९-२००७ अन्वये आरोपपत्र देण्यात आले आहे.
- दि.२५-०४-२००८ ते दि.२७-०४-२००८ या कालावधीत श्री.घोडेराव हे विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले आहे. याबाबत त्यांची अनाधिकृत गैरहजेरी धरून त्यांना शिक्षा म्हणून ताकीद देणेत आली आहे.
- दि.१४-०९-२००८ रोजी श्री.घोडेराव हे डयुटीवर असतांना मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत आढळून आले. तसेच ते दि.०२-०९-२००८ ते दि.०९-०९-२००८ व दि.१२-०९-२००८ ते दि.१८-०९-२००८ या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले आहेत. याबाबत त्यांची अनाधिकृत गैरहजेरी धरून त्यांना सक्त ताकीद देण्यात आली.
- दि.१०-०१-२००९ ते दि.२३-०१-२००९ या कालावधीत श्री.घोडेराव हे विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहीले आहेत. याबाबत त्यांची अनाधिकृत गैरहजेरी धरून त्यांना सक्त ताकीद देण्यात आली.

अशाप्रकारे श्री.घोडेराव यांना यापूर्वी गैरशिस्त वर्तनाबाबत आठ वेळा शिक्षा झालेल्या असून देखील त्यांचे सेवेत व वर्तनात सुधारणा होत नसल्याचे दिसून येत होते. म्हणून श्री.घोडेराव यांना संस्थान सेवेतून बडतर्फ (डिसमिस) का करू नये? अशी सेकंड शोकॉज नोटीस इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२३६०/२००९ दि.१३-०७-२००९ अन्वये देवून, त्यांचा लेखी खुलासा मागविणेत आला होता. तसेच सदर नोटीशी सोबत दि.२०-०५-२००९ रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल श्री.घोडेराव यांना पाठविणेत आला होता. तथापि, श्री.घोडेराव यांनी सदर नोटीस दिनांक १५-०७-२००९ रोजी प्राप्त होवून देखील लेखी खुलासा सादर केलेला नाही.

म्हणून श्री.विलास शामराव घोडेराव, मदतनीस, प्रसादालाय विभाग यांचे विरूध्द ठेवणेत आलेल्या आरोप पत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने व ते खातेचौकशीत अंशतः दोषी आढळून आलेले असल्याने तसेच त्यांचे यापुर्वीचे सर्व्हिस रेकॉर्ड विचारात घेता, त्यांना आरोपपत्रात नमूद केलेल्या गंभीर गैरशिस्त वर्तनाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९-०८-२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०० यास अनुसरून इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१०१९९/२००९ दि.१३-०८-२००९ रोजीचे आदेशान्वये दि.१४-०८-२००९ पासून संस्थान सेवेतून कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करणेत आलेले आहे.

त्यानंतर श्री.घोडेराव यांनी पुन्हा सेवेत सामावून घेणेसंदर्भात दि.२५-०९-२००९ रोजीचा विनंती अर्ज सादर केला असून, त्यात त्यांनी " मी प्रसादालय विभागात मदतनीस म्हणून नोकरीस होतो. परंतू

मला व्यवस्थापन कमिटीने दि.१४-०८-२००९ पासून कामावरून कमी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. माझी घरची परिस्थिती अत्यंत गरीबीची असून, उदरनिर्वाहाचे दुसरे कोणतेही साधन नाही. घरातील सर्व व्यक्ती माझेवर अवलंबून आहेत. तरी दया दाखवून, माझे अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार करून मला पुन्हा कामावर हजर करून घ्यावे ही नम्र विनंती." असे म्हटलेले आहे. सदर अर्जावर मा.अध्यक्ष सो.यांनी "फेरविचारासाठी येत्या सभेपुढे ठेवणे." असा अभिप्राय नोंदविला आहे.

सबब, श्री.विलास शामराव घोडेराव, मदतनीस, प्रसादालाय विभाग यांचे विरूध्द ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोप खाते चौकशीत शाबीत झालेले असल्याने व ते खातेचौकशीत अंशतः दोषी आढळून आलेले असल्याने, तसेच त्यांचे यापूर्वीचे सर्व्हिस रेकॉर्ड विचारात घेऊन, त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९-०८-२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०० यास अनुसरून दि.१३-०८-२००९ रोजीचे आदेशान्वये श्री.घोडेराव यांना दि.१४-०८-२००९ पासून कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करणेत आलेले आहे. तरी श्री.घोडेराव यांचे दि.२५-०९-२००९ रोजीचे विनंती अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार करून, त्यांना फ्रेश नेमणूक आदेश देऊन, संस्थान सेवेत पुन्हा कामावर हजर करून घ्यावयाचे किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.८६४** **श्री.विलास शामराव घोडेराव, मदतनीस, प्रसादालाय विभाग यांचे विरूध्द ठेवणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोप खाते चौकशीत शाबीत झालेले असल्याने व ते खातेचौकशीत अंशतः दोषी आढळून आलेले असल्याने, तसेच त्यांचे यापूर्वीचे सर्व्हिस रेकॉर्ड विचारात घेऊन, त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९-०८-२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०० यास अनुसरून दि.१३-०८-२००९ रोजीचे आदेशान्वये श्री.घोडेराव यांना दि.१४-०८-२००९ पासून कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करणेत आलेले आहे या झालेल्या निर्णयात कोणताही बदल करु नये. तसेच येथून पूढे अशी प्रकरणे व्यवस्थापन समितीचे सभेपुढे आणण्यात येऊ नये, असे ठरले.**

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.६७** **श्री रामनवमी उत्सव २००९ झालेल्या जादा खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री रामनवमी उत्सव २००९ मध्ये खालीलप्रमाणे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते व त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०३/२००९ रोजीचे सभेत निर्णय क्र.२६७ नुसार मान्यताही मिळालेली होती. प्रत्यक्षात मात्र फक्त भक्तांना मिष्टान्न मजूरीसह याकामी अंदाजीत खर्चापेक्षाही जादा खर्च झालेला आहे. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | तपशील | मा.व्य.समितीने मंजूर केलेली रक्कम | प्रत्यक्ष खर्च | शेरा (जादा खर्च) |
|---|---|---|---|---|
| ०१. | कलाकार बिदागी, | ०६,००,०००.०० | ००,६१,१६७.०० | --- |
| ०२. | भक्तांना मिष्टान्न मजूरीसह | ०३,००,०००.०० | ०३,२७,२०८.०० | २७,२०८.०० |
| ०३. | विद्युत रोषणाई | ०६,००,०००.०० | ०४,७३,००४.०० | --- |
| ०४. | निमंत्रणपत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदीप्रसादासह. | १५,००,०००.०० | ००,९६,७५४.००<br>१३,३२,२६२.०० | --- |
| ०५. | जादा कामगार | ०३,००,०००.०० | ०१,६८,८०१.०० | -- |
| ०६. | इतर खर्च - मंदिर रंगकाम, कुस्त्या, लस्सी, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधन बीलासह. | ०५,००,०००.०० | ००,२२,२२७.००<br>००,४२,०५०.०० | --- |
| ०७. | पाणी व्यवस्था- (टँकर डिझेलसह) | ०२,००,०००.०० | ०१,७८,७४६.०० | --- |
| | एकूण | ४०,००,०००.०० | २७,०२,२१९.०० | --- |

अ.नं.०२ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री रामनवमी उत्सव २००९ मध्ये भक्तांना मिष्टान्न मजूरीसह रु.०३,००,०००.०० इतका खर्च मा.व्यवस्थापन समितीने मंजूर केला होता तथापि प्रत्यक्ष रु. ०३,२७,२०८.०० इतका खर्च आलेला आहे. याप्रमाणे रु. २७,२०८.०० मात्रचा जादा खर्च झालेला आहे.

तरी अ.नं. ०२ प्रमाणे भक्तांना मजुरीसह मिष्टान्नासाठी झालेल्या रु. २७,२०८/- (अक्षरी रु. सत्तावीस हजार दोनशे आठ मात्र) चे जादा खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.८६५** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे भक्तांना मजुरीसह मिष्टान्नासाठी झालेल्या रु. २७,२०८/- मात्रचे जादा खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.६८** **श्रीसाईसतचरित्र पारायण सोहळा-२००९ झालेल्या जादा खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००९ सालात दि.२१/०६/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळचा विषय नं.२३, व निर्णय क्र.५७२ अन्वये श्री साई सत् चरित पारायण सोहळा -२००९ साठी एकूण खर्च रु. ७,३५,०००/- इतका मंजूर करण्यात आलेला होता. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) आयोजित, नाट्य रसिक संच, शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ, यांचे सहकार्याने श्री साईसच्चरीत पारायण सोहळा गुरुवार, दि.२३/०७/२००९ ते शुक्रवार, दि.३१/०७/२००९ अखेर नऊ दिवस जुन्या प्रसादालय हॉलमध्ये साजरा करण्यात आला. यात १९७५ वाचकांनी सहभाग घेतला होता. सदर पारायण सोहळ्यासाठी खालीलप्रमाणे खर्च आलेला आहे.

| अ.नं. | तपशील | अंदाजीत खर्च | प्रत्यक्ष खर्च | शेरा (जादा खर्च) |
|---|---|---|---|---|
| ०१. | मंडप व्यवस्था खर्च | ०१,७५,०००.०० | ००,७७,२५३.०० | --- |
| ०२. | बोर्डस्, बॅनर्स व निमंत्रण पत्रिका इ. खर्च | ००,५०,०००.०० | ००,२०,९३०.०० | --- |
| ०३. | प्रवचनकारी/कीर्तनकार इ. चे मानधन, प्रवासभाडे इ.खर्च | ०१,५०,०००.०० | ००,७४,१०९.०० | --- |
| ०४. | मिरवणुक, बँड, सत्कार - बक्षिसे इ. खर्च | ००,५०,०००.०० | --- | --- |
| ०५. | इतर किरकोळ खर्च | ००,७५,०००.०० | ००,१२,२६०.०० | --- |
| ०६. | चहा, नाष्टा, फराळ व शेवटच्या दिवशी भंडारा इ.चा खर्च | ०२,२५,०००.०० | ०२,२९,५९६.०० | ०४,५९६.०० |
| ०७. | जादा कंत्राटी कर्मचारी खर्च | ००,१०,०००.०० | ००,०५,१२४.०० | --- |
| | एकूण खर्च- | ०७,३५,०००.०० | ०४,१९,२७२.०० | |

अ.नं.०६ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - चहा, नाष्टा, फराळ व शेवटच्या दिवशी भंडारा इ.चा खर्च रु. २,२५,०००/- मात्र अंदाजीत धरला होता. तथापि रु.२,२९,५९६/-मात्र इतका खर्च झालेला असून रु. ४,५९६/- इतका खर्च जादा झालेला आहे.

श्री साई सत् चरित पारायण सोहळ्यासाठी एकूण अंदाजीत खर्च रु. ७,३५,०००.०० इतका धरण्यात आला होता तथापि रु. ४,१९,२७२.०० (अक्षरी रु. चार लाख एकोणीस हजार दोनशे बहात्तर मात्र) खर्च आलेला आहे. उपरोक्तनुसार अपेक्षीत खर्चापेक्षा रु.३,२२,७२८.०० (अक्षरी रु. तीन लाख बावीस हजार सातशे अठ्ठावीस मात्र) इतका कमी झालेला आहे.

तथापि अ.नं.०६ मधील चहा, नाष्टा, फराळ व शेवटच्या दिवशी भंडारा इ.साठी रु.४,५९६/-इतका खर्च जादा झालेला आहे.

**निर्णय क्र.८६६ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्रीसाईसतचरित्र पारायण सोहळा-२००९मध्ये चहा, नाष्टा, फराळ व शेवटच्या दिवशी भंडारा इ.साठी झालेल्या रक्कम रु.४,५९६/-इतका जादा खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.६९ श्री विरभद्र बिरोबा बन,शिर्डी येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांच्या हगामा करिता आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री सर्जेराव भाऊराव काटकर, अध्यक्ष, श्री विरभद्र यात्रा कमिटी, शिर्डी (बिरेगांव बन) यांनी त्यांचे दिनांक १३/१०/२००९ रोजीचे अर्जात विरभद्र (बिरोबा) या दैवताची यात्रा हि रविवार, दि.०१/११/२००९ ते मंगळवार, दि.०३/११/२००९ अखेर बिरोबा बन, शिरडी येथे मोठया थाटात भरणार असून यात मंगळवार, दि.०३/११/२००९ रोजी कुस्ती हंगामही आयोजित केलेला आहे, या कुस्त्यात भाग घेणा-या व विजयी पहिलवानांना वाटण्यासाठी म्हणून मागील वर्षी रु.७५,०००/- मात्रची रक्कम मदत मिळाली होती, यावर्षीही रु.७५,०००/- ची आर्थिक मदत मिळावी अशी नम्र विनंती केलेली आहे.

दि.१७/११/२००४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.११९ नुसार एक विशेष बाब म्हणून विरभद्र यात्रा बन, शिर्डी यांना शुक्रवार, दि.२६/११/२००४ रोजी होणा-या कुस्त्यांच्या हंगाम्यासाठी रु.२५ हजार रक्कम श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थान प्रतिनिधी नेमून देण्यात यावी, " असे ठरल्याप्रमाणे रक्कम देणेत आली होती. तसेच त्यानंतर दरवर्षी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार खालीलप्रमाणे रक्कम मंजूर करुन वाटणेत आलेली आहे.

| .नं. | सभेची तारीख व निर्णय क्र. | मंजूर रक्कम | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| ०१. | दि.१७/११/२००४, निर्णय क्र.११९ | २५,०००.०० | २४,४९९.०० |
| ०२. | दि.०५/११/२००५, निर्णय क्र.७१२ | ५०,०००.०० | ४८,१५२.०० |
| ०३. | दि.१४/१०/२००६, निर्णय क्र.८६६ | ५०,०००.०० | ४३,५३३.०० |
| ०४. | दि.१८/११/२००७, निर्णय क्र.७८२ | ५०,०००.०० | ४९,०२०.०० |
| ०५. | दि.०३/०१/२००९, निर्णय क्र.०४(१९) | ७५,०००.०० | ६४,०८०.०० |

दि.०३/०१/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ०४(१९) नुसार मागीलवर्षी सदरकामी रु. ७५,०००/- मात्रची आर्थीक मदत संस्थानमार्फत देण्यात आली होती. त्यापैकी रु. ६४,०८०/- इतकी रक्कम बिदागी म्हणून वाटली असून उर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा-नांवे करण्यात आलेली होती. चालूवर्षीही गेल्या वर्षाप्रमाणे रु. ७५,०००/- मंजूर करुन श्री रामनवमी उत्सवातील प्रथेप्रमाणे संस्थानचा प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करुन विजयी पहिलवानांना बिदागी म्हणून रक्कम वाटून उर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा-नांवे करता येईल.

तथापि मा.व्यवस्थापन समितीची सभा सदर कार्यक्रमानंतर असलेने मा.अध्यक्ष महोदय यांचे पुर्वपरवानगीने रु. ७५,०००/- इतकी रक्कम देण्यात आलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे सभेत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.८६७ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.७० जूने प्रसादालय इमारत परिसरात सहकारी संस्था यांना लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर देण्यात आलेल्या स्टॉल्सचे मुदतवाढीबाबत**

**प्रस्ताव-** साईभक्तांचे सोयीसाठी (जुने) प्रसादालय परिसरात (स्टॉलसाठी ) यापूर्वी ०१) श्रीरामपुर दुध जिल्हा मध्यवर्ती सहकारी व्यवसायीक संघ, लि. बाभळेश्वर, ०२) संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक, ०३) प्रवरा फळे/फुले भाजीपाला उत्पादक व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्या.लोणी व ०४) गोदावरी खोरे दुध संघ, यांना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर खालील प्रमाणे व्यवसाय चालविण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.नं. | संस्थेचे नांव | डिपॉझिट फी व मासिक भाडे | जागेचा वापर | पूर्वीचा कालावधी | मुदतवाढीसाठी प्रस्तावीत कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीरामपुर दुध जिल्हा मध्यवर्ती सह. व्यवसायीक संघ, लि. बाभळेश्वर | मासिक भाडे रु.२,०००/- (डिपॉझिट रक्कम रुपये-१०,०००/-) | दुध दुग्ध जन्य पदार्थ | दि.३०/११/२००८ ते दि.३१/०३/२००९. | दि.०१/०४/२००९ ते दि.२८/०२/२०१०. |
| ०२ | संगमनेर तालुका सह. दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्या. घुलेवाडी, ता.संगमनेर | मासिक भाडे रु.३,०००/- (डिपॉझिट रक्कम रुपये-१०,०००/-) | आईस्क्रिम व दुग्धजन्य पदार्थ ड्रिंकिंग वॉटर विक्रीकामी. | दि.०६/०७/२००८ ते दि.३१/०३/२००९ | दि.०१/०४/२००९ ते दि.२८/०२/२०१०. |
| ०३ | प्रवरा फळे/फुले भाजीपाला उत्पा.व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सह. संस्था, लोणी | मासिक भाडे रु.२,०००/- (डिपॉझिट रक्कम रु.१०,०००/-) | बेदाणा विक्री साठी | दि.३०/११/२००७ ते दि.२९/११/२००८. | दि.३०/११/२००८ ते दि.२९/११/२००९. |
| ०४ | गोदावरी खोरे दुध संघ, कोपरगांव | मासिक भाडे रु.४००/- | दुध दुग्ध जन्य पदार्थ | पुर्वीपासून | दि.०१/०४/२००९ ते दि.२८/०२/२०१०. |

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार उपरोक्त सहकारी संस्था यांना वापरांस देण्यात आलेल्या परवानगीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढील कालावधीकरीता सदर जागेत संस्थेस स्टॉल्स चालविणेस मागणी आहे. मात्र. जुने प्रसादालय इमारतीचे नुतनिकरणाचे कामास सुरुवात होणार होती. करीता त्याठिकाणी स्टॉल्स असणे सोईचे होणार नाही. या दृष्टिकोनातून समक्ष चर्चा प्रमाणे पुढील मुदतवाढीचे प्रस्ताव यापुर्वी सादर करण्यात आलेला नाही. मात्र अद्यापही प्रस्तुत ४ सहकारी संस्थेचे त्याठिकाणी स्टॉल्स चालूच आहेत. अशा परिस्थितीत त्यांचेकडून मासिक परवानगी फी भरुन घेणे उचित राहील. करीता उपरोक्त ४ सहकारी संस्थेस लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर वापरांस देण्यात आलेल्या स्टॉलसाठी मुदत संपलेल्या तारखेपासून ११ महिने मुदतवाढ देता येईल व त्यांचेकडून यापुर्वीचे मासिक परवाना फी मध्ये १०% वाढीव परवाना फी आकारुन मुदतवाढ देता येईल. तरी सदरचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८६८ यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालय परिसरात असणाऱ्या सर्वच सहकारी संस्थाना लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर वापरांस देण्यात आलेल्या स्टॉलसाठी रुपये १०,०००/- प्रती महिना भाडे आकारण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी )

---

**विषय नं.७१ शासन निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता देणे बाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन, वित्त विभाग निर्णय क्र.मभवा-११०९/प्र.क्र.७०/सेवा-९ मंत्रालय मुंबई, ३२ दि.०५ ऑक्टोबर २००९ अन्वये, "राज्य शासकीय कर्मचारी व महागाई भत्ता अनुज्ञेय असणाऱ्या इतर सर्व पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना दि. ०१ जुलै २००९ पासून सुधारित वेतनसंरचनेतील वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतनावर अनुज्ञेय महागाई भत्याचा दर २२ टक्के वरुन २७ टक्के करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचा-यांना महागाई भत्त्याचे दरात वाढ करावी लागेल.

संस्थान कर्मचाऱ्यांना महागाईभत्ता देणेबाबत यापूर्वी मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेमध्ये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्र.२२ दि.१३/१०/१९८४.

विषय नं.०३ संस्थान सेवकांना अंतरिम वाढ देणेबाबत..

महाराष्ट्र शासन ज्या ज्या वेळी शासकीय कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता,अंतरिम वाढ देते त्याप्रमाणे त्या दराने संस्थान कर्मचाऱ्यांना वाढ देणेची प्रथा आहे.यापुढे कार्यकारी अधिकारी यांनी त्या प्रथेस अनुसरुन वेळोवेळी वाढ द्यावी.

निर्णय नं.६० (२) दि.०४/०६/१९८९.

विषय नं.:- ०६ महाराष्ट्र शासनाचे वित्त विभाग क्र.वेपूर १२८८/१५४/सेवा-१०.

दि.०१ आक्टोंबर १९८८ च्या अधिसुचनेप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी लागू केलेली आहे. संस्थान कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच सुधारीत वेतनश्रेणी दिनांक ०१/०१/१९८६ पासून लागू करणेत यावी.या वेतनश्रेणीतील वेतन ठरवितांना वित्त विभाग परिपत्रक १२८८/५८९ सेवा १०, मंत्रालय,मुंबई ३२ दि.२१ आक्टोंबर १९८८ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करावा.

उपरोक्त प्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांना यापूर्वी महागाई भत्ता वाढ वेळेवेळी मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेनेच आदा करण्यात आलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान,शिर्डीचे व्यवस्थापन मा.सिटी सिव्हील कोर्ट मुंबई यांचेकडील मंजूर व्यवस्थापकीय घटनेन्वये (Management Scheme),दि.०१ ऑगष्ट १९८४ पासून कोर्ट रिसीव्हरकडून मा.धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी नेमलेल्या तत्कालीक मा.विश्वस्तमंडळाकडे सोपविण्यात आले होते.

त्यानुसार दि.२३ ऑगष्ट २००४ पर्यंत संस्थानवर विश्वस्तमंडळाचे व्यवस्थापन होते.महाराष्ट्र शासनाने विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई ३२, यांचेकडील दि.२३ ऑगष्ट २००४ रोजीच्या अधिसुचनेप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ ( २००४ चा महा.१४) लागू

केला असून, त्यातील कलम ०५ मधील पोट कलम (१) आणि त्यासोबत पोटकलम (२) अन्वये नुतन व्यवस्थापन समिती नियुक्त केलेली आहे.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०१/०९/२००४ च्या सभेत खालील प्रमाणे निर्णय क्र.०३ संमत झालेला आहे.

"अद्यापर्यंत संस्थानचे सर्व साधारण कामकाज / विविध कार्यपध्दती मा.सिटी सिव्हील कोर्ट,मुंबई यांनी मंजूर केलेल्या घटनेतील तरतुदीन्वये,तसेच पुर्वीच्या व्यवस्थापन मंडळाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे / निर्देशानुसार कार्यरत आहे.त्यानुसार तत्कालीन विश्वस्त मंडळाचे सचिव व संस्थानचे प्रधान अधिकारी (Principal Officer) या नात्याने ज्या जबाबदाऱ्या कर्तव्ये मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडून पार पाडल्या जात,त्याच अधिकारकक्षेत उपरोक्त नमूद विश्वस्तव्यवस्था,अधिनियम २००४ मधील तरतूदीस बाधा न येता पुर्वीच्या सर्वसाधारण जबाबदाऱ्या तथा कर्तव्ये पार पाडण्यास मा.कार्यकारी अधिकारी यांना अधिकार प्रदान व्हावेत.जेणेकरुन मंदिरातील प्रचलित कार्यपध्दती,रुढीपरंपरा,विविध विभागातील कामकाजांच्या पध्दती,पूर्वीच्या विविध योजना तथा विकास कामे आदी सुव्यवस्थीतपणे सुरु राहतील व दैंनदिन कामकाजात कुठलाही अडथळा / अडचण होणार नाही.याकरीता उपरोक्त अधिनियमातील तरतुदीन्वये आवश्यक ते नियम / अधिनियम तयार होईपर्यंत राज्य शासनाकडून विशिष्ट बार्बीमध्ये निर्देश होईपर्यंत अथवा व्यवस्थापन समितीकडून वेळोवेळी अंतिम निर्णय / निर्देश होईपर्यंत तूर्त प्रचलित पध्दतीने कामकाज सुरु ठेवणेस मान्यता देणेबाबतचा निर्णय झाला आहे.

शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपूर-१२०९/ प्र.क्र.२७/ सेवा -९ दिनांक २२ एप्रिल-२००९ व शासन परिपत्रक क्रमांक वेपूर -१२०९ / प्र.क्र.६९/ सेवा-९ वित्तविभाग मंत्रालय मुंबई -३२ दि.२९ एप्रिल २००९ नुसार महाराष्ट्र शासनाच्या कर्मच्यां-यांना दि.०१/०१/२००६ पासून ०६ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन लागू करण्यात आले आहे.

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०५/२००९ रोजीच्या सभेतील निर्णयाने संस्थानचे आस्थापनेवरील कायम कर्मचा-यांना ०६ व्या वेतन आयोगाच्या शिफारसी प्रमाणे सुधारित वेतन लागू करण्यात येऊन त्याची अंमलबजावणी दि.०१/०६/२००९ पासून लागू करण्यात आली आहे. संस्थान कर्मचा-यांना शासनाचे प्रमाणे महागाई भत्ता दरात वाढ केल्यास दरमहा अंदाजे रु.दहा लाख मात्र इतका अर्थिक बोजा पडणार आहे.

तरी आता वरिल प्रमाणेच महागाई भत्त्यासंदर्भात झालेल्या शासन निर्णया प्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांना दि.०१ जुलै २००९ पासून सुधारित वेतन संरचनेतील वेतनबॅन्डमधील वेतन अधिक ग्रेड वेतनावर अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर २२ टक्केवरुन २७ टक्के दराने महागाई भत्ता मंजूर करुन आदा करणेस तसेच

महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसी नुसार वेळोवेळी मंजूर केले जाणारे वेतन व इतर सर्व भत्ते शासकिय कर्मचा-याप्रमाणेच संस्थान कर्मचा-यांना मंजूर करुन आदा करणेबाबत मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८६९** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसी नुसार वेळोवेळी मंजूर केले जाणारे वेतन व इतर सर्व भत्ते शासकिय कर्मचा-याप्रमाणेच संस्थान कर्मचा-यांना मंजूर करुन आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.७२** **मयत झालेल्या संस्थान कर्मचाऱ्याचे एका नातेवाईकास अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत घेणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री. चांगदेव संतू साबळे हे संस्थानचे लेखाशाखा विभागाकडे वरिष्ठ लेखापाल या पदावर सेवेत होते त्यांचे दि.१६/०८/२००९ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- श्री चांगदेव संतू साबळे
०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- वरिष्ठ लेखापाल , लेखाशाखा
०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०७/०८/१९८४ ते दि.१६/०८/२००९ एकूण सेवा २५ वर्षे
०४.मृत्यु दिनांक :- १६/०८/२००९

श्री चांगदेव संतू साबळे यांचे दि.१६/०८/२००९ रोजी निधन झाल्याने त्यांचे वारसदार त्यांचा मुलगा नामे श्री चेतक चांगदेव साबळे यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्री चेतक चांगदेव साबळे
०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- मुलगा
०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- १४/१०/१९८८ , वय २० वर्ष ११ महिने
०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- ११ वी पास ,

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार श्री चेतक चांगदेव साबळे यांनी अर्ज सादर केलेला आहे.

दिवंगत कै.चांगदेव संतू साबळे यांचा मुलगा नामे श्री चेतक चांगदेव साबळे हे शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८७०** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे दिवंगत कै.चांगदेव संतू साबळे यांचा मुलगा नामे श्री चेतक चांगदेव साबळे हे शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.७३** **श्री साईबाबा हॉस्पिटलकडील वैद्यकीय अधिकारी/आर.एम.ओ नेमणूकीस मान्यता देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल मध्ये वैद्यकिय अधिकारी /आर.एम.ओ पदे भरणेकामी टाईम्स ऑफ इंडीया या वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात येऊन दि. ०२ ऑक्टोबर २००९ रोजी वॉक् इन इंन्टरव्हयू आयोजित करण्यात आले होते. त्यानुसार सदर दिवशी हजर असलेल्या उमेदवारांच्या मा.विश्वस्त तसेच वैद्यकिय संचालक व वैद्यकिय उपसंचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी मुलाखती घेऊन पात्र उमेदवारांच्या निवडी करुन खाली त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे नेमणूक पत्र देण्यात आलेले आहेत.

| अ.नं | वैद्यकीय अधिकारी नांव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. नितीन अशोक भालेराव निफाड जि.नाशिक | एमएस (आर्थो ) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२७३७ /२००९ दि.१५/१०/२००९ श्री साईनाथ हॉस्पीटल, | वैद्यकिय अधिकारी (आर्थो सर्जरी ) एकत्रित वेतन प्रतिमहा रु.३५०००/- |
| ०२. | डॉ.शरयु दिनकर मारुलकर निफाड जि.नाशिक | एम.डी. (गायनीक) | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२७३६ /२००९ दि.१५/१०/२००९ श्री साईनाथ हॉस्पीटल, | वैद्यकिय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ ) एकत्रित वेतन प्रतिमहा रु.३५०००/- |
| ०३. | डॉ.संतोष कुमार श्रीवास्तव बाशरतपूर गोरखपूर (यु.पी.) | एम.डी. फिजीशियन | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२७३५ /२००९ दि.१५/१०/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.२७०००/- |

उपरोक्त ०१ ते ०३ वरील उमेद्वारांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकिय अधिकारी / आर.एम.ओ या पदावर करण्यात आलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**निर्णय क्र.८७१** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे अ.नं.०१ ते ०३ उमेद्वारांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकिय अधिकारी/आर.एम.ओ या पदावर करण्यात आलेल्या नेमणूकीस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.७४** **श्री प्रल्हाद गोरक्षनाथ कर्डीले, आचारी, प्रसादालय यांना वेतनश्रेणी देणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री. प्रल्हाद गोरक्षनाथ कर्डीले, कंत्राटी पध्दतीने सहाय्यक आचारी प्रसादालय विभाग यांनी अर्ज सादर करुन "मला सध्या ५५००/- मानधन मिळत असून डिसेंबर २००९ मध्ये माझे नियुक्तीस ०३ वर्षे पूर्ण होत आहे. माझे शिक्षण १२ वी सायन्स असून मी डिप्लोमा इन केटरिंग कुकरी (०२ वर्षे) हा कोर्स झालेला आहे. तरी मला सदर कायम करुन वेतनश्रेणी मिळावी, " अशी विनंती केली आहे.

श्री कर्डीले यांची संस्थानने प्रसिध्द केलेल्या जाहीरातीनुसार प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८१४८/२००६ दि.२१/१२/२००६ अन्वये कंत्राटी पध्दतीने सहा.आचारी या पदावर एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली असून मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार त्यांना वेळोवेळी मुदतवाढ व मानधनात वाढ देण्यात आलेली असून जा.नं.एसएसएस/वशी-०१/१९५/२००९ दि.१३/०१/२००९ अन्वये देण्यात आलेली ०१ वर्षाची मुदतवाढ दि.२८/१२/२००९ अखेर संपुष्ठात येत आहे.

शासन निर्णयानुसार संस्थानचे आकृतीबंधास दि.०७/०८/२००९ रोजी मंजूरी मिळालेली आहे. सदर शासन निर्णयातील अटी-शर्ती क्र.०३ मध्ये "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी. " अशी आहे.

नवीन आकृतीबंधात प्रसादालय विभागाकडे आचारी ही एकूण २४ पदे आहेत. पैकी १० आस्थापनेवर व १४ कंत्राटी आऊट सोर्सींगने दर्शविलेली आहेत. पैकी ०१ कायम कर्मचारी (श्री. धन्नाराम आण्णाराम पुरोहीत) असून तीन (श्री. प्रल्हाद गोरक्षनाथ कर्डिले, श्री.दिलीप बाबासाहेब सांबारे व श्री. भरत विनायक जाधव ) एकत्रित मानधनावरील कर्मचारी सदरचे काम पहात आहेत. व उर्वरित २० पदे रिक्त आहेत. आचारी या पदाची मान्य आकृतीबंधात शैक्षणिक पात्रता १० वी व केटरिंग कोर्स पास तसेच सदर क्षेत्रातील ०५ वर्षाचा अनुभव व वेतनश्रेणी रु.२६१०-४००० (सुधारित वेतन बॅड रु.४४४०-७४४०+ १६०० ग्रेड वेतन ) अशी आहे.

श्री. कर्डिले यांचेकडे आचारी यांची शैक्षणिक पात्रता १२ वी सायन्स व केटरिंग कोर्स पास असून त्यांना सदर पदाचा कामाचा अनुभव १० वर्षे (हॉटेल व्यवसायातील) आहे. जाहीरातीनुसार आलेल्या उमेद्वारांच्या मुलाखती होऊन श्री कर्डीले यांची सदर पदावर निवड करण्यात आलेली आहे व तसेच ते ०३ वर्षापासून प्रसादालय विभागात सदर पदाचे काम पहात आहे.

तरी श्री. कर्डीले यांना आकृतीबंधानुसार आचारी हे पद व त्या पदाचा वेतन बॅड रु.४४४०-७४४० मधील सुरवातीचे मूळ वेतन रु.४८४० + ग्रेड वेतन तसेच नियमानुसार देण्यात येणारे भत्ते देऊन दि.०७/००८/२००९ पासून संस्थान आस्थापनेवर घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.८७२** **सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा. संस्थानचे नवीन आकृतीबंधानुसार याबाबत एकत्रित सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.७५** **श्री गणेश रत्नाकर कोराटे, क.अभियंता यांना वेतनश्रेणी देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री गणेश रत्नाकर कोराटे, कनिष्ठ-अभियंता बांधकाम विभाग यांनी दि.३०/०९/२००९ रोजी अर्ज करुन त्यात- "माझी जा.नं.एसएसएस/वशी-०१/२०९५/२००३ दि.३०/०८/२००३ अन्वये वडीलांचे जागेवर अनुकंपा तत्वावर

वर्ग-०४ चे पदावर नेमणूक करण्यात आली होती. नेमणूकीच्या वेळी मी स्थापत्य अभियात्रकीचे पदवीचे शिक्षण घेत होतो. माझे पदवी पर्यतेचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर माझी बदली बांधकाम विभगाकडे करण्यात येऊन मला कनिष्ठ-अभियंता हे पदनाम देऊन आहे त्याच वर्ग-०४ ची वेतनश्रेणी नुसार एकत्रित वेतन रु.९०००/- देण्यात आले. सदर आदेशात इतर कंत्राटी कर्मचा-यांना महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळालेनंतर कनिष्ठ अभियंता या पदाची वेतनश्रेणी देण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे. तरी मला कनिष्ठ-अभियंता या पदाची वेतनश्रेणी मिळावी" अशी विनंती केली आहे. सदर अर्जावर श्री. कोराटे यांचे काम समाधानकारक आहे. त्यांना कनिष्ठ-अभियंता या पदाची वेतनश्रेणी देणेस शिफारस आहे. असे अभिप्राय दिले आहेत.

श्री. गणेश रत्नाकर कोराटे यांची, वर्ग-०४ चे पदावर अनुकंपातत्वार नेमणूक करण्यात आलेली असून नेमणूकीच्या वेळी त्यांचे स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण चालू होते. त्यांचे सदरचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांची बांधकाम विभागाकडे बदली करण्यात आली.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार त्यांची शैक्षणिक पात्रता व ते करत असलेले कामानुसार त्यांना बांधकाम विभागाकडे "कनिष्ठ-अभियंता" या पदावर नेमणूक देण्यात येऊन वर्ग-०४ चे वेतनश्रेणी रु.२५५०-३२०० मध्ये वैयक्तीक वेतन देऊन एकत्रित वेतन रु.७०००/- देण्यात आले. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२००७ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार त्यांना वर्ग-०४ चे वेतनश्रेणी मध्ये एकत्रित वेतन रु.७०००/- ऐवजी रु.९०००/- करण्यात आले. तसेच सदर नेमणूक आदेशामध्ये महाराष्ट्र शासनाकडून कंत्राटी कामगारांच्या नेमणूकीस मान्यता मिळालेनंतर इतर कनिष्ठ-अभियंत्याप्रमाणे वेतनश्रेणी देण्यात यावी असे नमूद करण्यात आले आहे.

आता, शासन निर्णय क्र.सासंवि- २००९/ ४३३/ (३७/०९) का सोळा मंत्रालय मुंबई दि.०७/०८/२००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे.

सदर शासन मान्य आकृतीबंधामध्ये कनिष्ठ-अभियंता या हुद्दाची एकूण-१३ पदे दर्शविण्यात आलेली आहेत सदर पदाची वेतनश्रेणी रु.५५००-९००० (सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन बॅन्ड रु. ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु. ४३००) अशी दर्शविण्यात आलेली असून खालीलप्रमाणे पात्रता आवश्यक आहे.

०१) Age not more than २८ Years. ०२) D.C.E / B.E. Civil from any recognized university ०३) MS-CIT or Govt. prescribed equivalent computer operating course ०४) Experience of ५ yrs in Government or Local Body or in a reputed Engineering.

०१) उपरोक्त नमूद केलेली शैक्षणिक पात्रता श्री. कोराटे यांचेकडे आहे.

०२) श्री. गणेश कोराटे यांनी B.E. Civil माहे मे २००५ मध्ये उत्तीर्ण केलेले आहे. व ते दि.२१/०९/२००५ पासून आतापावेतो बांधकाम विभागाकडे कनिष्ठ अभियंत्याचे काम करीत आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार श्री. गणेश रत्नाकर कोराटे, यांना उपरोक्त आदेशान्वये कनिष्ठ-अभियंता पदनाम देण्यात आलेले असून सदर आदेशात नमूद केल्याप्रमाणे आकृतीबंधात मान्यता मिळालेली असल्याने त्यांना सदर पदाची वेतनश्रेणी रु.५५००-९००० (सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन बॅन्ड रु. ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु. ४३००) शासन निर्णयाचे तारखेपासून (दि.०७/०८/२००९) देणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८७३** **संस्थान आस्थापनेवर रिक्त असलेले अभियंत्याची पदे तसेच श्री कोराटे यांचेप्रमाणे संस्थानमध्ये कंत्राटी पध्दतीने काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची एकत्रित माहिती व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा विषय नं.०१** **डॉक्युमेंटरी फिल्म तयार करणेकामी प्राप्त झालेले दरपत्रके उघडणेबाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५.०९.२००९ रोजीचे उपसमिती सभेत झालेल्या चर्चेनूसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) ची डॉक्युमेंटरी फिल्म बनविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देवून या श्रेत्रातील विविध कंपन्यांकडून दरपत्रके मागविण्यात आलेली आहेत. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कंपनीचे नाव | आवक नंबर | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | विस्टास डिजीटल मिडीया लिमिटेड, मुंबई | ३११११ | ०६.१०.२००९ | पत्राव्दारे (उघडलेल्या अवस्थेत प्राप्त) |
| ०२ | साईनाथ कम्युनिकेशन, मुंबई | ३१४७८ | ०९.१०.२००९ | |
| ०३ | सेन्स इंडिया फाऊंडेशन, मुंबई | ३१६७२ | १२.१०.२००९ | |
| ०४ | श्री.सत्यप्रकाश दुबे, मुंबई | ३१७१८ | १३.१०.२००९ | |
| ०५ | सागर एड्टेनमेंट, कोल्हापूर | ३१७१९ | १३.१०.२००९ | |
| ०६ | ए पी कम्युनिकेशन, पुणे | ३१७९५ | १४.१०.२००९ | |
| ०७ | इंडियन आर्ट सर्व्हीसेस, मुंबई | ३१८८९ | १५.१०.२००९ | |
| ०८ | अंतरंग थिएटर्स, मुंबई | ३१८९० | १५.१०.२००९ | |
| ०९ | फिल्ममेकर्स, मुंबई | ३१८९१ | १५.१०.२००९ | |
| १० | मे.रॅन्सम ॲडव्हरटायझिंग, मुंबई | ३१८९२ | १५.१०.२००९ | |
| ११ | श्री.देवेंद्र सुपेकर, मुंबई | ३१८९३ | १५.१०.२००९ | |
| १२ | आर्या प्रोडक्शनस्, | ३१८९४ | १५.१०.२००९ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | पद्मश्री प्रोडक्शन्स् (प्रा.) लिमिटेड, पुणे | ३१८९५ | १५.१०.२००९ | |
| १४ | फोटो हायटेक इंटरनॅशनल, मुंबई | ३२१३९ | १६.१०.२००९ | ई-मेलव्दारे दिनांक १५.१०.२००९ रोजी प्राप्त |
| १५ | तृप्ती मुव्हीज, मुंबई | ३२१४० | १६.१०.२००९ | ई-मेलव्दारे दिनांक १५.१०.२००९ रोजी प्राप्त |

**विहीत मुदतीत प्राप्त न झालेले दरपत्रके :-**

| अ.नं. | कंपनीचे नाव | आवक नंबर | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | परपल फिल्म्स्, मुंबई | ३३३८४ | २४.१०.२००९ | |

उपरोक्तप्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेले सिलबंद दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कंपनीचे नाव | निविदेत देऊ केले दर |
|---|---|---|
| ०१ | विस्टास डिजीटल मिडीया लिमिटेड, मुंबई | मोफत |
| ०२ | साईनाथ कम्युनिकेशन, मुंबई | ६,४३,०००.०० + टॅक्स<br>निवेदकाचे मानधन व ध्वनीमुद्रकाचा खर्च वेगळा |
| ०३ | सेन्स इंडिया फाऊंडेशन, मुंबई | २४,५०,०००.०० + टॅक्स |
| ०४ | श्री.सत्यप्रकाश दुबे, मुंबई | ११,२०,०००.०० + टॅक्स |
| ०५ | सागर एडुटेनमेंट, कोल्हापूर | ६,८४,४००.०० + टॅक्स |
| ०६ | ए पी कम्युनिकेशन, पुणे | HDV-२५,३६,९००.००+ टॅक्स<br>D.G.Beta -३५,२९,६००.०० |
| ०७ | इंडियन आर्ट सर्व्हीसेस, मुंबई | १८,००,०००.०० + १०.३० टक्के सर्व्हीस टॅक्स |
| ०८ | अंतरंग थिएटर्स्, मुंबई | ७,७०,०००.०० + टॅक्स |
| ०९ | फिल्ममेकर्स, मुंबई | ५,४९,०००.०० + टॅक्स |
| १० | मे.रॅन्सम ॲडव्हरटायझिंग, मुंबई | D.G.Beta ४२,३२,०००.०० + टॅक्स |
| ११ | श्री.देवेंद्र सुपेकर, मुंबई | ५,००,०००.०० + टॅक्स |
| १२ | आर्या प्रोडक्शनस्, | D.G.Beta १७,८८,२५०.०० + टॅक्स |
| १३ | पद्मश्री प्रोडक्शन्स् (प्रा.) लिमिटेड, पुणे | ८,९५,०००.०० + टॅक्स |
| १४ | फोटो हायटेक इंटरनॅशनल, मुंबई | १४,७६,०००. + टॅक्स (इ -मेलव्दारे प्राप्त ) |
| १५ | तृप्ती मुव्हीज, मुंबई | मोफत व प्रसाद म्हणून रुपये १/- (ई-मेलव्दारे प्राप्त) |

**निर्णय क्र.८७४** **चर्चा/वाटाघाटीस उपस्थित असलेल्या उपरोक्त सर्व दरपत्रकधारकांना सभेत समक्ष बोलाविण्यात येऊन, टेक्नीकल स्पेसिफिकेशन्स व मुद्दे तयार करुन आपणास पाठविण्यात येतील त्यानुसार सुधारित दर भरुन पाठविण्यात यावे असे सांगण्यात आले.**

**तसेच दरपत्रकधारकांना डॉक्यूमेंटरी तयार करणेकामी द्यावयाचे टेक्नीकल स्पेसिफिकेशन्स व मुद्द मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी निश्चित करावे . तसेच याकामी शैक्षणिक संकुलाकडील संगित मार्गदर्शक श्री सुधांशु लोकेगांवकर यांची मदत घेण्यात यावी व प्रथम डॉक्यूमेंटरी स्क्रिप्ट तयार करण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी )

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्री साई प्रसादालयाकरीता सूचना व माहिती फलक बनविणेकामी आलेले कोटेशन्स उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयास ISO ९००१चे मानांकन प्राप्त करणेसाठी नियुक्त केलेल्या सल्लागाराचे सुचनेनुसार साईभक्तांना व कर्मचा-यांना सुचना व माहीती फलकाची प्रभावीपणे माहीती समजावी म्हणून आकर्षक, सुशोभित व बोध चिन्हासह बोर्ड बनविणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.१७/०५/२००९ चे सभेतील निर्णय क्र.४९३ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०९/२००९ चे सभेतील निर्णय क्र.७३१/१० व प्रसादालयाकडील दि.१६/१०/०९ व ३०/१०/०९ चे टिपणीनुसार कोटेशन्स बोलविणेत आलेले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | ॲडव्हयू ॲडर्व्हरटायझींग प्रा.लि., नासिक. | ०२ | इम्पॅक्ट ॲडर्व्हटायझींग प्रा.लि., नासिक. |
| ०३ | व्हॅनगार्ड ग्राफीक्स, मुंबई. | ०४ | डॉट टू डॉट प्रिंटर्स, नासिक. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आले असता कोटेशन्सधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | कोटेशन्समध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | ॲडव्हयू ॲडर्व्हरटायझींग प्रा.लि., नासिक. | ४,९९,२२६.०० |
| ०२ | इम्पॅक्ट ॲडर्व्हटायझींग प्रा.लि., नासिक. | ७,५३,२०६.०० |
| ०३ | व्हॅनगार्ड ग्राफीक्स, मुंबई. | ८,०२,८९३.०० |
| ०४ | डॉट टू डॉट प्रिंटर्स, नासिक. | ६,९९,९१८.०० |

**निर्णय क्र.८७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन ॲडव्हयू ॲडर्व्हरटायझींग प्रा.लि., नासिक. यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना श्री साई प्रसादालयाकरीता सूचना व माहिती फलक बनविणेकामी कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **साईआश्रम इमारतीमध्ये लिफ्ट बसविणेकामी प्राप्त झालेल्या टेंडरमधील कमर्शिअल बीडस उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत**

**प्रस्ताव-** साईआश्रम इमारतीचे काम शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई (तामिळनाडू) यांचेमार्फत चालू आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २२-०९-२००७ चे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र.२३ निर्णय क्र.७६८ अन्वये साईआश्रम प्रकल्पचे बांधकाम सुरु झालेनंतर नियोजित सर्व इमारतींमध्ये लिफ्ट (Lift) बसविणेसाठी विद्युत विभागामार्फत कार्यवाही सुरु करण्यात यावी असे ठरले आहे.

यापूर्वी साईआश्रम इमारतींमध्ये लिफ्ट बसविणेकामी प्राप्त झालेल्या टेंडर्समधील कमर्शिअल बीडस् मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०५-०४-२००९ चे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलाविण्यात आले असता त्यांनी - १) मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे., (२) मे.कोने ईलेव्हेटर इंडिया प्रा.लि., पुणे या दोघांच्या दरात बरीच तफावत असल्याने यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०५-०४-२००९ चे सभेत सविस्तर चर्चा झाली व विषय क्र.०५ निर्णय क्र.३२१ अन्वये, लिफ्ट खरेदीकामी फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे ठरले व त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दिनांक ०६-०८-२००९ ते दिनांक २६-०८-२००९ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक ०२-०९-२००९ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार मुदतीत ०३ टेंडर व मुदतीनंतर ०२ टेंडर असे एकुण ०५ टेंडर प्राप्त झाले आहे. प्राप्त झालेल्या टेंडरसचा तपशील खालीलप्रमाणे :-

**अ) मुदतीत प्राप्त झालेले टेंडर :-**

| अ.नं. | पार्टीचे नांव | आ.क्र. व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.थायसेनकृप ईलेव्हेटर (इंडिया) प्रा.लि., पुणे. | २७६६९ / ०१-०९-२००९ | १). टेक्नीकल बीड बंद पाकीट. २). कमर्शिअल बीड बंद पाकीट ३). ई.एम.डी. बंद पाकीट |
| २ | मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे. | २७७८२ / ०२-०९-२००९ | १). टेक्नीकल बीड बंद पाकीट. २). कमर्शिअल बीड बंद पाकीट ३). ई.एम.डी. बंद पाकीट |
| ३ | मे.ओमेगा ईलेव्हेटर, अहमदाबाद प्रा.लि., पुणे. | २७७८३ / ०२-०९-२००९ | १). टेक्नीकल बीड बंद पाकीट. २). कमर्शिअल बीड बंद पाकीट ३). ई.एम.डी. बंद पाकीट |
| **ब)** | **मुदतीनंतर प्राप्त झालेले टेंडर :-** | | |
| ४ | मे.कोने ईलेव्हेटर इंडिया प्रा.लि., पुणे. | २८११२ / ०५-०९-२००९ | १). टेक्नीकल बीड बंद पाकीट. २). कमर्शिअल बीड व त्यात ई.एम.डी. असलेबाबत बंद पाकीटावर उल्लेख |
| ५ | मे.ओटीस ईलेव्हेटर कंपनी (इंडिया) लिमिटेड, मुंबई | २८३२९ / ०८-०९-२००९ | ०१ टेंडर बंद पाकीट |

उपरोक्तप्रमाणे आलेली टेंडरमधील टेक्नीकल बीडस् उघडून ती संस्थान कन्सल्टंट, डी.ओ.निकम, पुणे यांचेकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आली होती. त्यांनी अभिप्राय दिला असून तो पुढीलप्रमाणे :-

| अ. नं. | तपशील | ओटीस | कोने | जॉन्सन |
|---|---|---|---|---|
| १) | टाईप | प्रवासी लिफ्ट | प्रवासी लिफ्ट | प्रवासी लिफ्ट |
| २) | वहन क्षमता | 13 प्रवासी | 13 प्रवासी | 16 प्रवासी |
| ३) | वेग | 1.00 मिटर / सेकंद | 1.00 मिटर / सेकंद | 1.00 मिटर / सेकंद |
| ४) | कार प्लॅटफॉर्म | 1200 x 2150 | 1100 x 2400 | 1100 x 4400 |
| ५) | कार फ्लोअरींग | पी.व्ही.सी. | Antiskid पी.व्ही.सी. | पी.व्ही.सी. |
| ६) | हेड रुम | Not Mentioned | 4800 MM | 4300 MM |
| ७) | ड्राईव्ह | Not Mentioned | V3F | मायक्रोप्रोसेसर बेस्ड V3F |
| ८) | डिलिव्हरी | 12 महिने | 12 महिने | 12 महिने |
| ९) | टॅक्सेस | देऊ केलेल्या किंमतीमध्ये समाविष्ट | देऊ केलेल्या किंमतीमध्ये समाविष्ट | देऊ केलेल्या किंमतीमध्ये समाविष्ट |
| १०) | वॉरंटी | 12 महिने | 12 महिने | 12 महिने |
| ११) | एएमसी | 12 महिने फ्री मेन्टेनन्स | 12 महिने फ्री मेन्टेनन्स | 12 महिने फ्री मेन्टेनन्स |

(१). अ) मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे., (ब) मे.कोने ईलेव्हेटर इंडिया प्रा.लि., पुणे. (क) मे.ओटीस ईलेव्हेटर कंपनी (इंडिया) लिमिटेड, मुंबई या कंपन्यांचे टेक्नीकल स्पेसिफिकेशन सारखेच आहेत.

(२) टेंडरमधील ॲप्रुव्हड कंपन्या उपरोक्त तीन (जॉनसन, कोने, ओटीस ) या असून मे. थायसेनकृप व मे. ओमेगा या टेंडरमध्ये ॲप्रुव्हड कंपन्या नाहीत परंतू त्यांनी टेंडर भरलेले आहे.

(३). सर्वांनी काम करण्यासाठी बारा महिन्यांची (एक वर्षाची मुदत ) मागितली आहे.

(४) टेंडरमधील ॲप्रुव्हड कंपन्यापैकी मुदतीत फक्त मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे.यांचे टेंडर प्राप्त झाले असून यासोबत मुदतीत मे. थायसेनकृप व मे. ओमेगा या कंपन्यांचे टेंडर प्राप्त झाले आहे.

(५) टेंडरमधील ॲप्रुव्हड कंपन्यापैकी मुदतीनंतर मे.कोने ईलेव्हेटर इंडिया प्रा.लि., पुणे. व मे.ओटीस ईलेव्हेटर कंपनी (इंडिया) लिमिटेड, मुंबई या कंपन्यांचे टेंडर प्राप्त झाले आहे.

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम इमारतींमध्ये २० लिफ्ट (Lift) बसविणेकामी प्राप्त झालेल्या टेंडर्समधील कमर्शिअल बीडस् आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता टेंडरधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.थायसेनकृप ईलेव्हेटर (इंडिया) प्रा.लि., पुणे. | २,४४,१६,५४०/- | अपात्र |
| ०२ | मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे. | ३,१६,४०,०००/- | २,६०,००,०००/- |
| ०३ | मे.ओमेगा ईलेव्हेटर, अहमदाबाद प्रा.लि., पुणे. | २,४७,११,८३४/- | अपात्र |
| ०४ | मे.कोने ईलेव्हेटर इंडिया प्रा.लि., पुणे. | ३,९९,७२,०००/- | ३,६९,७४,१००/- |
| ०५ | मे.ओटीस ईलेव्हेटर कंपनी (इंडिया) लिमिटेड, मुंबई | ३,६३,८०,०००/- | २,७५,००,०००/- |

**निर्णय क्र.८७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन मे.जॉनसन लिफ्टस् प्रा.लि., पुणे. यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४** **नवीन भक्तनिवासस्थान येथील कारंजाच्या गोलाकार हौदाच्या सभोवताली सुशोभित ग्रील करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.८७७** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५** **साईबाबा भक्तनिवासस्थान प्रवेशव्दारालगत बसथांब्याच्या जवळील सिमेंट बाकड्याजवळ स्टेनलेस स्टील रेलींग तयार करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.८७८** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६** **शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पाअंतर्गत भूसंपादन कार्यवाहीसाठी रक्कम आदा करणे बाबत**

**निर्णय क्र.८७९** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७** **श्री क्षेत्र पंढरपूर येथे वारकरी निवासस्थान उभारणेबाबत**

**निर्णय क्र.८८०** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८** **मौजे निमगांव कोऱ्हाळे, ता.राहाता येथील गट नंबर २१७ क्षेत्र ०० हे ८९ आर (पोटखराब्यासह ) खरेदी बाबत**

**निर्णय क्र.८८१** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९** **नगर-मनमाड रस्ता (लांबी १६०५ मी.) फूटपाथ कर्बस्टोन व मेडीयनला रंग देणे बाबत**

**निर्णय क्र.८८२** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१०** **शिर्डी येथील नियोजित बसस्थानक बांधकाम प्रकल्पासाठी आर्किटेक्चरल सेवा पुरविणेकामी काबरे चौधरी आर्किटेक्टस, नाशिक यांची फी ठरविणे बाबत**

**निर्णय क्र.८८३** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११** **श्रींना अर्पण केलेले नारळ यांची विल्हेवाट लावणेबाबत आलेल्या कोटेशन्सबाबत.**

**प्रस्ताव-** व्दारकामाई, समाधीमंदिर बाहेरील काऊंटर,गुरुस्थान या ठिकाणी साईभक्त श्रीफळ अर्पण करतात. सदर नारळ आपण गोळा करुन नारळ स्टॉल या ठिकाणी स्टॉक करण्यात येतो.व गरजे प्रमाणे वापरतो.

**अ)** मंदिर परिसरात सारंमजामे बागेत 'श्रींना 'अर्पण केलेले श्रीफळ एका खोलीत (काऊंटरला) जमा करण्यात येतात. साईभक्त या काऊंटरला नारळ जमा करतात. जमा झालेले नारळ बगीचा विभागातील कर्मचाऱ्यांमार्फत पोत्यात भरुन सदरची पोते नारळ जमा करण्याच्या काऊंटरच्या पाठीमागील स्टोअर मध्ये जमा करतात व तेथून दररोज प्रसादालय विभागासाठी लागणारे ओले खोंबरे (नारळ फोडुन खोंबरे काढुन) प्रसादालय विभाग येथे पोहच करतात. दररोज अंदाजे १०० कि ग्रॅ ओले खोबरे पोहच करण्यात येते. १०० कि ग्रॅ ओले खोबरे देणेसाठी अंदाजे ८-९ पोते नारळ फोडावे लागतात. तसेच प्रसादालयात बनविण्यात येणाऱ्या बर्फीसाठी नारळ या ठिकाणाहुन नेण्यात येतात.

**ब)** नारळ फोडण्याच्या कांऊटरला पुर्वी साईभक्तांना नारळ जमा केलेनंतर ते नारळ फोडुन त्यांचे दोन भाग करुन एक भाग साईभक्तांना व दुसरा भाग आपल्याकडे ठेवण्यात येत होता. आत्ता या ठिकाणी साईभक्त संपुर्ण नारळ जमा करतात यामुळे नारळ जमा होण्याचे प्रमाणे वाढलेले आहे. नारळ फळांचा मोठया प्रमाणात स्टॉक झालेला आहे. सदरची नारळ स्टोअरमध्ये जागे अभावी पोत्यात न भरता रिकामी टाकुन साठवण केलेली आहे.

जमा होणा-या नारळांच्या प्रमाणात दररोज वापरण्यात येणाऱ्या नारळांचे प्रमाण फारच कमी आहे. दररोज ओल खोबरे काढणे ,सत्यनारायण पुजेसाठी नारळ देणे व बर्फीतयार करण्यासाठी नारळ पोते देण्यात येतात.परंतु सध्या प्रसादालयात बर्फी ऐवजी गोड शेवया चा वापर करण्यात येत असल्याने बर्फीसाठी लागणारे नारळ यांचे प्रमाण कमी झालेले आहे.

**क)** जमा होणाऱ्या नारळपेक्षा वापरल्या जाणाऱ्या नारळांचे प्रमाण फारच कमी असल्याने सुमारे ५०० पोते नारळ फळांचा स्टॉक शिल्लक आहे.जमा झालेले नारळ फळे उपयोगात आपण्याचे दृष्टीने अथवा विल्हेवाट लावणेकरिता वर्तमान पत्रात दिनांक २१/०९/२००९.( लोकमत) मध्ये जाहीरात देवुन सिलबंद दरपत्रक मागविण्यात आलेली होती.परंतु याकामी ०१ सिलबंद दरपत्रक श्री.आदिनाथ पंढरीनाथ बानकर,शनि शिंगणापुर. आवक नं (३०५९२) प्राप्त झालेले आहे.

नारळ फळे खुप दिवसाची साठलेली आसल्याने ती खराब होऊन फेकुन दयावी लागतील या शंकेपोटी सदरहु प्राप्त झालेले सिलबंद दरपत्रक दिनांक २६/१०/०९ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले आहे. श्री.आदिनाथ पंढरीनाथ बानकर,शनि शिंगणापुर.यांनी नारळासाठी रु.१७५/-( रु.एकशे पंच्याहत्तर) मात्र प्रति शेकडा असा दर दिलेला आहे.

**निर्णय क्र.८८४** **आजचे सभेत श्री.आदिनाथ पंढरीनाथ बानकर,शनि शिंगणापुर हे उपस्थित होते. त्यांचीशी चर्चा केली असता त्यांनी देऊ केलेल्या दरात वाढ करुन रु.१९०/-( रु.एकशे नव्वद) मात्र प्रति शेकडा असा दर देऊ केला.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.आदिनाथ पंढरीनाथ बानकर, शनि शिंगणापुर यांनी देऊ केलेले रु.१९०/-मात्र प्रति शेकडा दर दिनांक ०९.११.२००९ पासून एक वर्षाकरीता आकारुन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१२** **श्री दत्त जयंती निमित्त फुलांची सजावट देणगी करुन घेणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री.सी.राजेंद्र डंग, नवी दिल्ली यांनी कळविले आहे की, या वर्षी मंगळवार दि.०१.१२.२००९ रोजी होणाऱ्या श्री दत्तजयंतीला फुलांचली सजावटीचे काम करण्याची परवानगी मिळावी, अशी विनंती केलेली आहे. श्री गुरुपौर्णिमा उत्सवाला के.सी. सुब्रामनी राजु, बंगलोर यांचेकडून सजावट केलेली आहे. संत कृष्णदास सेवा समिती ट्रस्ट, मुंबई यांनी दसरा उत्सव करिता फुलांची सजावट केलेली आहे व दिवाळी (लक्ष्मीपुजन) या निमित्ताने श्री.रविंद्र तलवार, नवी दिल्ली यांनी मंदिर व मंदिर परिसर सजावट केलेली आहे.

मंदिर व मंदिर परिसरात फुलांच्या सजावटीचे काम प्रत्येक उत्सवाला आपण देणगी किंवा संस्थान मार्फत करुन घेण्यात येते. या वर्षी श्री दत्त जयंतीला फुलांची सजावट श्री. राजेंद्र डंग, नवी दिल्ली यांनी केलेली होती.

**निर्णय क्र.८८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंगळवार दि.०१.१२.२००९ रोजी होणाऱ्या श्री दत्तजयंतीला फुलांचे सजावटीचे काम श्री.सी.राजेंद्र डंग, नवी दिल्ली यांचेकडून देणगीदाखल करुन घेण्यात यावे असे ठरले.** **(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१३** **पांगरी येथील विसावा थांब्याकरीता जनरेटर खरेदी करणे बाबत**
**निर्णय क्र.८८६** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१४** **श्री हनुमान मंदिराचे वायरींग कामास व येणाऱ्या खर्चास मंजूरी मिळणे बाबत**
**निर्णय क्र.८८७** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **मनोजकुमार गोस्वामी पथावरील स्ट्रीट लाईट दुरुस्तीचे कामास व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणे बाबत**
**निर्णय क्र.८८८** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१६** **जीवनदायी योजनेअंतर्गत थकित अनुदानाबाबत**
**निर्णय क्र.८८९** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१७** **श्री सुनिल प्रल्हाद वाळुंज रा.देवळाली प्रवरा यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत**
**निर्णय क्र.८९०** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१८** **Kidney Stone या आजारावर मोफत शिबीराचे आयोजनाबाबत**
**निर्णय क्र.८९१** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१९** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाच्या जमाखर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत**
**निर्णय क्र.८९२** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२०** **श्री साईबाबा हॉस्पिटलचे विविध मशिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणे बाबत**
**निर्णय क्र.८९३** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२१** **श्री साईनाथ हॉस्पिटलचे विविध मशिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणे बाबत.**
**निर्णय क्र.८९४** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२२** **बेडशिट खरेदी करणे बाबत**

चौकशी व निवासस्थान विभागामार्फत साईभक्तांची व मान्यवरांची तात्पुरती निवासव्यवस्था खालील इमारतीमधून करण्यात येते. साईप्रसाद नं.०१ व ०२, साईउद्यान, समर्पण, सेवाधाम या इमारतीमध्ये वापरात येणारे बेडशीट दि.२०.०२.२००७ रोजी सारडा इंटेरियर, अहमदनगर यांचेकडून बॉम्बे डाईंग कंपनीचे कापड खरेदी करुन बेडशीट बनविणेत आलेले होते. सदरचे बेडशीट दैनंदिन वापराने रंग गेलेला आहे व खराब झालेले आहेत.

सदर इमारतीमध्ये वापराकरीता नवीन बेडशीट तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. इमारतीप्रमाणे कॉट संख्या व बेड संख्या खालीलप्रमाणे-

| अ.नं. A | इमारतीचे नाव B | रुम संख्या C | प्रत्येक रुममधील कॉट D | एकुण कॉट E (C X D) | अंदाजे प्रति रुम जादा बेड F | एकुण बेड G (E + F) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | साईप्रसाद नं.०१ | ६४ | ०२ | १२८ | ६४ X ०८ = ५१२ | ६४० |
| २ | साईप्रसाद नं.०१ | २१ | ०२ | ४२ | २१ X ०४ = ८४ | १२६ |
| ३ | साईप्रसाद नं.०२ | ५४ | ०२ | १०८ | ५४X ०३ = १६२ | २७० |
| ४ | साईप्रसाद नं.०२ | १८ | ०३ | ५४ | १८ X ०५ = ९० | १४४ |
| ५ | साईप्रसाद नं.०२ | ०६ | ०६ | ३६ | ०६ X ०५ = ३० | ९६ |
| ६ | शांतिनिकेतन | ११ | ०२ | २२ | ११ X ०२ = २२ | ४४ |
| ७ | शांतिनिकेतन | ०४ | ०१ | ०४ | ०४ X ०५ = २० | २४ |
| ८ | साईउद्यान | १६ | ०२ | ३२ | १६ X ०३ = ४८ | ८० |
| ९ | साईउद्यान | २० | ०२ | ४० | २० X ०८ = १६० | २०० |
| १० | समर्पण | ०२ | ०३ | ०६ | ०२ X ०३ = ०६ | १२ |
| ११ | सेवाधाम | ६० | ०१ | ६० | ६० X ०२ = १२० | १८० |
| | | | | | एकूण- | १८१६ |

तरी सर्व इमारती मिळून एका वेळेस १८१६ बेडशीट आवश्यकता आहे. याप्रमाणे तिन संच बेडशीट खरेदी करणे आवश्यक आहे. १८१६ बेडशीट X ३ संच = एकूण ५४४८ बेडशीट म्हणजे अंदाजे ५५००बेडशीट खरेदी करावे लागतील.

| अ.नं. | तपशील | एकुण खरेदी नग | अंदाजे प्रति नग किंमत | अंदाजे एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | कॉटन बेडशीट जाड दोन रंगात नामांकित कंपनी पुलगम, | ५५०० | २५०/- | १३,७५,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सोलापुर अथवा इतर साईज ६० x ९० इंच | | | |

तरी वरीलप्रमाणे नामांकित कंपनीचे बेडशीट खरेदी करीता मा.विश्वस्त यांचे समवेत प्रत्यक्ष पाहणी करुन कोटेशन पध्दतीने खरेदी करणेस व येणाऱ्या अंदाजे रु.१३,७५,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, चौकशी व निवासस्थान विभागासाठी आवश्यक असणारे बेडशिट खरेदीकामी स्थानिक विश्वस्तांनी सोलापूर येथे जाऊन समक्ष पहाणी करुन खरेदी करण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-चौकशी व निवासस्थान विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२३** **साईनिवास अतिथीगृहाकरीता बेडशिट व उशी कव्हर खरेदी करणे बाबत.**

वरील विषयास अनुसरुन कळविणेत येते कि, साईनिवास अतिथीगृह येथे मा. विश्वस्त, पाहुणे, तसेच मा. मंत्री महोदय मान्यवर सरकारी अधिकारी थांबतात त्यांना निवासाकरीता आपले संस्थानचे साईनिवास अतिथीगृह येथे रुम देण्यात येतात. या इमारती मध्ये २४ रुम आहेत. या रूमकरीता वापरात असणारे बेडशिट व उशी कव्हर दैनंदिन वापराने खराब झालेले आहेत. सदरचे बेडशिट व उशी कव्हर दि.१७.१२.२००७ रोजी बांठीया एंटप्रायजेस, पुणे यांचे कडुन सिंगल बेडशिट उशी कव्हर सह १०० नग व डबल बेडशिट उशी कव्हर सह १४० नग खरेदी करणेत आलेले होते.

सदरचे बेडशिट दोन वर्षा पासून वापरात आहेत. सदरच्या बेडशिटचा रंग गेलेला आहे व पातळ जिर्ण झ ाालेले आहे. त्यामुळे येथे वापरणे करीता नवीन बेडशिट व उशी कव्हर तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. साईनिवास अतिथीगृह या इमारती मधील

डबल व सिंगल कॉट ची संख्या खालीलप्रमाणे-

| अ.नं. | इमारतीचे नाव | सिंगल बेड | डबल बेड |
|---|---|---|---|
| ०१ | साईनिवास अतिथीगृह | १० खोल्या x ०२ बेड = २० बेड<br>प्रत्येक कॉटला दोन बेड = ४० बेडशीट<br>४० x ३ = १२० | १४ खोल्या x ०१ बेड = १४ बेड<br>प्रत्येक कॉटला दोन बेड = २८ बेडशीट २८ x ३ = ८४ |

या करीता डबल बेड बेडशीट साईज ९० x ९० इंच सिंगल बेड बेडशीट साईज ६० x ९० इंच, उशी कव्हर साईज १८ x २८ इंच या प्रमाणे कायम स्वरुपी वापरा करीता असे तीन संच बेडशीट व उशी कव्हर खरेदी करावे लागतील.

| अ.नं. | वस्तूचे नाव | मागणीचे नग | अंदाजे प्रति नग किंमत | अंदाजे एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | सिंगल बेडशीट बॉम्बे डाईंग<br>प्रकाश कॅन्डी, पुलगम, सोलापूर व इतर | १२० | ३०० | ३६,०००.०० |
| २ | डबल बेडशीट, बॉम्बे डाईंग<br>प्रकाश कॅन्डी, पुलगम, सोलापूर व इतर | १०० | ४५० | ४५,०००.०० |
| ३ | उशी कव्हर, बॉम्बे डाईंग<br>प्रकाश कॅन्डी, पुलगम, सोलापूर व इतर | २०० | १२५ | २५,०००.०० |
| | | | एकूण- | १,०६,०००.०० |

तरी वरील प्रमाणे नामांकित कंपनीचे बेडशीट व उशी कव्हर खरेदी करीता मा. विश्वस्त यांचे समवेत प्रत्यक्ष पाहणी करुन कोटेशन पध्दतीने खरेदी करणेस व येणाऱ्या अंदाजे रु. १,६०,०००/- खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृहाकरीता आवश्यक असणारे बेडशिट व उशी कव्हर खरेदीकामी स्थानिक विश्वस्तांनी सोलापूर येथे जाऊन समक्ष पहाणी करुन खरेदी करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-चौकशी व निवासस्थान विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२४** **व्दारावती निवासस्थान इमारतीमधील रुमचे कुलपांसाठी आलेले स्टील किचन प्लेटचे कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता**

**निर्णय क्र.८९७** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, व्दारावती निवासस्थान)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२५** **व्दारावती इमारतीमधील भक्तांचे निवासी खोल्यांसाठी खुर्च्या खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.८९८** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, व्दारावती निवासस्थान)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२६** **व्दारावती निवासस्थान इमारतीतील रुममधील बाथरुम समोर टर्किश टॉवेल, पायपूसणी ठेवणेबाबत**

**निर्णय क्र.८९९** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, व्दारावती निवासस्थान)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२७** **व्दारावती भक्तनिवासस्थान मधील स्वच्छता /हाऊसकिपींगची कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने देणेकामी निविदा मागविणे बाबत**
**निर्णय क्र.९००** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,व्दारावती निवासस्थान)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२८** **संस्थान निर्मित ऑडीओ/व्हीडीओ सी.डी सवलतीच्या दराने साईभक्तांना विक्रीस उपलब्ध करुन देणे बाबत**
**निर्णय क्र.९०१** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२९** **सन २००९-२०१० वार्षिक जनरल व प्रि-प्रिंटेड स्टेशनरी छपाईबाबत**
**निर्णय क्र.९०२** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३०** **न्युझिलँडमधून गावरान तूप पुरविणेबाबत मे.वेस्ट इंडिया एक्सपोर्ट,नाशिक यांचे पत्राबाबत.**
**निर्णय क्र.९०३** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३१** **मे.सिताराम ट्रेडींग कंपनी, जळगांव यांचे प्रसादालय सन २००९-१० माल पुरवठा सुरक्षा अनामत रक्कम संस्थान जमा करणेबाबत व जादा प्रसादालय खर्चास मान्यता मिळणेबाबत**
**निर्णय क्र.९०४** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३२** **मंदिर विभाग चोपदार/मदतनीस कर्मचारी यांचेसाठी पिवळे रंगाचे सोहळे , पिवळे नेहरुशर्ट,पिवळे टी शर्ट, पिवळा पायजमा खरेदी करणेबाबत**
**निर्णय क्र.९०५** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३३** **मेल्ट्रॉन कंपनीच्या जून्या अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेबाबत**
**निर्णय क्र.९०६** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३४** **संस्थानच्या वेबसाईटवर online Darshan सुविधा सुरु करणे बाबत**
**निर्णय क्र.९०७** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३५** **खराब झालेले मोतीचूर लाडू स्टॉकमधून कमी करणेस मान्यता मिळणेबाबत**
**प्रस्ताव-** साईभक्तांना श्री साईबाबांचा प्रसाद म्हणून घरी घेऊन जाणेसाठी सन १९९३-९४ पासून मोतीचूर लाडू तयार करुन विक्री करणेत येत आहे. सदर मोतीचूर लाडू बनविणेसाठी सन १९९३-१९९४ ते १९९९ पर्यंत व सन २००३ पासून आजपर्यंत श्री माधव गंगाराम नाईकवाडी हे कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करीत आहेत. जुन्या प्रसादालयात काम चालू असतांना लाडू विक्री काऊंटरवर काही दिवस एका बाजूला राहिल्याने लाडू खराब झालेले होते. सदर खराब झालेल्या लाडूची प्रशासकीय मान्यतेने विल्हेवाट लावण्यात आलेली होती.

दिनांक ०१/०९/२००९ पासून नवीन श्री साई प्रसादालयामध्ये लाडू बनविणेचे काम सुरु केलेले आहे तेव्हांपासून साधारणतः १ महिण्यामध्ये प्रत्यक्ष कामाचे दरम्यान लाडू सुकविणेचे हॉलमध्ये नैसर्गिक हवा खेळती न राहिल्यामुळे लाडू सुकणेचे कामात अडचणी येऊ लागल्या. त्यामुळे श्री रोहमारे साहेब , इलेक्ट्रीक इंजिनिअर यांचे समवेत समक्ष पहाणी करुन चर्चेअंती वायुविजनमधील येणारी थंड हवा बंद केली व वायुविजन यंत्रणेमधून नैसर्गिक हवा घेण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणे सदर आलेली हवा खेळती रहावी म्हणून १८ सिलींग फॅन बसवून घेतले. त्यामुळे लाडू सुकविणेचे कामास मदत झाली आहे. लाडू पुर्णपणे सुकलेले आढळले नाहीत.

गर्दीचे वेळी साईभक्तांना पुरेसे लाडू उपलब्ध असावेत म्हणून सुमारे १००-१५० क्विंटल साखरेचे ४,५०,००० ते ६,००,००० पर्यंत लाडू तयार करुन साठयामध्ये ठेवण्याची काळजी घेण्यात येत होती व आहे. त्यानूसार दसरा उत्सवाचे कालावधीत सुमारे १०० क्विंटल साखरेचा साठा तयार करण्यात आलेला होता. मात्र सदर लाडूचा साठा ठेवणेसाठी पुरेसी जागा सध्याचे हॉलमध्ये नसल्यामुळे लाडू किचनचे पश्चिमेस सर्व्हीस पॅसेजमध्ये दसरा उत्सव काळात व नंतर लाडू साठविणेचे काम केले. मात्र ते काम त्रासाचे ठरत असल्यामुळे

तयार झालेले लाडू ५ ,६ ऑक्टोबर पासून ०१ ला माळा बुफे हॉलमध्ये लाडू सुकविणेसाठी टाकण्यास सुरुवात केली. तेथे पुरेसे पंखे असल्यामुळे सुरुवातीस लाडू सुकविणेचे कामास अडचण आली नव्हती मात्र दिनांक १०/१०/२००९ रोजी लाडू किचन व ०१ ला माळा (बुफे हॉल) येथे ठेवलेले लाडू खराब झाले , आंबट वास येऊ लागला तेव्हांपासून लाडूचा साठा मर्यादीत ठेवणेस सुरुवात केली व खराब झालेले लाडू एका बाजूला ठेवले व फ्रेश लाडू एका बाजूला ठेवले होते मात्र तेव्हांपासून काही प्रमाणात सारखे लाडू खराब होऊ लागले. म्हणून दिनांक १५/१०/२००९ पासून बुफे हॉलमध्येही लाडू ठेवणेचे बंद करुन ०१ ला माळा ( उत्तरेकडील मोठा हॉल) भोजन हॉलमध्ये सुकविणेसाठी ठेवणेस सुरुवात केली तरीही दिनांक १६/१०/२००९ रोजी तेथील काही लाडू खराब झाल्याचे आढळून आले.

दि.१०/१०/२००९ ते १६/१०/२००९ अखेर पावेतो खराब झालेल्या लाडूची संख्या अंदाजे ४०.२९ क्विंटल साखरेचे १,८१,२९१ नग आहेत. त्यामुळे आम्ही प्रसादालयातील सर्व पर्यवेक्षकीय कर्मचारी वृंद व लाडू ठेकेदार यांनी पाहुन दिनांक १५/१०/२००९ पर्यंत तयार केलेले लाडू संपूर्ण संपेपर्यंत नवीन लाडू न बनविता, संपूर्ण लाडू संपल्यानंतर लाडू किचन व लाडू साठविण्याचा हॉल व ताडपत्र्या गरम पाण्याने धुऊन काढून नंतर लाडू बनविणेचे काम सुरु केलेले आहे. किचन व हॉलमध्ये, ताडपत्रीवर विषाणू तयार झालेले असल्यास त्यामुळे ते नष्ट होतील असे वाटत होते.

दिनांक १०/१०/२००९ पासून वेगवेगळया पध्दतीने लाडू बनविणे व सुकविणेचे काम करुन पाहिले तरीही ४०.२९ क्विंटल साखरेचे १,८१,२९१ नग लाडू खराब झालेले आहेत. खराब झालेल्या लाडूची १,८१,२९१ ÷ ३ = ६०,४३०.३३ पाकीटे x रु. १०/- = रु. ६,०४,३०३/३० किंमत होत आहे.

वरीलप्रमाणे खराब झालेले लाडू भक्तास खाण्यायोग्य नसलेने लाडू प्रसादालयाकडील दि.१७/१०/२००९ चे प्रस्तावावर मा.अध्यक्ष साहेब यांचे मान्यतेने दि.२३/१०/२००९ रोजी पंचनामा करुन पंचासमक्ष जमिनीमध्ये पुरुन टाकणेत आलेले आहेत.

प्रति वर्षी दिवाळी सुटीनंतर (ऑक्टो./ नोव्हें.) साधारणत: जानेवारी अखेर साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणावर होत असल्याचा अनुभव ब-याच वर्षापासुन आहे. त्यानुसार गर्दीचे कालावधीत गर्दीचे प्रमाणात साईभक्तांना विक्रीसाठी पुरेसे लाडू उपलब्ध असावे म्हणून लाडू बनविण्याचे काम चालू होते. दरवर्षी ज्या-ज्या वेळी गर्दी वाढते त्या-त्या वेळी गर्दीचे प्रमाणानुसार १००-१५० क्विंटल साखरेचे लाडू तयार करुन ठेवण्याची पध्दत यापूर्वीही होती व त्यानुसारच दिवाळी सुटी गर्दीसाठी लाडू साठयामध्ये ठेवण्याचे काम सुरु केले होते. मात्र प्रथम दि.१०/१०/२००९ रोजी लाडू खराब झालेचे आढळून आल्याने कमी प्रमाणात लाडू बनविणेचे काम चालू होते.

सदर ठेकेदार गेल्या १२ वर्षापासून लाडू बनविण्याचे काम करीत आहे. त्यांना मोठया प्रमाणात लाडू व इतर स्वयंपाक बनविण्याचा अनुभव आहे. यापूर्वी त्यांचेकडून कधीही अशा प्रकारचे लाडू खराब झालेले नाहीत.

तरी उपरोक्त प्रमाणे १,८१,२९१ नग लाडू राईट अप करुन स्टॉकमधून वजा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९०८** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे १,८१,२९१ नग लाडू राईट अप करुन स्टॉकमधून वजा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३६** **लाडू पॅकिंग मशिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन १९९३-९४ पासून श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना प्रसाद म्हणून घरी घेऊन जाणेसाठी शुध्द तुपातील मोतीचूर लाडू तयार करुन विक्रीसाठी उपलब्ध करुन देणेत येत आहे. ते काम पूर्वीपासून आऊट सोर्सिंग पध्दतीने कॉन्ट्रॅक्टरकडून करुन घेणेत येत आहे. लाडू प्रसाद विक्री सुरु करतांना गर्दी अतिशय कमी असे. त्यामुळे दैनंदिन सरासरी ३ ते ५ क्विंटल पर्यंत साखरेचे लाडू बनवून विक्री करण्यात येत असत. दिवसेंदिवस साईभक्तांची गर्दी वाढत आहे. त्यामुळे सध्या गर्दीचे प्रमाणात मोतीचूर लाडू विक्रीचे दैनंदिन प्रमाण सुमारे ३० ते ६० क्विंटल साखरेचे लाडूची विक्री होत आहे. त्यामुळे लाडू वळणे, सुकविणे व पॅकींग करणेचे काम जागे अभावी , नैसर्गिक खेळत्या हवेच्या आभावामुळे त्रासदायक होत चालले आहे. सुरुवातीपासून लाडू तयार करणेची क्रिया मनुष्यबळाकरवीच चालू आहे. मात्र भक्तांची गर्दी वाढत चालल्यामुळे ठेकेदारास जास्त कर्मचारी कामासाठी लावावे लागतात. जादा कर्मचा-यामुळे जागेअभावी एकसुत्रीपणा राहत नाही. त्यामुळे कधी-कधी कामाचा दर्जा एकसारखा राखला जात नाही. त्यातच महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषधे प्रशासन विभागाने लाडू पॅकींग प्रक्रिया संपूर्णपणे आरोग्याच्या दृष्टीने हायजेनिक, तसेच स्वयंचलीत मशिनद्वारे करावयाची तसेच लाडू प्रसादाच्या प्रत्येक पाकीटावर बॅच नं., उत्पादन तारीख, प्रसाद लाडूमध्ये असलेले घटक, तसेच वापरावयाचा कालावधी इ. माहिती असणे बंधनकारक असल्याचे तोंडी सुचना दिलेल्या आहेत. तसेच श्री साई प्रसादालय हे गुणवत्ता प्रणालीत सुधारणा करणेसाठी आय.एस.ओ.९००१ प्रमाणित करावयाचे असल्यामुळे, स्वयंचलीत लाडू पॅकींग मशीन खरेदी करणे गरजेचे आहे.

मोतीचूर लाडूची मोठया प्रमाणात होणारी मागणीचा विचार करुन लाडू तयार करणेसाठी (लाडू वळणे, पॅकींग करणे) काही मशिनरी बाजारात उपलब्ध आहेत काय? याबाबत माहीती घेतली असता लाडू वळणेकामी अद्याप मशिन उपलब्ध नसल्याचे आढळून आले. मात्र बेसन लाडू बनविणेचे मशिन उपलब्ध आहे परंतू मोतीचूर लाडू वळणेचे मशिन बाजारात उपलब्ध नाही. ३-४ मशिन उत्पादकांनी मशिन बनविणेचा प्रयत्न केला मात्र मोतीचूर लाडू कळी एकत्र होत नाही असे आढळून आलेले आहे. परंतू लाडू पॅकींगसाठी मशिन मार्केटमध्ये

उपलब्ध आहेत. त्याकामी श्री साईप्रसादालयाकरीता नविन मशिनरी खरेदीसाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द केली होती. मात्र लाडू पॅकींगसाठी दरपत्रक कुणीही भरलेले नव्हते. मात्र त्यानंतर लाडू पॅकींगमशिनबाबत तपास केला असता पुणे , नाशिक , मुंबई येथे पावडर साहित्य वेफर्स वगैरे पॅकींगचे मशिन्स बनविणा-या कंपन्या आहेत. पैकी पुणे व नाशिक येथे त्यांचे वर्कशॉपमध्ये समक्ष पहाणी केलेली आहे. त्यांनी संस्थानसाठी लाडू पॅकींगचे मशिन बनविता येईल असे सांगितले.

लाडू मशिन खरेदी करुन वापरणेत आले तर त्यांचे खालीलप्रमाणे फायदे होतील.

१) सदर मशिनव्दारे लाडू पॅकेटमध्ये नायट्रोज वायू भरणेत येईल. ज्यामुळे लाडूची चव व स्वाद कायम राहून हवेशी संपर्क न आल्यामुळे बायलॉजीकल बॅक्टेरीया तयार होणार नाहीत. त्यामुळे लाडू १ ते १.५ महिना खराब होणार नाही असे संबंधीत पुरवठादाराकडून सांगणेत आले.

२) लाडू पॅकेटवर पॅकींगची तारीख मशिनद्वारे नमूद करता येईल.

३) लाडू किती दिवस खाण्यायोग्य राहील हे मशिनद्वारे नमूद करता येईल.

४) लाडू पॅकींग गर्दीचे प्रमाणात कमी मनुष्यबळात वेगाने होईल.

५) लाडू पॅकींगची प्रक्रिया हायजेनीक असेल.

सदर लाडू पॅकींग मशिनकरीता प्रत्येकी रु. १३ लाखापर्यंत खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार २ मशिनसाठी रुपये २६ लाख खर्च येईल. २ मशिनसाठी जाहिरात प्रसिध्द करता येईल. प्रथमतः १ मशिन खरेदी करता येईल त्या मशिनचे निष्कर्ष चांगला आढळून आल्यास दुसरे मशिन घेता येईल.

तरी लाडू पॅकींगकरीता २ मशिन्स वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या रु.२६,००,०००/- चे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९०९** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे लाडू पॅकींगकरीता २ मशिन्स खरेदीकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या रु.२६,००,०००/- चे अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३७** **प्रसादालयातील कर्मचाऱ्यांना ॲप्रन, हॅण्ड ग्लोज, कॅप्स खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.१७/०५/२००९ चे सभेतील निर्णय क्र.४९३ अन्वये श्री साई प्रसादालयास ISO-९००१ मानांकन प्राप्त करणेसाठी प्रसादालयातील प्रत्येक कायम / कंत्राटी कर्मचा-यास त्याच्या वर्गवारीनुसार युनिफॉर्म, कॅप, मास्क, हॅण्ड ग्लोज, ॲप्रन खरेदी करणेस व त्याकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

श्री साई प्रसादालयामध्ये दररोज सुमारे खालीलप्रमाणे कायम / कंत्राटी कर्मचारी काम करीत असतात.

| | | |
|---|---|---|
| १) | कायम कर्मचारी | २८२ |
| २) | कंत्राटी कर्मचारी | ३०५ |
| ३) | चपाती बनविणारे कर्मचारी | १२५ |
| ४) | लाडू / बर्फी बनविणारे कर्मचारी | १६५ |
| ५) | अन्नपाकीटे बनविणारे कर्मचारी | ७५ |
| | | **९५२** |

वरीलप्रमाणे कर्मचा-यांना दैनंदिन वापरासाठी खालील नमूद केलेप्रमाणे ॲप्रन, हॅण्ड ग्लोज व कॅप्स खरेदी करणे गरजेचे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | एक वर्षासाठी प्रत्येकी २ ॲप्रन प्रमाणे | ९५२ x २ = १९०४ |
| २) | एक वर्षासाठी प्रत्येकी २ कॅप | ९५२ x २ = १९०४ |
| ३) | एक वर्षासाठी प्रत्येकी ६ जोडी हॅण्डग्लोज | ७०० x ६ = ४२०० |

मा.व्यवस्थापन समिती दि.१७/०५/२००९ चे सभेतील निर्णय क्र.३८८ नुसार मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये संस्थान कर्मचा-यांचे गणवेष तयार करण्याचे काम बाठीया एन्टरप्राईजेस, पुणे यांना देणेत आलेले आहे. त्यांचेकडून प्रसादालयाकरीता लागणारे हॅण्डग्लोज ॲप्रन व कॅप्स खरेदी करणे सोईस्कर होईल. त्यांना गणवेषसाठी कापड घेतलेले आहेच त्यामुळे गणवेष प्रमाणे एकसारखे कॅप्स, ॲप्रन, हॅण्डग्लोज त्यांचेकडे सहज उपलब्ध होऊ शकतील त्याकामी बांठीया एन्टरप्राईजेस यांना दर कळविणेस सागितले होते. त्यानुसार त्यांनी दर कळविलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | संख्या | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | ॲप्रन | १९०४ | ७५/- | १,४२,८००.०० |
| ०२. | कॅप्स | १९०४ | ३५/- | ६६,६४०.०० |
| ०३. | हॅण्डग्लोज | ४२०० | ४५/- | १,८९,०००.०० |
| | | | | **३,९८,४४०.००** |
| | | | ४% व्हॅट | १५,९३७.६० |
| | | | एकुण रुपये = | ४,१४,३७७.६० |
| | | | पुर्णांकित रुपये = | **४,१५,३७८.००** |

उपरोक्त प्रमाणे साहित्य खरेदीसाठी रु.४,१५,३७८/- खर्च येणार आहे. प्रसादालयास ISO-००१ मानांकन घेणेसाठी करावयाचे कार्यवाहीस (खर्चास) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०५/२००९ चे सभेतील निर्णय क्र.४९३ नुसार मान्यता मिळालेली आहे. दैनंदिन वापरानंतर उपरोक्त साहित्य खराब झाल्यास, वापरणे

योग्य न राहिल्यास ६ महिन्यानंतर गरजेनुसार जादा साहित्य चर्चेअंती ठरलेल्या दराने घेता येईल. तरी बाठीया यांनी दिलेल्या दराबाबत चर्चा करुन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९१०** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे प्रसादालयातील कर्मचाऱ्यांना ॲप्रन, हॅण्ड ग्लोज, कॅप्स खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३८** **मे.पद्माटेक इंजिनिअर्स, पुणे यांना थर्मिक फ्ल्यूड हिटर प्रकल्प उभारणीस फेर मुदतवाढ देणेबाबत तसेच त्यांचे वाढीव कामाचे बीलाबाबत**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयातील लाडू प्रसाद बुंदी तळण्यासाठी अत्याधुनिक थर्मिक फ्ल्युड यंत्रणा स्टे.स्टील फ्राईंग पॅनसह उभारणीचे काम मा.व्यवस्थापन समितीने दिनांक ०३/०९/२००८ चे सभेतील निर्णय क्रं. ९३६(१) अन्वये मे.पद्माटेक इंजिनिअरींग सिस्टीम्स प्रा.लि., पुणे यांना देण्यात आले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३/०९/२००८ चे सभेतील निर्णयानूसार थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेसाठी उभारावयाचे शेड संस्थानचे विद्युत / बांधकाम विभागामार्फत उभारावयाचे ठरल्यामुळे बांधकाम विभागामार्फत संस्थान नियमाप्रमाणे जाहिरात व निविदा , चर्चा वाटाघाटी या पध्दतीने कॉन्ट्रॅक्टरची निवड होवून त्यांना दिनांक १७/०३/२००९ पर्यंत शेडचे उभारणीच्या कामाची मुदत देणेत आली होती. परंतू कॉन्ट्रॅक्टर यांनी विहीत मुदतीमध्ये काम पुर्ण न केल्याने त्यांना मा.व्यवस्थापन समिती दि.१७/०५/०९ चे सभेतील निर्णय क्रं.४७१ नूसार दि.२०/०५/०९ अखेर मुदतवाढ दिलेली आहे. त्यानंतर ॲल्युमिनिअम खिडकी, कॉंक्रेट फ्लोअरींग, दरवाजे,शटर, इ. कामे बांधकाम विभागामार्फत दि.१५/०७/०९ अखेर पुर्ण करण्यात आलेली आहे.

त्यामुळे थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणा उभारणी कॉन्ट्रॅक्टर मे.पद्माटेक इंजिनिअरींग सिस्टीम्स , पुणे यांना प्रकल्प उभारणीची मुदत दिनांक ०५/११/२००८ पर्यंत देण्यात आलेली होती त्यांनी विहीत मुदतीमध्ये यंत्रणेचा पुरवठा केलेला आहे. परंतू उपरोक्त शेडचे बांधकाम उभारणी अभावी सुमारे नऊ महिने प्रकल्प उभारणीस विलंब झालेला आहे. त्यातच थर्मिक फ्ल्युड हिटींग शेडची जागा बदलल्यामुळे पाईपलाईनची लांबी टेंडरमध्ये नमूद केलेल्या लांबीपेक्षा वाढलेली आहे.

त्यामुळे कॉन्ट्रॅक्टर यांचा जादा खर्च झालेला आहे. प्रकल्प नऊ महिने रखडल्यामुळे मटेरीयल भाववाढीचाही भार कॉन्ट्रॅक्टर यांना सहन करावा लागलेला आहे. त्या अनुषंगाने कॉन्ट्रॅक्टर यांनी पत्र दिले असून पत्रात त्यांनी खालीलप्रमाणे वाढीव किंमतीचे स्पष्टीकरण दिलेले आहे.

1) Change In Pipe Line Length with actual and Contract specified Length.
2) Due To civil Work Delay we have to Visit More than 4 Times Per Months From Last Year.
3) Ms Monorail installation not in our scope of works but it is necessary.
4) Our Investment block from last year.
5) We have to engage in project directly or indirectly for one year.

प्रोजेक्ट उभारणीस उशीर झाल्यामुळे मे. पद्माटेक इंजिनिअर्स, पुणे यांनी पत्रानूसार खालीलप्रमाणे जादा खर्च कळविलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | थर्मिक फ्ल्युड हिटरची रुमची जागा संस्थानने बदलल्यामुळे पाईपलाईन व इतर तदनुषंगिक यंत्रणेच्या मोजमापात बदल होऊन झालेला वाढीव कामाचा वाढीव खर्च | रक्कम रुपये - ३,३५,५०५/- |
| ब) | आय बीम गॅन्ट्री फॅब्रीकेशन व इरेक्शन साठी आलेला खर्च | रक्कम रुपये - ४८,५००/- |
| क) | प्रकल्पास उशीर झाल्यामुळे येणे-जाणे व मटेरीयल ट्रान्सपोर्ट साठी झालेला खर्च | रक्कम रुपये - ५०,०००/- |
| ड) | संपुर्ण यंत्रणा उभारणीस जवळ जवळ एक वर्ष कालावधी लागल्यामुळे गुंतवणूक केलेल्या भांडवलापोटी बॅंकेचे व्याज व मटेरियल खरेदी करतांना झालेली भाववाढ | रक्कम रुपये - ८५,०००/- |
| | **एकूण रुपये =** | **५,१९,०००/-** |

उपरोक्त अं.नं. अ) नूसार मे.पद्माटेक इंजिनिअर्स, पुणे यांनी त्यांचे पत्रातील नमूद केलेल्या मोजमापानूसार वाढलेल्या मटेरीयलची किंमत + लेबर चार्जेस + उभारणी चार्जेस अशी एकत्रित रक्कम रुपये ३,३५,५०५/- एवढी कळविलेली आहे. मात्र त्यांनी कळविलेल्या मोजमापात व प्रत्यक्ष मोजमापात खालीलप्रमाणे तफावत आलेली आहे.

| अं. नं. | तपशिल | टेंडरमध्ये नमूद केलेले मोजमाप | कॉन्ट्रॅक्टर यांनी मागणी केलेले मोजमाप | प्रत्यक्ष असेलेले मोजमाप | तफावत | दर | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 40 Nb Seamless Sch.40 pipe | 75 मी. | 135 मी. | 125 मी. | 50 मी. | 1683 | 84,150.00 |
| 2 | 50 Nb Seamless Pie eSch.40 | ---- | 45 मी. | 35 मी. | 35 मी. | 2738 | 95,830.00 |
| 3 | 20 Nb Seamless Pie eSch.40 | ---- | 36 मी. | 34 मी. | 34 मी. | 3503 | 1,19,102.00 |
| 4 | Erection of 150 x 75mm MS I Beam | टेंडरमध्ये समाविष्ठ केलेले नव्हते. | बांधकामासह अंदाजे 18 मी. | 18 मी. | नाही | मटेरीयलची किंमत | 18,500.00 |
| | | | | | | लेबर चार्जेस | 6,000.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | एकूण रु = | 3,23,582.00 |
| 5 | 25 Nb Seamless Pie eSch.40 | 15 मी | 12 मी | 12 मी | 03 मी. टेंडरमधील मोजमापापेक्षा कमी | 872 | - 2,616.00 |
| | | | | | | एकूण रु = | **3,20,966.00** |

कॉन्ट्रॅक्टर यांनी अ.नं. अ व ब त्यांच्या मोजमापानुसार वाढीव कामासाठी रक्कम रु. ३,८४,००५/- जादा मागणी केलेली आहे. तथापी प्रत्यक्ष मोजमापानूसार यंत्रणा पुरवठादार यांचे वाढीव रक्कम रुपये ३,२०,९६६/- आदा करणे योग्य होईल. त्याचप्रमाणे कॉन्ट्रॅक्टर यांनी प्रकल्प उभारणीस एक वर्ष विलंब झालेने ट्रान्सपोर्ट , भांडवलापोटी बॅकेचे व्याज व मटेरियल खरेदी करताना झालेली भाववाढ असे एकुण रु. ५०,०००/- + रु. ८४,०००/- एकुण १,३४,०००/- वाढीव रक्कम कळविलेली आहे. वरीलप्रमाणे अ. नं. अ ते ड प्रमाणे एकुण रक्कम रु. ५,१९,०००/- पैकी सुट वजा जाता रु. ५,००,०००/- वाढीव रक्कमेची मागणी केलेली आहे. मा. व्यवस्थापन समितीचे सभेत कॉन्टॅक्टर यांना प्रत्यक्ष बोलावून चर्चा / वाटाघाटीव्दारे देणे अथवा न देणेबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

तरी मे.पद्माटेक इंजिनिअर्स , पुणे यांना थर्मिक फ्ल्युड हिटर यंत्रणा उभारणीस लागलेल्या जादा कालावधीस ( दिनांक २०/१०/२००८ ते २३/०८/२००९ ) अखेर मुदतवाढ देणेस तसेच त्यांचे वाढीव बीलाबाबत चर्चा वाटाघाटीव्दारे निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९११** **उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे रक्कम आदा करणेसाठी, मे.पद्माटेक इंजिनिअर्स, पुणे यांचेशी सविस्तर चर्चा करुन फक्त थर्मिक फ्ल्युड हिटर यंत्रणा प्रत्यक्ष वाढीव कामाची रुपये ३,२०,९६६/- एवढी रक्कम आदा करण्यात यावी, उर्वरित रक्कम देण्यात येऊ नये. तसेच सदर यंत्रणा उभारणी करताना यंत्रणे कामी लागणारे शेड संस्थानकडून उशिराने झालेल्याने प्रस्तावात नमूद केलेली मुदतवाढ मान्य करण्यात येऊ नये असें ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३९** **शिर्डी परिसरातील अंध, अपंग, मुकबधीर,कर्णबधीर,धार्मिक वारकारी शिक्षण घेणारी मुले,मतीमंद, अनाथ मुला-मुलींना, संस्थान रुग्णालयातील रुग्ण, इंटर्न डॉक्टर्स, व वृद्धाश्रमातील वृद्ध व्यक्तिंना मोफत, सवलतीचे दरात प्रसाद भोजन पुरविणेबाबत.**

**निर्णय क्र.९१२** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४०** **नवीन भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीमधील गाळा नं.०५ आईस्क्रिम व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी देण्यात आलेल्या गाळयांचे भाड्याबाबत**

**निर्णय क्र.९१३** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी )

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४१** **धर्मशाळा नं.०१ इमारतीतील खोल्यात उतरणाऱ्या साईभक्तांना श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप सोसा.लि.शिर्डी यांचेमार्फत गरम पाणी पुरविण्याचे करारास मुदतवाढ देणे बाबत**

**निर्णय क्र.९१४** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी )

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४२** **नवीन भक्तनिवास इमारतीमधील जाहिर लिलाव झालेल्या गाळयांच्या ताब्याबाबत**

**निर्णय क्र.९१५** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी )

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४३** **धार्मिक कार्यक्रमासाठी साईनगर मैदान देणे बाबत**

**प्रस्ताव-** विजय सोपानराव जगताप, माजी उपनगराध्यक्ष, व अध्यक्ष, छत्रपती मित्र मंडळ, शिर्डी यांनी दि.१७/१०/२००९ च्या अर्जाने श्री भोलानाथ शुक्ला, लखनौ यांचा शिर्डी येथे भागवत कथा करणेचा मानस असून सदर कार्यक्रमासाठी श्री क्षेत्र वृंदांवन येथील प्रसिध्द भागवत कथाकार परमश्रध्देय स्वामी शिवशंकर कृष्ण येणार असून सदरचा कार्यक्रम दि.१७/११/२००९ ते दि.२५/११/२००९ अखेर आयोजित करण्याचा मानस असून सदर कार्यक्रमासाठी साईनगरचे मैदान, पाणी, संडास बाथरुम व विद्युत पुरवठा इ.ची सोय होणेबाबत विनंती केलेली आहे. सदर कार्यक्रमासाठी छत्रपती मित्र मंडळ, शिर्डी हे सहकार्य करणार आहे. संबंधीत हे सदर मैदानाचे भाडे, विद्युत आकार भरणेस तयार आहेत.

संस्थानचे साईनगर मैदानालगत कर्मचा-यांची निवासस्थाने,रुग्णालय, शाळा आहे, ध्वनीप्रदुषणामुळे तेथील कर्मचा-यांना, रुग्णांना, विद्यार्थ्यांना त्रास होतो.

दि.१८/१०/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन येथून पूढे साईनगर मैदान कोणत्याही खाजगी व राजकीय प्रकारच्या कार्यक्रमास भाडोत्री देण्यात येऊ नये, असा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयानंतर खालील कार्यक्रमासाठी साईनगर मैदान वापरास परवानगी देण्यात आलेली आहे.

| अ.नं. | कार्यक्रमाचे नांव | कार्यक्रमाचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | अध्यक्ष, पुरोहित संघ, शिर्डी - श्री गुरुचरित्र पारायण - दि.५/१२/०८ ते दि.१२/१२/०८ अखेर. | साईनगर येथील मंदिरासमोर. | विद्युत व्यवस्था संस्थानमार्फत. |
| ०२. | अध्यक्ष, साईसंगम प्रतिष्ठाण, शिर्डी यांनी दि.३१/०१/२००९ रोजी साईनगर मैदानात साई भजन संध्या कार्यक्रम आयोजित करणेबाबत. | साईनगर मैदान | |
| ०३. | अध्यक्ष, साई निर्माण ग्रुप, शिर्डी रामायणाचार्य ह.भ.प.रामरावजी महाराज ढोक यांचे तुलसी रामायण कार्यक्रम दि.७/३/०९ ते दि.१४/३/०९ अखेर आयोजित करणेबाबत. | साईनगर मैदान | |
| ०४. | अध्यक्ष, शिलधी प्रतिष्ठाण, शिर्डी- मराठी नववर्षाच्या स्वागताकरीता शुक्रवार दि.२७/०३/२००९ रोजी गुढीपाडवा, चैत्र शु.१ (मराठी नववर्ष) च्या पुर्वसंधेला म्हणजे गुरुवार, दि.२६/०३/२००९ रोजी मराठी नाट्यसम्राट/सिनेअभिनेता श्री सिध्दार्थ जाधव यांची प्रमुख भुमिका असलेले " जागो मोहन प्यारे " मराठी विनोदी नाट्यप्रयोग व " शिलधी गुणगौरव पुरस्कार " चा वितरण कार्यक्रम आयोजित. | साईनगर मैदान | नियमानुसार विद्युत आकार भरुन. |
| ०५. | डॉ.जे.एस.तांबोळी, एकलहरे, यांचे कोजागिरी पौर्णिमा निमित्त दमा अस्थमा शिबीर आयोजित करणेबाबत. | साईनगर मैदान | नियमानुसार विद्युत आकार भरुन. |

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता मा.व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलबाबतीत निर्णय होणेस विनंती आहे.

०१) साईनगर मैदान सांस्कृतिक, सामाजिक, खाजगी वा धार्मिक कार्यक्रमासाठी वापरास द्यावे अगर कसे ?

०२) परवानगी देण्याची असलेस मैदानाचे वापरासाठी सेवाआकार घ्यावा अगर कसे ? घ्यावयाचा असल्यास दर दिवशी किती घ्यावा ?

०३) विद्युत आकार, पाणी आकार घ्यावे किंवा कसे ?

**अ-** सबब दि. १८/१०/२००८ रोजीचे निर्णयानुसार अध्यक्ष, छत्रपती मित्र मंडळ, शिर्डी यांना दि.१७/११/२००९ ते दि.२५/११/२००९ अखेर भागवत कथा कार्यक्रम सादर करणेसाठी साईनगर मैदान देता येत नसलेबाबत संबंधीतांना कळवावे किंवा कसे ?

**ब-** संबंधीतांना दि.१७/११/२००९ ते दि.२५/११/२००९ अखेर भागवत कथा कार्यक्रम लाऊडस्पिकरचा आवाज मर्यादीत ठेवून भागवत कथा कार्यक्रम करणेस संस्थानचे साईनगरचे मैदान, पाणी, विद्युत पुरवठा, संडास-बाथरुम इ. सशुल्क वापरास परवानगी द्यावी अगर कसे याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विचारार्थ व निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.९१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर कार्यक्रम धार्मिक स्वरुपाचा असल्याने विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४४** **चावडी शताब्दी महोत्सव-२००९ बाबत**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीच्या दि.१५/११/२००८ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.८८२ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

श्री साईबाबांचे द्वारकामाईमध्ये हयातभर वास्तव्य असे तसेच श्री साईबाबा द्वारकामाईत व चावडीमध्ये शयन करीत असत. त्यांचा असा नित्यक्रम महानिर्वाणापर्यंत चालू होता. दि.१० डिसेंबर १९०९ रोजी बाबांच्या भक्तांनी चावडीमध्ये बाबांचे भजन-पूजन सुरु केले असून तसा संदर्भ कै. दाभोळकर लिखित श्री साई सच्चरित ग्रंथात अध्याय क्र. ३७ मध्ये ओवी क्र. १८ मध्ये आहे. या घटनेस सन २००९ मध्ये १०० वर्ष होत आहेत.

यावर्षी दि.१० डिसेंबर २००८ सालापासून चावडी भजन पूजन अर्चन शताब्दी महोत्सवास सुरुवात होत असून पुढील वर्षी १० डिसेंबर २००९ मध्ये १०० वर्षे पुर्ण होतील. त्यामुळे हा कालावधी चावडी मंदिर पूजन शताब्दी वर्ष म्हणून साजरा करता येईल.

यामध्ये दि. १० डिसेंबर २००८ रोजी महोत्सवाची सुरुवात म्हणून उत्सवातील कार्यक्रमाप्रमाणे सकाळी ६.०० वा. समाधी मंदिरातून फोटोची मिरवणूक काढण्यात यावी व चावडीमध्ये श्रींच्या चांदीच्या पादुकांची अभिषेक पूजा करता येईल.

हा महोत्सव साजरा करण्याकरीता नामवंत किर्तनकार व कलाकार निमंत्रित करुन भजन संध्या, कीर्तन, प्रवचन, नाट्यप्रयोग, साई सा रे ग म तसेच तीर्थ क्षेत्रावरुन पवित्र नद्यांचे जल आणून बाबांना मंगल स्नान घालणे असे कार्यक्रम आयोजित करता येतील. त्याचप्रमाणे शताब्दी महोत्सवाचा समारोप म्हणून दि. ०८/१२/२००९ ते दि.१०/१२/२००९ अखेर तीन दिवस भव्य प्रमाणात कार्यक्रम करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक १० डिसेंबर २००८ पासून चावडी पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करावी. दि. १३-१४ जानेवारी रोजी श्री श्री रविशंकर यांचे कार्यक्रमाचे आयोजन करुन कार्यक्रमाची सुरुवात

करावी. ज्या राज्यात श्री साईबाबांचे जीवन व कार्याचा प्रसार नाही, अशा राज्यात जाहिर कार्यक्रम करावा, त्यासाठी प्रोफेशनल इन्व्हेंट मॅनेजमेंटची नेमणूक करावी. स्थानिक भाषेत श्री साईबाबांवरील साहित्य प्रसिध्द करावे. २-३ विश्वस्तांनी मिळून एक राज्य घ्यावे, राज्यातील चांगल्या भजन सम्राटांशी भेट घेऊन कार्यक्रम ठेवण्यात यावा. या कार्यक्रमासाठी चांदीच्या पादूका न्याव्यात. याबाबत प्रशासनाने सविस्तर प्रस्ताव सादर करावा, याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

सदर निर्णयानुसार दि.१०/१२/२००८ रोजी वरीलप्रमाणे कार्यक्रम झालेला आहे.

त्यानंतर पणजी-गोवा, लखनौ, रायपूर, कोलकत्ता, कॅलिंगपॉंग व गोहत्ती येथे साईभक्त संमेलनाचे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडले आहेत.

त्यानंतर दि. २३/०८/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.

निर्णय क्र. ७३१ (१) चावडी शताब्दी महोत्सव-२००९ अमेरिका येथे आयोजित करणेबाबत -

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त व शिर्डी ग्रामस्थांच्या भावना विचारात घेऊन अमेरिकेतील नियोजित पादुका दर्शन सोहळा रद्द करणेत यावा, अधिकृतपणे कोणीही अधिकारी/कर्मचारी यांनी सदर कार्यक्रमास जाऊ नये, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. त्यानुसार अमेरिका येथील चावडी शताब्दी महोत्सव कार्यक्रम रद्द करण्यात आलेला आहे.

निर्णय क्र. ७३१ (२) साईभक्त संमेलन-२००९ हलोल (गुजरात) शहरात आयोजित करणेबाबत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, विधानसभा निवडणूक प्रक्रिया व तयारी चालू असल्याने तूर्त कोठेही पादुका दर्शन सोहळा आयोजित करण्यात येऊ नये, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

त्यानुसार विधानसभाच्या निवडणूका दि.१३/१०/२००९ रोजी झालेल्या असून दि.२२/१०/२००९ अखेर निवडणूक निकाल लागलेनंतर निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

उपरोक्त निर्णयानुसार चावडी महोत्सवाची सुरुवात दि. १०/१२/२००८ रोजी झालेली आहे. दि. १०/१२/२००९ रोजी १०० वर्ष पूर्ण होत असलेने यादिवशी उत्सव सांगताच्या निमित्ताने खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे दि. ०८/१२/२००९ ते दि.१०/१२/२००९ अखेर ३ दिवस आयोजन करणेबाबत विचार होणेस विनंती.

| दिनांक | वेळ | कार्यक्रमाचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|
| ०८/१२/२००९ | रात्रौ ७.३० ते १०.०० | नामांकीत गायकाचा भजन संध्या कार्यक्रम. | निमंत्रीत कलाकारांचे कार्यक्रम निश्चिती व बिदागी मा.व्य.स. सभेपुढे अलहिदा ठरविता येईल. तथापि स्टेज, फुल डेकोरेशन, कलाकार बिदागी इ. मिळून साधारणपणे रु. ७ लाख रक्कम लागण्याची शक्यता आहे. |
| ०९/१२/२००९ | रात्रौ ७.३० ते १०.०० | नामांकीत गायकाचा भजन संध्या कार्यक्रम. | |
| १०/१२/२००९ | सकाळी-६.०० वा. | श्रींच्या फोटोची व चांदीच्या पादुकांची मिरवणूक(समाधी मंदिर-गुरुस्थानमार्गे चावडीत) | |
| | सकाळी ६.३० वा. | चांदीच्या पादुकांची अभिषेक पुजा, आरती व प्रसाद वाटप. | |
| | सकाळी ७.१५ वा. | स्तवन मंजिरीचे समुह वाचन. | चावडीसमोर मंडप घालुन. |
| | सकाळी ८.०० वा. | साईचरित्रातील अध्याय क्र. ३७ चे सामुदायीक वाचन. | चावडीसमोर मंडप घालुन. |
| | रात्रौ ७.३० ते १०.०० | नामांकीत गायकाचा भजन संध्या कार्यक्रम. | |
| ८/१२/२००९ ते १०/१२/२००९ | सकाळी १०.०० ते दु.१२.०० पर्यंत | कीर्तन कार्यक्रम<br>शेवटचे दिवशी कालाकीर्तन. | समाधी मंदिर शेजारील स्टेजवर. |

०१) उपरोक्त प्रस्तावीत केलेप्रमाणे दि.८/१२/०९ ते दि.१०/१२/०९ अखेर तीन दिवस चावडी शताब्दी महोत्सव कार्यक्रमाचे नियोजन करणे.

०२) सदर कार्यक्रमास व त्या अनुषंगाने येणारे अंदाजे रु. ७,००,०००/-(अक्षरी रु. सात लाख ) मात्रचे खर्चास मान्यता मिळणे.

०३) चावडी शताब्दी महोत्सव कार्यक्रमासाठी कलाकार व मानधन निश्चित करणे.

**निर्णय क्र.९१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, चावडी महोत्सव व शिर्डी महोत्सव एकत्रित साजरा करुन या कार्यक्रमासाठी ह.भ.प.श्री बाबा महाराज सातारकर अथवा नामांकित कीर्तनकारांचा कार्यक्रम मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांनी निश्चित करावे असे ठरले.**

**तसेच चावडी शताब्दी महोत्सवानिमित्त श्री साईचरित्राचे पारायण दिनांक ०९ व १० डिसेंबर, २००९ रोजी चावडीमध्ये नेहमीप्रमाणे करण्यात यावे व त्यासाठी दिनांक ०९ डिसेंबर, २००९ रोजी चावडी रात्रभर उघडी ठेवण्यात यावी. या निमित्त गेल्या वर्षभरात ज्या ज्या ठिकाणी पादूका दर्शन सोहळा आयोजित केलेला आहे अशा सर्व आयोजकांना आमंत्रित करण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४५** **संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नियुक्ती होणे बाबत**

**निर्णय क्र.९१८** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४६** **भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, शिर्डी यांना साईछाया इमारतीतील पहिल्या मजल्यास देण्यात आलेल्या जागेच्या मुदवाढ संपलेबाबत**

**निर्णय क्र.९१९** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी )

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४७** **व्दारावती रुममध्ये ठेवणेसाठी स्टील जग, ग्लास, ट्रे खरेदी बाबत**

**निर्णय क्र.९२०** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,व्दारावती )

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४८** **शिर्डी नागरी विकास प्राधिकरण कार्यालयास जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.९२१** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख )

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४९** **युनाईटेड बँक ऑफ इंडिया, शिर्डी यांच्याकडून संस्थानला सेवा घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** युनाईटेड बँक ऑफ इंडिया यांनी त्यांचे जा.नं.UBI/SDI/ SSS/ ०१/ २००९, दिनांक ०६.११.२००९ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, दि.१०.११.२००९ रोजी पासून श्री क्षेत्र शिर्डी येथे युनाईटेड बँक ऑफ इंडिया या बँकेची शाखा सुरु होत आहे. तसेच, याच पत्रात त्यांनी साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे बचत खाते युनाईटेड बँक ऑफ इंडिया मध्ये उघडणेची तसेच, दक्षिणा पेटी मोजणीकामी त्यांना पाचारण करणेसाठी विनंती केलेली आहे. आणि संस्थानच्या मुदतठेवी त्यांच्याकडे नियमानुसार करणेसाठी सुध्दा त्यांनी विनंती केलेली आहे.

दि.०७.११.२००९ चे मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये सदर बँकेचे व्यवस्थापक श्री.विश्वनाथन यांनी समक्ष येऊन वरीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

**निर्णय क्र.९२२** **युनाईटेड बँक ऑफ इंडिया हि राष्ट्रीयकृत बँक असून त्यांची शाखा शिर्डी येथे सुरु होत आहे. त्यांनी दक्षिणापेटी मोजणीस विनाअट येण्यास तयारी दर्शविली आहे. तसेच त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे दर न आकारता डी.डी. संस्थान कामासाठी खरेदी करता येतील. सबब त्यांचेकडे संस्थानचे बचत खाते उघडावे, दक्षिणापेटी मोजणीसाठी पाचारण करावे व संस्थान नियमानुसार त्यांचेकडे मुदतठेवी कराव्यात, असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५०** **मंदिर परीसर व श्री साई प्रसादालयाकरीता डिसप्ले बोर्ड बसविणेबाबत**

**प्रस्ताव-** मंदिर परीसरातील नगर-मनमाड महामार्गाच्या बाजूने लोखंडी ग्रीलवर पुर्वी NEON SIGN चे बोर्ड बसविणेबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात आलेला होता. सदरील बोर्डवरील अक्षरे ही बंद पडतात. शिवाय या बोर्डाना वीज जास्त लागते. अशी चर्चा होऊन या बोर्डाची आवश्यकता नसून डिस्प्ले बोर्डाचा विषय मंजूर झाला नाही.

सध्या बाजारामध्ये नविन तंत्रज्ञानावर आधारित LED (Light Emmiting Diode) चे अत्यंत आकर्षक Display Board आलेले आहेत. सदर बोर्डामध्ये वापरण्यात येत असलेल्या LED मुळे अक्षरे बंद पडत नाहीत आणि शिवाय LED ना वीज अत्यंत कमी प्रमाणात लागते. अशा प्रकारचे LED डिस्प्ले बोर्ड हे आंतरराष्ट्रीय विमानतळे व फाईव्हस्टार हॉटेल्सवर बसविलेले आहेत. शिर्डीमध्ये सुद्धा बहुतांश हॉटेल्सवर तसेच इतर गावांमधील छोटया-मोठया मंदिरावरही असे बोर्ड बसविण्यात आलेले आहेत.

श्री साईबाबा मंदिर परीसरातील नगर-मनमाड महामार्गाच्या बाजूने मुख्य प्रवेशव्दाराजवळ लोखंडी लोखंडी ग्रील्सच्या वरील बाजूस LED डिस्प्ले बोर्ड बसविले तर साईभक्तांकरीता ते मार्गदर्शक व सोईचे ठरतील.

सदर डिस्प्ले बोर्डामध्ये श्री साईबाबांच्या समाधीच्या मुर्तीचा फोटो लावावयाचा असल्यामुळे महामार्गावरुन येणा-या-जाणा-या भक्तांना साईंचे दर्शन रुपाने समाधान लाभेल.

शिर्डीमध्ये येणा-या साईभक्तांना सोयीस्कर रित्या प्रसादभोजनाची व्यवस्था व्हावी म्हणून श्री साईबाबा संस्थानने निमगांव-को-हाळे शिवारामध्ये प्रसादालयाची भव्य इमारत बांधून भक्तांची प्रसाद भोजनाची व्यवस्था करुन देण्यात आलेली आहे.

प्रसादालय इमारतीवर रात्रौचे वेळेस लांब अंतरावरुन भक्तांना दिसतील व वाचता येतील असे, LED मध्ये असलेले डिस्प्ले बोर्ड बसविण्याची आवश्यकता आहे. असे बोर्ड बसविल्यामुळे भक्तांना मार्गदर्शक ठरुन इमारतीच्या सौंदर्यातही भर पडेल.

मंदिर परिसर व साईप्रसादालय याठिकाणी लावावयाचे Display Board बनविणेकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क | ठिकाण | बोर्ड साईज | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | मंदिर परीसर | ४ फूट x ७५ फूट | ०१ नग. | ३,३०,५००.०० | ३,३०,५००.०० |
| ०२) | श्री साई प्रसादालय | ४ फूट x ६५ फूट | ०१ नग. | ३,०७,५००.०० | ३,०७,५००.०० |
| | | | | एकूण रुपये | ६,३८,०००.०० |

उपरोक्तप्रमाणे Display Board बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये ६,३८,०००.०० मात्र खर्च अपेक्षित आहे. प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९२३ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मंदिर परिसर व साईप्रसादालय याठिकाणी लावावयाचे Display Board बनविणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ६,३८,०००.०० मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५१. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील १०० खोल्यांचे रंगकाम करणेबाबत..**

**प्रस्ताव-** **अ)** " श्री साईबाबा भक्तनिवासस्थान " इमारतीमधील पहिल्या टप्प्यात १०० खोल्यांचे तातडीने आर. सी. सी. दरवाजे फ्रेम व फ्लश डोअर बसविणे, खोल्यांचे आतिल बाजूने ओ. बी. डी. रंगकाम करणे. तसेच दरवाजांना ऑईल पेंट देणे, लिकेज बंद करणे , संडास-बाथरुम मधील फुटलेल्या टाईल्स् बदलणे व प्रवेशव्दाराजवळील सिर्लीगचे रंगकाम करणे इ. १०० खोल्यांचे दुरुस्तीची कामे करणेकरीता येणारे अंदाजे रुपये १५,१९,०२७/- मात्रचे अपेक्षित व याकामी आवश्यक असणारे मटेरियल व मजूरी दराची कामे विहीत पध्दतीने कोटेशन / दरपत्रके मागवून करुन घेणेस मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.०९.२००९ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ७५० अन्वये मान्यता देणेत आली आहे.

**ब)** उपरोक्त परिछेदानूसार झालेले निर्णयानूसार १०० खोल्यांचे आतिल बाजूने रंगकाम करणेकामी अशा प्रकारचे काम करणारे ठेकेदार यांना इकडील जा. नं. १३२०७/२००९ दि. २८.१०.२००९ रोजीचे पत्रान्वये कोरे निवीदा फॉर्म दि. ०५.११.२००९ पर्यंत घेऊन जाणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानूसार खालील ठेकेदार यांनी विहीत मुदतीत कोरे निवीदा फॉर्म नेलेले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | संतोष पेंटीग वर्क्स, मुंबई |
| ०२. | अेस डेकोरेटर्स, पुणे |
| ०३. | इंजि. योगेश सुरेश पाटील, कोपरगांव |
| ०४. | श्री. संतोष नागनाथ गुंजेगावकर, निघोज |
| ०५. | श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता |

वरिल प्रमाणे विक्री करणेत आलेल्या निवीदापैकी अ. नं. ०२ चे निवीदा धारक वगळता सर्वांनी निवीदा सादर केल्या आहेत.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या एकुण ०४ सिलबंद निवीदा आजचे सभेपुढे उघडण्यात आल्या असता निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादकर्त्यांचे नांव | निविदेत देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१ | संतोष पेंटीग वर्क्स, मुंबई | ७,४३,५३३.७५ |
| ०२ | इंजि. योगेश सुरेश पाटील, कोपरगांव | ६,५७,७४५.०० |
| ०३ | श्री. संतोष नागनाथ गुंजेगावकर, निघोज | ९,८०,२२५.०० |
| ०४ | श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता | ७,३९,१२५.०० |

**निर्णय क्र.९२४ उपरोक्त निविदासादरकर्त्यांना उपसमितीचे सभेपूढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलावून अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५२ संस्थानचे आर्थिक सहाय्यातून शिर्डी पोलिस कार्यालयासाठी एका खोलीचे बांधकाम व संपूर्ण कार्यालयास रंगकाम करुन देणेबाबत...**

**प्रस्ताव-** **अ)**मा. उप-विभागीय पोलीस अधिकारी, कोपरगांव भाग, कॅम्प, शिर्डी यांनी शिर्डी पोलिस कार्यालयामध्ये पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने ठाणे अंमलदार कार्यालयासाठी नविन खोलीचे बांधकाम करणे, तसेच उपरोक्त पोलिस कार्यालय इमारतीचे रंगकाम खराब झालेले असल्याने रंगकाम, स्वच्छतागृहाचे ड्रेनेजदुरूस्ती, फॅन, टयुबलाईट दुरुस्तीचे कामे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी मार्फत करुन मिळणेबाबत विनंती केली होती.

तसेच मा. उप विभागीय पोलीस अधिकारी, कोपरगांव भाग, कॅम्प, शिर्डी व पोलिस निरीक्षक, शिर्डी यांनी वरिल प्रमाणे कळविलेल्या कामांबाबत मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची समक्ष भेट घेऊन सदरची कामे करुन मिळणे विनंती केली होती.

**ब)** उपरोक्तप्रमाणे शिर्डी पोलिस कार्यालयासाठी एक खोलीचे बांधकाम करणे, इमारतीचे रंगकाम करणे, इतर किरकोळ कामे करणेसाठी रु. २,७८,४०१/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.

व्यवस्थापन समितीचे दि. १९.०७.२००९ रोजीचे सभेपुढे सादर केला असता यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सदरहू काम लहान स्वरुपाचे असल्याने तसेच पोलिस स्टेशनची निकड लक्षात घेऊन रु. २,७८,४०१/- मात्रचे खर्चास व कामास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानूसार सदरहू कामासाठी अशा प्रकारचे काम करणारे ठेकेदार यांना इकडील जा. नं. १३४०५/२००९ दि.३०.१०.२००९ रोजीचे पत्रान्वये कोरे कोटेशन फॉर्म दि.०४.११.२००९ रोजी पर्यंत घेऊन जाणेबाबत व दि.०६/११/२००९ रोजी सिलबंद कोटेशन्स सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानूसार खालील ठेकेदार यांनी कोरे निवीदा फॉर्म नेलेले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१ | आर. एल. भुतडा, कोपरगांव |
| ०२ | एस. एन. गुंजेगावकर, निघोज |
| ०३ | श्रमिक बोरा, कोपरगांव |
| ०४ | श्री. गायकवाड, एस.जी. राहाता |

वरीलपैकी अ.नं. ०३ वगळता इतर ठेकेदारांनी विहित मुदतीत कोटेशन्स सादर केले आहेत.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या एकुण ०३ सिलबंद निवीदा आजचे सभेपुढे उघडण्यात आल्या असता निविदासादरकर्त्यानी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादकर्त्याचे नांव | निविदेत देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१ | आर. एल. भुतडा, कोपरगांव | २७ टक्के अधिक |
| ०२ | एस. एन. गुंजेगावकर, निघोज | निविदादरात |
| ०३ | श्री. गायकवाड, एस.जी. राहाता | ६ टक्के अधिक |

**निर्णय क्र.९२५ उपरोक्त निविदासादरकर्त्यांना उपसमितीचे सभेपूढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलावून अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५३ श्री सुधाकर माधवराव जाधव, रा.मुर्शतपूर ता.कोपरगांव यांना कॅन्सर आजारासाठी आर्थिक मदत करणेबाबत**

**निर्णय क्र.९२६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षिका)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ५४ चि.मयुर किसन पवार यांना आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.९२७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५५ मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र.९२८** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(०१)** सध्या प्रसादालयात प्रसादभोजनासाठी प्रती ताटास अंदाजे रुपये १६.५० इतका खर्च येत असून पैकी रुपये ६ ते ७ खर्च कर्मचारी, मजूरी, वीज, पाणी इ.करिता येतो व उर्वरित किराणा,भाजीपाला, गॅस इत्यादीवर खर्च होतो याकरिता सध्याचे प्रसादभोजनाचे दरात वाढ करुन प्रौढास रु ०६/- ऐवजी रु.१०/- व १० वर्षाखालील मुलास रु.३/- ऐवजी ५/- या दराने आकारणी करण्यात यावी. सदर आदेशाची कार्यवाही दिनांक ०१.०१.२०१० पासून करण्यात यावी. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**(०२)** सध्या साईभक्तांना प्रसादरुपाने मोतीचूर लाडूची विक्री संस्थानमार्फत साईप्रसाद नं.०२ इमारतीत उत्तर बाजूस केली जाते. दिवसेंदिवस साईभक्तांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. सध्या लाडू प्रसाद प्राप्त करण्यासाठी साईभक्तांना फार त्रास सहन करुन जादा वेळ रांगेत उभे रहावे लागते. प्रथमतः दर्शनरांगेत वेळ व त्यानंतर लाडू प्रसाद घेण्यासाठी काऊंटर शोधणेस वेळ जातो व त्याठिकाणी गेल्यावर पून्हा रांग लावावी लागते एवढा वेळ व त्रास सहन करुनही लाडू प्रसाद प्राप्त करणेचे ठिकाणी सुसूत्रिपणा रहात नाही त्यामूळे भक्तांची नाराजी होते.

लाडू प्रसाद वितरण व्यवस्थेत सुसूत्रिपणा यावा भक्तांना दर्शनासाठी व लाडूप्रसादासाठी दोन वेळा रांगेत उभे राहावे लागू नये यासाठी तिरुमला तिरुपती देवस्थान सारखे दर्शन रांगेतून प्रत्येक साईभक्तास एक तिकीट विक्री करणे सोयीस्कर होईल. दर्शन घेऊन भक्त बाहेर पडतांना लाडू वितरण काऊंटरवर कुपन्स जमा करुन लाडू प्रसाद देण्यात यावा. (कार्यवाही-अधिक्षक, प्रसादालय)

वरील निर्णय क्र ७९९ ते ९२८ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरित/-
(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

स्वाक्षरित/-
(शंकरराव गेणूजी कोल्हे )
उपाध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)